
# निळे डोंगर तांबडी माती



— अनंत काणेकर

रेखाचित्रें : दीनानाथ दलाल

म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
स. नं.

REFBK-0009733

अनुक्रम ............ दि: ..................
क्रमांक ............ नों: ..................

# निळे डोंगर तांबडी माती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १७३३

REFBK-0009733

# निळे डोंगर तांबडी माती

लेखक

**अनंत काणेकर**

चित्रें

**दीनानाथ दलाल**

किंमत ४ रुपये ५० नये पैसे

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
२२ कसबा पेठ, पुणें २

• • •

पाहिली आवृत्ति १९५७

• • •

सर्व हक्क लेखकाच्या
स्वाधीन आहेत.

• • •

मुखपृष्ठावरील चित्र :
दीनानाथ दलाल

• • •

मुद्रक
द. ग. गपचूप
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार, पुणें २

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २९८७८ वि: ...
क्रमांक २९५ नों: दि: ७-५-५४

दक्षिण भारत म्हटलें कीं, डोळ्यांपुढें उभे राहतात निळे डोंगर आणि तांबडी माती ! उत्तरेकडे जसा हिमालय तसा दक्षिणेकडे निलगिरी–निळा डोंगर. सर्वच डोंगर दुरून निळे दिसतात. निलगिरीच्या रांगाहि तशाच दिसतात. पण या डोंगरांना 'निलगिरी' म्हणायचं विशेष कारण आहे. विशिष्ट ऋतूंत एक प्रकारच्या निळ्या डोंगरी फुलांनीं हे डोंगर भरून जातात आणि दुरूनच नव्हे तर जवळूनसुद्धां जणूं काय वरचं निळं आकाश खालीं ओढून त्याचं पांघरूण घेऊन ते बसले आहेत कीं काय असं वाटतं ! आणि दक्षिणेंतल्या आकाशाचा निळा रंग तर विशेषच गर्द निळा आहे. कुठल्याहि आकाशाला सर्वसाधारणपणें आपण निळें म्हणतों, पण शारदीय चांदणं जसं विशेष शुभ्र तसंच हें दाक्षिणात्य आकाशहि कांहीं विशेषच झळझळीत निळं आहे. तज्ज्ञ म्हणतात, कीं विषुववृत्ताच्या जवळ हा प्रदेश असल्या-मुळें सूर्याचे किरण इथं अधिक सरळ असतात आणि त्यामुळें आकाशाला हा विशेष गडद निळेपणा आलेला असतो. इथले सर्वच डोंगर निळे निळे दिसतात त्याचंहि कारण हेंच असावं. पाहावं तिथं निळे डोंगरं आणि पाया-खालीं तांबडी माती. आकाश जसं गडद निळं तशीच इथली मातीहि तांबडी लाल. सरळ, स्वच्छ सूर्यप्रकाशामुळें कीं काय इथल्या निसर्गाचे सर्व रंग कसे ठसठशीत दिसतात. एकादा नवमतवादी चित्रकार इकडची वनश्री रंगवायची असल्यास वर एक निळा पट्टा, मध्यें एक गडद हिरवा आणि खालीं एक तांबडा पट्टा आपल्या फलकावर ओढील. म्हणून दक्षिण भारत म्हटलं कीं, डोळ्यांपुढं उभे राहतात निळे डोंगर आणि तांबडी माती !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९५३३

तारीख ६–७ मे १९५०

## तांबड्या डोंगरांचे कळप !

दक्षिण हिंदुस्थानाच्या प्रवासाची सुरुवात बंगलोरपासून करायची ठरविलें होतें. तेव्हां पुण्याहून रात्रीं १० ला निघणारी बंगलोर मेल पकडण्याकरितां संध्याकाळीं ५ च्या डेक्कन क्वीननें निघालों. रात्रीं ८ ला पुण्यास पोहोंचलों. बंगलोर मेल ठीक १० वाजतां निघाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८–३० वाजतां बेळगांव आलें संध्याकाळीं ५–३० ला हरिहर स्टेशनांत गाडी आली. आतां इथून तिथून कानडी शब्द कानावर पडूं लागले. 'नीरु' 'नीरु' ओरडत पाणी पाहिजे का म्हणून स्टेशनांतला पोऱ्या उतारूंना विचारीत होता. 'पल्ली' 'पल्ली' म्हणून ओरडणाऱ्या इसमाच्या टोपलींत पाहिलें तों भुईमुगाच्या शेंगा दिसल्या ! ६–३० ला गाडीनें हरिहर स्टेशन सोडलें. कांहीं वेळानें नदीवरचा एक पूल ओलांडून गाडी पलीकडे गेली आणि आजूबाजूला स्वच्छ पांढरा रंग दिलेलीं डाक बंगल्यासारखीं कांहीं टुमदार घरें आणि तांबड्या मातीचेच पण रेखीव रस्ते दिसूं लागले. बेळगांव-धारवाड-

कडल्यापेक्षां अधिक साफसूफ आणि व्यवस्थित घरें आणि रस्ते पाहून शेजारच्या एका माणसाला मी म्हणालों, ‘ छान दिसतंय् हें गांव ! ’ ‘ नदीच्या या कांठापासून आतां म्हैसूर संस्थानची हद्द सुरू झाली, महाराज ! ’ तो म्हणाला. एक पुढारलेलें संस्थान म्हणून ऐकलेली म्हैसूरची कीर्ति खरी आहे तर ? ब्यादगी स्टेशन गाडीनें सोडलें आणि जोराचा वारा आणि पाऊस सुरू झाला. पहिल्या पावसाच्या स्पर्शानें तांबड्या मातींतून निघालेला सुगंध गाडींत दरवळून गेला. कांहीं वेळानें पाऊस थांबला, पण जोराचें वादळ सुरू झालें. गाडीच्या बंद केलेल्या कांचेच्या खिडकींतून निसर्गाचें एक अद्‌भुतरम्य रूप बाहेर दिसत होतें. संध्याकाळचा तांबूस सोनेरी प्रकाश आतां काळवंडत चालला होता. दूर क्षितिजाकडे लाल धुळीचे डोंगरासारखे प्रचंड लोट वाऱ्याबरोबर धांवत होते आणि मधून मधून विजेच्या रेघोट्या लखलखत होत्या. जणूं कुणी कालभैरव विजेचा आंसूड उडवीत तांबड्या डोंगरांचे कळपच हांकून नेत होता ! वादळ आमच्या जवळ येऊं लागलें. मघां गाडींतून स्वच्छ दिसणारीं झाडें-डोंगर पोटांत घेत जणूं काय आमची सरपटणारी गाडी गिळून टाकण्याकरितां, आकाशांतल्या काळ्या ढगांना भिडूं पाहणारे तांबड्या धुळीचे अजस्र ढग पुढें येत होते. गाडीच्या कांचेंतून बाहेर उसळलेल्या तांबूस धुरळ्याखेरीज कांहींच दिसेना. गाडी अगदीं मंदगतीनें चालली होती. आतां ती जागच्या जागीं थबकली. दहा-पंधरा मिनिटांनीं वादळ ओसरलें, आणि गाडी चालू झाली. दुसऱ्या बाजूच्या खिडकींतून ते लाल ढग जसे आले तसेच पिसांटासारखे पलीकडे धांवत जातांना दिसत होते. आतां पुन्हा आजूबाजूचीं झाडें, डोंगर स्वच्छ दिसूं लागले. काळोख पडत होता, आणि झिमझिम पाऊसहि सुरू झाला होता.

पावणेनऊच्या सुमाराला चिकजेजूर स्टेशन आलें. भूक लागली होती. कांहींतरी खाण्याकरितां स्टेशनांत उतरलों. स्टेशनांत रेस्टोर

वगैरे कांहीं नव्हतें, पण कमरेइतक्या उंच दोन प्रचंड भांड्यांतून — एकांतून फोडणी दिलेला दही-भात आणि दुसऱ्यांतून तिखटमीट लाव-लेला सुका भात तीन आणे प्लेटप्रमाणें द्रोणांतून विकीत असलेला एक माणूस दिसला. बरेच उतारू त्याच्याभोंवतीं गर्दी करून हवा तो भात घेत होते. आम्हींहि एक एक प्लेट दहीं-भात आणि सुका भात घेतला. वरतीं दीडआणा कप कॉफी घेतली. हरिहर स्टेशनांतल्या सहा आणे कपाच्या स्पेन्सरच्या कॉफीपेक्षां ही साधी दाक्षिण भारतीय कॉफी खात्रीनें कितीतरी चवदार होती. साडेचार आण्यांत दहीं-भात कॉफीचें उत्तम जेवण ! उत्तर भारतांत पुरीशाक आणि लस्सी, तशी दाक्षिणेंत दही-भात आणि कॉफी ! आतां आम्ही दाक्षिण भारतांत किंवा मद्राशांच्या मुलखांत आलों यांत शंका नाहीं !

● ● ●

*तारीख ८ मे १९५०*

*बंगलोरचे सुंदर टांगे*

सकाळीं ६-३० ला बंगलोर स्टेशनांत गाडी आली. स्टेशनांतल्या रेस्टोरांमध्यें चहा, टोस्ट वगैरे घेऊन महाराष्ट्र निवासांत जाण्याकरितां टांग्यांत बसलों. खेळांतल्या रंगीत बैलगाड्यांसारखे इथले टांगे आहेत. पुढें-मागें पाय सोडून बसतां येत नाहीं. बैलगाडींत बसतात तसेंच गुढगे पोटाशीं घेऊन आंत बसावें लागतें. बैलाऐवजीं घोडा जोडलेला असतो म्हणून टांगा म्हणावयाचें इतकेंच. बैलगाडीइतकेहि लांब-रुंद हे टांगे नसतात; पण दिसायला मात्र सुबक आणि दुमदार दिसतात. हिरव्या रंगाचें छप्पर, आंतल्या बाजूला लहान लहान चौकटी रंग-विलेल्या आणि प्रत्येक चौकटींत निळीं पानें आणि एक लाल फूल अशी आकृति. बसायला गोणपाटाची पण व्यवस्थित गादी पसरलेली. उत्तर भारतांतल्या किंवा आपल्याकडल्या टांग्यांतल्यासारखा धुळकटपणा

किंवा मळकटपणा इकडल्या एकाहि टांग्यांत दिसला नाहीं. टांग्यांनाहि रंगरेघोटी करून नीटनेटके ठेवणाऱ्या या लोकांना उपजतच रंगसंगतीची आणि नीटनेटकेपणाची आवड दिसते.

*लंचहोम् आणि केक*

बंगलोरच्या गांधीनगर या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या विभागांत ' महाराष्ट्र निवासा 'ची इमारत आहे. निवासांत गर्दी मुळींच नव्हती. तिथले व्यवस्थापक श्री. लिमये यांनीं एक खोली आम्हांला उघडून दिली. फक्त राहण्याचीच सोय इथें आहे. चहा, जेवणाकरितां बाहेर जावें लागतें. स्नान वगैरे उरकून गांवांत भटकण्याकरतां आम्ही बाहेर पडलों. निवासापासून थोडयाच अंतरावर असलेल्या चौकांतल्या ' हॉटेल मॅजेस्टिक 'जवळच्या बस-स्टँडवरून गांवांत बऱ्याच ठिकाणीं जाणाऱ्या बसेस सुटतात. तिथें रसेल मार्केटकडे जाणारी बस घेतली. दोन्ही बाजूंना, तांबडया रंगाच्या भिंती आणि हिरवें छप्पर किंवा पिवळया भिंती आणि हिरवें छप्पर असलेल्या टुमदार सरकारी किंवा सार्वजनिक संस्थांच्या इमारती दिसत होत्या. नक्षीकाम केलेले रस्त्यांतले रुपेरी रंगाचे दिव्यांचे भव्य खांबदेखील एका वैभवशाली शहरांतून आपण फिरतों आहोंत याची जाणीव देत होते. मात्र या वैभवशाली शहरांतल्या स्वच्छ लांब-रुंद रस्त्यांवर आणि ऐसपैस चौकांत मुंबईच्या गर्दीची संवय झालेल्या आमच्या डोळयांना माणसें फारच थोडीं दिसत होतीं. सकाळीं दहा-अकराच्या कामाच्या गर्दीच्या वेळीं म्हैसूरमधल्या या वडया आधुनिक शहरांत जर इतकीं थोडीं माणसें, तर संध्याकाळ झाल्यावर अगदींच शुकशुकाट असेल! शहरांतल्या कांहीं इमारतींचे दर्शनी भाग आणि कांहीं टुमदार बंगल्यांचीं नांवेंहि मोठीं मजेदार वाटलीं. एक-दोन सिनेमा गृहांचे दर्शनी भाग किल्ल्याच्या दगडी बुरुजासारखे होते, तर बंगल्यांचीं नांवें ' सुरभि ', ' चमेलीकुंज ', ' मनोरमा ' अशी होतीं. पण आमच्या महाराष्ट्रीय मनाला गोड

अनुक्रम २९८७८ वि: ९१.५
क्रमांक ... २९५ ... नों: दि: ...९।५।५१।८०

आश्चर्य वाटलें तें एका चित्रपट-गृहाचें ‘ शिवाजी टॉकीज ’ हें नांव पाहून ! नुसतें नांवच ‘ शिवाजी टॉकीज ’ नव्हतें तर मुख्य दरवाजा-च्या कमानीवर भवानी देवीसमोर गुडघे टेंकून शिवाजीमहाराज आशीर्वाद घेत आहेत असें मातीचें भव्य चित्रहि होतें. आपल्याकडे जशीं पाहावें तिथें ‘ रेस्टोरां ’ आणि ‘ हॉटेल्स ’, दिसतात, त्याचप्रमाणें इथें ‘ लंच होम्स् ’ आणि ‘ कॅफे ’ दिसतात. एका लंच होमचेंहि नांव ‘ भवानी लंच होम ’ होतें. साफ रस्ते, भव्य चौक, दिव्यांचे डौलदार खांब, यांच्या जोडीला ठिकठिकाणीं दिसणारीं वेलूचीं बेटें आणि मोठमोठे सार्वजनिक बगीचे पाहून डोळ्यांना आनंद होतो.

*नंदी आणि नटराज*

अकराचा सुमार झाला होता. भूक नव्हती, तेव्हां आणखी भटकायचें ठरवलें. एक टांगा करून बसवंगुडी भागांतलें नंदीचें प्रख्यात देवालय पहावयाला गेलों. आपल्याकडे ‘ शंकरापुढला ’ यापेक्षां नंदीला फारसें महत्त्व नाहीं. पण इथें नंदीचें बरेंच माहात्म्य दिसतें. नंदीची स्वतंत्र देवालयें आहेत. बसवंगुडी बंगलोरमध्येंच आहे, पण इथें आल्यावर थोडेंसें ग्रामीण भागांत आल्यासारखें वाटलें. नंदीचें देवालय लहानशा टेंकाडावर आहे. आजूबाजूला पसरलेल्या डोंगराळ माळावर कुणीतरी आणून ठेवल्यासारखे प्रचंड अक्राळविक्राळ गुळगुळीत काळे खडक इतस्ततः पसरलेले दिसतात. देवालयांत जाऊन तिथली नंदीची अचाट मूर्ति पाहिल्याबरोबर माझ्या डोक्यांत एक कल्पना चट्कन चमकून गेली. आजूबाजूचे हे प्रचंड गुळगुळीत खडक पाहिल्याबरोबर कित्येक शतकांपूर्वीं ज्या शिवभक्त कलावंतानें नंदीची ही अचाट मूर्ति कोरली असेल त्याच्या डोक्यांत ही कल्पना अगदीं सहज आली असेल — परमेश्वरानें जणूं काय महान् नंदी कोरण्याकरितांच या महान् शिला आपल्यासमोर आणून ठेवल्या आहेत असें त्याला वाटलें असेल. हे दगड पाहिल्याबरोबर कांहीं तरी आकृति कोरावी, असें आजसुद्धां

कुणाहि संवेदनक्षम कलावंताला वाटेल. 'कांचेमधूनी दिसतें जनाला—धोंड्यामधूनी दिसतें कवीला' तें असें ! आजूबाजूला अस्ताव्यस्त पसरलेली वास्तवता सर्वच पाहतात. प्रतिभाशाली कवीला, चित्रकाराला, शिल्पकाराला, संगीत-कुशलाला तिच्यांत मध्येंच कुठें तरी कांहीं आकृति, कांहीं संगति दिसते आणि तो आपली कलाकृति निर्माण करतो. कलाकाराचा जादूचा स्पर्श तो हाच ! इथें उघड्या माळावर ठिकठिकाणीं गुल्मोहोरांचीं खूप झाडें मला दिसलीं. गुल्मोहोरांचीं झाडें यापूर्वी मीं पुष्कळ पाहिलीं आहेत; पण तांबड्या लाल फुलांनीं डंवरलेल्या आपल्या डौल्दार फांद्या पसरून उन्हांत स्तब्ध उभ्या राहिलेल्या या गुल्मोहोरांना पाहून आणखी एक चमत्कारिक कल्पना माझ्या डोक्यांत आली. अनेक हातांच्या नृत्यमग्न नटराजांच्या सुंदर मूर्ति मीं पाहिल्या आहेत. माळावर हे तांबडेलाल भव्य नटराज तर उभे नाहींत !

*प्रचंड नंदीचा छोटा पुजारी*

देवालयाच्या दारासमोर एक ताडमाड उंच दगडी स्तंभ आहे. स्तंभाच्या पायथ्याशीं निरनिराळ्या देवतांच्या मूर्ति कोरलेल्या आहेत. एका झाडाच्या पारावर सर्पांच्या नागमोडी आकृत्या कोरलेले बरेच दगड दिसले. पूर्वीच्या नागपूजेचे हे अवशेष असावेत. गाभाऱ्यांतली नंदीची मूर्ति प्रदक्षिणा घालून आम्हीं सर्व बाजूंनीं पाहिली. मला तरी हत्तीपेक्षांहि ती मोठी वाटली. गुळगुळीत काळ्या दगडाचा जवळ जवळ वीस फूट लांब, पंधरा फूट रुंद आणि त्या मानानें उंच असा हा प्रचंड नंदी आहे. फुलें, फळें, गंधाक्षता, नारळ भरलेलीं ताटें घेऊन कांहीं कानडी बायका नवस फेडायला देवळांत आल्या होत्या. नंदीच्या आजूबाजूला नवसाला पावल्याबद्दल भक्तांनीं लावलेले किती तरी खेळांतल्या छोटे छोटे पाळणें आणि झोंपाळे दिसत होते. या एवढ्या प्रचंड नंदीचा पुजारी मात्र तेराचवदा वर्षांचा एक किडकिडीत मुलगा होता. नवस फेडायला आलेल्या बायांच्या ताटांतले

नारळ नंदीपुढें फोडून घंटा वाजवीत तो आरति करीत होता. आमच्या मोडक्या तोडक्या हिंदींत आम्हीं त्याला त्याचें नांव विचारलें. त्याला त्यांतलें एक अक्षराक्षरहि समजलें नाहीं. पण इंग्रजी त्याला चांगलें समजत असलेलें दिसलें. देवळाच्या मागल्या मोकळ्या मैदानांत कांहीं अंतरावर एक छानदार एकमजली दगडी इमारत दिसत होती. एकाद्या कॉलेजच्या अवयावत् होस्टेलसारख्या दिसणाऱ्या त्या इमारतीचें 'आचार्य पाठशाला' हें जुनाट नांव कसेसेंच विसंगत वाटत होतें. पण खरोखरच ती संस्कृत पाठशाळा होती. याच शाळेंत आपण वेदाध्ययन करीत असल्याचें छोटा पुजारी नागराज यानें आम्हांला इंग्रजींत सांगितलें.

देऊळ पाहून आम्ही परत निघालों, तेव्हां वाटेंत एक मुंज्याची मिरवणूक आम्हाला दिसली. कानडी मुंज्याची ही मिरवणूक पाहण्यासारखी होती. लांब केंसांचा आंबाडा घातलेला आणि गोल धोतर गुंडाळलेला एक ढोलकेवाला आणि तसलाच एक सनईवाला 'पें-पें ढम-ढम' करीत पुढें चालले होते. त्यांच्यामागून पिवळ्या वस्त्रानें सर्व अंग झांकून घेतलेला आणि डोक्यावर टोपी असलेला मुंज्या मुलगा चालला होता. त्याच्या डोक्यावर छत्री धरून एक माणूस चालला होता. भडक लाल, जांभळ्या, हिरव्या, गुलाबी रंगाचीं जरीच्या पदरांचीं लुगडीं नेसलेल्या पांच-दहा कानडी बायका भर दुपारच्या उन्हांत आपल्या कानांतल्या हिऱ्यांच्या कुड्या लखलखवीत एकीमागें एक रांक करून चालत होत्या.

*झेंडी आणि सौजन्य !*

संध्याकाळीं 'कब्बन पार्क' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रशस्त सार्वजनिक बगीचांत फिरायला गेलों. फार वाजले नव्हते. संध्याकाळचे सहा साडे-सहा झाले असतील; पण या एवढ्या मोठ्या बगीचांत आणि शहरांतल्या प्रशस्त डांबरी रस्त्यांवर भीति वाटेल इतका

शुकशुकाट होता. परत फिरतांना रस्ता चुकलों म्हणून लांब शेंडीचा आंबाडा घातलेल्या, दोन्ही कानांत माणकाचे तांबडेलाल खडे असलेल्या समोरून येणाऱ्या गोल धोतरवाल्या एका कानडी माणसाला भीतभीतच इंग्रजींत रस्ता विचारला. त्याला इंग्रजी येत नसेल अशी आमची कल्पना होती, पण त्यानें उत्तम इंग्रजींत अत्यंत सौ न्यानें आम्हाला रस्ता सांगितला. शेंडी आणि धोतर म्हणजे माणूस अडाणी असेल ही आमची कल्पना वेडेपणाची होती. म्हैसूरमधल्या माणसांचें आणखी एक वैशिष्ट्य मला विशेष जाणवलें. चहाच्या हॉटेलांत जा, मोठ्या स्टोअरमध्यें जा, बस-स्टँडवर किंवा स्टेशनांत जा, इथलीं सामान्य माणसें आमच्याकडच्या किंवा उत्तर भारतांतल्या माणसांपेक्षां किती तरी सौजन्यशील आणि सज्जन वाटतात. हें सौजन्य ओढून ताणून आणलेलें नाहीं. अगदीं स्वाभाविक वाटतें तें. परक्याशीं बोलतांना 'सर' म्हटल्याशिवाय इथला माणूस वाक्य पुरें करीत नाहीं. 'चंद्रलेखा कॅफे'मध्यें कॉफी घ्यायला आम्ही गेलों असतां तिथल्या वेटरनें कॉफी देतां देतां 'युवर नेटिव्ह प्लेस, सर?' म्हणून मोठ्या आस्थेनें आम्ही कुठून आलों त्याची चवकशी केली! रात्रीं 'सुपर मेस' नांवाच्या खाणावळींत जेवायला गेलों. इथल्या जेवणाच्या पद्धतीची गंमत वाटली. आपल्या इथल्या हॉटेलांतल्याप्रमाणेंच स्टुलें आणि खुर्च्या मांडून ठेवलेल्या होत्या. प्रत्येक स्टुलावर एक थाळा, त्यांत एक वशी आणि वशींत पाणी भरलेलें एक पितळेचें फुलपात्र ठेवलेलें होतें. तुम्ही येऊन बसलांत कीं वाढपी तुमच्या पुढ्यांत वशी-थाळा फुलपात्रांतल्या पाण्यानें धुऊन, वशी आणि फुलपात्र बाजूला ठेवतो. भात, पापड, तळलेल्या घुगऱ्या, खोबऱ्याची पातळ चटणी आणि तिखट-आंबट सांबार मिळून जेवण एकंदरींत फार चवदार होतें.

● ● ●

*तारीख ६ मे १९५०*

*बंगलोरांत किर्लोस्कर*

इथें बंगलोरमध्यें इलेक्ट्रिक मोटारी करण्याचा किर्लोस्करांचा कारखाना आहे, आणि रवीन्द्र किर्लोस्कर त्याचे मुख्य आहेत. त्यांना तुम्ही अवश्य भेटा असें निवासांतले श्री. लिमये आम्हांला म्हणाले होते. त्याप्रमाणें कालच चिठ्ठी लिहून आम्ही आज सकाळीं सातलाच त्यांना भेटायचें ठरवलें होतें. आपल्याकडे प्रातरुपाहार करून आपण बरोबरच मोटारींतून कारखान्याकडे जाऊं असें त्यांनीं कळविलें होतें. सौभाग्यवती किर्लोस्कर बंगलोरांत नव्हत्या, तेव्हां अद्ययावत् अमेरिकन उपकरणांनीं सुसज्ज असलेल्या आपल्या सैंपाक-खोलींत रवीन्द्रांनीं स्वतःच अंडीं वगैरे तळून छानदार प्रातरुपाहार हां हां म्हणतां तयार केला; आणि नंतर बंगलोरपासून बऱ्याच दूर असलेल्या मल्लेश्वर या उपनगरांतल्या त्यांच्या कारखान्यांत आम्ही गेलों. कारखाना अजून नवाच आहे. एक ते पन्नास हॉर्स पॉवरच्या मोटारी इथें तयार होतात. बॉलबेअरिंज आणि इन्सुलेशनचें कांहीं सामान परदेशाहून मागवावें लागतें: बाकी सर्व भाग इथेंच तयार होतात. कारखान्याचा विशेष म्हणजे इथें काम करणारे सर्वच चोविशी-पंचविशीच्या आसपासचे आहेत. रवीन्द्र म्हणाले, ' आम्ही तरुण चुका खूप करतों; पण आम्ही कामहि खूप करतों. इथल्या लोकांच्या आणि सरकारच्या पुष्कळ गोष्टी किर्लोस्करांनीं आम्हांला सांगितल्या. मध्यम वर्गांतल्या लोकांचीसुद्धां छोटीशीं कां होईनात, पण या बंगलोरांत बहुतेकांचीं स्वतःची घरें आहेत. चाळी दिसणार नाहींत. प्रत्येक घरासमोर छोटीशीच रेखीव बाग दिसेल.

*सागराचा चिखल केला !*

' अधिक धान्य पिकवा ' मोहिमेच्या नादांत इथल्या सरकारनें औद्योगिक भरभराटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या म्हैसूरांत उडविलेल्या

गोंधळाचें किर्लोस्करांनीं चांगलेंच वर्णन केलें. इथल्या प्रख्यात कृष्ण-राजसागर तलावांत दोन वर्षें पाऊस पडला नाहीं तरी पुरेल इतकें पाणी नेहमीं असे, पण मंत्रिमंडळानें शेतीकरितां म्हणून त्याची भरमसाट उधळपट्टी केली; आणि आतां कृष्णराजसागरांत फक्त चिखल उरला आहे; आणि तोहि सुकत चालला आहे! त्यामुळें विजेचा तुटवडा इतका पडला आहे कीं म्हैसुरांतल्या कापडगिरण्या आठवड्यांतून तीनच दिवस चालतात. किर्लोस्करांचा कारखाना गुरुवार, शुक्रवार, शनिवार बंद असतो. एक प्रख्यात साखरेचा कारखाना अजिबात बंद पडला आहे. अन्न मुळींच अधिक पिकलें नाहीं; पण उद्योगधंद्यांचें मात्र कोट्यवधि रुपयांचें नुकसान झालें आहे आणि होत आहे. साऱ्या जगांत विजेचें उत्पादन करण्यांत म्हैसूरचा दुसरा नंबर लागतो. पन्नास वर्षांपूर्वी अमेरिकेंत पहिल्यांदा वीज आली, त्यानंतर म्हैसूरमध्यें, आणि मग इतर देशांत आली म्हणतात. त्या म्हैसूरची आज ही अशी स्थिति झाली आहे.

किर्लोस्करांच्या कारखान्याशेजारींच विजेच्या दिव्यांचे बल्ब किंवा गोळे बनवण्याचा 'मायसोर लॅम्प वर्क्स लिमिटेड' कारखाना आहे. तो फार पाहण्यासारखा आहे असें सांगून किर्लोस्करांनीं आपला एक माणूस आमच्यावरोबर देऊन आम्हांला तिथें पाठविलें. कारखाना छोटासाच आहे, पण तिथें होणारीं निरनिराळीं कामें पाहतांना मजा वाटते. कांचेचे गोळे अमेरिकेहून मागवतात. पण त्यांच्यांत मधली नळी भरणें, त्या नळींत तांब्याच्या सूक्ष्म तारा गुंफणें, प्रकाशाचें फूल देणारे केसर किंवा फिलामेन्ट्स भरणें, हवा काढून पितळेचें टोपण बसविणें वगैरे कामें इथेंच होतात. विजेनें चालणाऱ्या यंत्रावर हें सर्व आपोआप होत असतें. नळ्यांत केसासारखे सूक्ष्म केसर बसवण्याचें नाजूक काम नाका-कानांत हिऱ्यांच्या चमक्या घातलेल्या, रुंद पदराचीं भडक रंगाचीं मद्रासी लुगडीं नेसलेल्या कानडी मुली आपल्या नाजूक

बोटांनीं करीत होत्या. सध्यां दिवशीं तीन हजार दिवे तयार होतात. नवीन यंत्रें येऊन पडलीं आहेत. तीं सुरू झालीं म्हणजे दिवशीं दहा हजार होतील. कारखान्यावर देखरेख करण्याकरितां आपला एक अधिकारी सरकारनें सेक्रेटरी म्हणून नेमला आहे. आमच्या मुंबईच्या बाजारांत तुमचे हे म्हैसूर लँप्स कुठें दिसत नाहींत, असें मी त्याला म्हणालों; तेव्हां सध्यां तयार होणारा सर्व माल सार्वजनिक रस्ते, आपल्या कचेऱ्या वगैरेंत वापरण्याकरितां म्हैसूर सरकारच विकत घेतें, असें उत्तर त्यानें दिलें. उत्पादन वाढलें म्हणजे बाहेरच्या बाजारांत हे दिवे पाठवतां येतील, असें तो म्हणाला.

*स्वातंत्र्यानंतरहि महाराज !*

किर्लोस्करांचा कारखाना असलेल्या या मल्लेश्वर भागांतच साऱ्या भारतांत प्रख्यात असलेली बंगलोरची टाटा सायन्स इन्स्टिटयूट आहे. किर्लोस्करांनीं आम्हांला तिथें आणून सोडलें. गांवांत जायच्या बसचें स्टेशनहि इन्स्टिटयूटच्या दारांतच आहे. इन्स्टिटयूटचें आवार खूप मोठें आहे. अनेक लहान लहान इमारती त्यांत आहेत. पण मधली दगडी इमारत भव्य आहे. जिना चढून आम्ही वर गेलों. पहिल्या मजल्यावर ग्रंथालय आहे. दरवाजाशीं एक शिपायासारखा दिसणारा माणूस कठड्याच्या आंत बसला होता. कदाचित् तो कारकून असेल. कुणीहि असो, पण दलालांनीं आणि मीं,—आम्हीं हें ग्रंथालय पाहूं शकतों का, असें विचारल्यावर भलतेसलते प्रश्न न विचारतां किंवा उगाच गुर्मी न दाखवतां मोठ्या अदबीनें, तुम्ही खुशाल पाहूं शकतां म्हणून त्यानें आम्हांला सांगितलें आणि आंत सोडलें. निरनिराळ्या भव्य खोल्यांत त्या त्या शास्त्रावरचीं पुस्तकें आणि भिंतींवर प्रख्यात शास्त्रज्ञांचीं चित्रें दिसत होतीं. ग्रंथालयांत शिरतांना बाहेरच्या मोकळ्या जागेंत, हातांत या इमारतीचें मॉडेल घेतलेला

टाटांचा एक भव्य पुतळा दृष्टीला पडतो. टाटा इन्स्टिटयूट पाहून बसनें निवासांत परत येईपर्यंत दुपारचें पावणेबारा वाजले.

इथून जवळच 'नंदी हिल' नांवाचें एक हवेचें ठिकाण आहे तें उद्यां पाहण्याचा विचार आहे. नंदी बस सर्व्हिसच्या कचेरींत उद्यांचीं तिकिटें घेतलीं, आणि चारच्या सुमारास इथलें पुराणवस्तु संग्रहालय पाहावयाला गेलों. संग्रहालयाची लहानशीच पण टुमदार तांबड्या रंगाची इमारत आहे. चंदनाच्या वस्तु विशेष पाहण्यासारख्या होत्या. चंदनाचे बारीक धागे काढून तयार केलेली चवरी मजेदार वाटली. संग्रहालय पाहून झाल्यावर फोटोचें कांहीं सामान घेण्याकरितां 'साउथ परेड' या मुंबईंतल्या कोटासारख्या फॅशनेबल म्हणून प्रसिद्ध असलेल्या भागांत गेलों. युरोपियन पद्धतीचीं दुकानें होतीं, पण मुंबईच्या मानानें हा भाग फारसा मोठा वाटला नाहीं. साउथ परेड, ब्रिगेड रोड हीं स्वातंत्र्यपूर्व काळांतलीं नांवें आहेत. आतां साउथ परेडला महात्मा गांधी आणि ब्रिगेडऐवजी नेहरू रोड असें म्हणतात.

संध्याकाळीं 'कैंपेनगौडा टॉकीज' या थिएटरांत एक चित्रपट पाहावयाला गेलों. तिथें एक गोष्ट किंचित चमत्कारिक वाटली. सिनेमाच्या तिकिटावर करमणूक-कर म्हणून लावलेल्या पोस्टाच्या तिकिटावर म्हैसूरच्या महाराजांचें चित्र होतें. पण त्याहूनहि आश्चर्याची गोष्ट म्हणजे म्हैसूर विलीन होऊन भारताचा एक अविभाज्य भाग झालें असूनहि खेळ संपला तेव्हां वंदेमातरम् किंवा जनमनगण या राष्ट्रगीतांऐवजीं दुसऱ्याच कसल्यातरी गाण्याची रेकॉर्ड वाजत होती आणि पडद्यावर तिरंगी झेंडा किंवा गांधीजींचें चित्र दिसण्याऐवजीं म्हैसूरचे महाराज कसली तरी बक्षिसें वांटीत आहेत असें चित्र दिसत होतें!

● ● ●

*तारीख १० मे १९५०*

*रुसलेला नवरदेव रस्त्यांत बसला !*

'नंदी हिल'वर जायचें असल्यामुळें आज पहांटे साडेपांचलाच उठून साडेसातला बस सुटणार म्हणून 'नंदी हिल बस' कचेरीच्या दारांत सव्वासातला जाऊन उभे राहिलों. साडेआठ वाजले, नऊ वाजले तरी बसचा पत्ता नव्हताच, पण कचेरी उघडायलाहि कुणी आलें नाहीं. आम्ही दोघे, – मी आणि दलाल आणि दुसरे दोघे तिघे वाट पाहात उभे होतों; इतक्यांत नऊ वाजून दहा मिनिटांनीं आठ-दहा माणसांचीच सोय असलेली एक जुनाट व्हॅन तिथें आली. बस कंपनीच्या मालकाच्या घरांतल्या दोन वयस्क बाया आणि त्यांच्याबरोबर असलेला एक गचाळ दिसणारा नोकर व्हॅनमध्यें बसले होते. या मंडळींना वाटेंतल्या देवनहल्ली गांवांत कुणा नातेवाइकाच्या लग्नाला जायचें होतें. जरीच्या चवकटी असलेल्या गडद हिरव्यानिळ्या रंगाचीं लुगडीं नेसलेल्या त्या बायांच्या दोन्ही कानांत हिऱ्यांच्या कुड्या होत्या; इतकेंच नव्हे, तर दोन्ही नाकपुड्यांत हिऱ्यांच्या दोन चमक्या होत्या ! जास्त वयस्कर असलेल्या बाईचे गाल हळदीनें माखलेले होते. नवरानवरीच्याच नव्हे तर लग्नाला येणाऱ्या नातेवाइकांच्या अंगालाहि हळद लावण्याची इथें पद्धत आहे कीं काय ?

एका खेड्यांतल्या अरुंद रस्त्यांतून आमची मोटर चालली होती. एका घरापुढें भर रस्त्यांत तळपत्या उन्हांत अंगांत गंजीफ्रॉक, हातांत एक फुलांचा गुच्छ आणि डोक्याला मुंडावळ्या अशा थाटांत एक खेडवळ नवरामुलगा खुर्चीवर बसलेला दिसला. आमच्या मोटरीनें उडविलेल्या तांबड्या धुळीच्या ढगांत तो कांहीं क्षण अदृश्य झाला. त्याला मोटारीचा धक्का लागतो कीं काय अशी भीति मला वाटत होती. त्याच्यावर कुणीं छत्री धरण्याऐवजीं तो स्वतःच एक फाटकी

काळी छत्री, उजव्या हातांत फुलांचा गुच्छ असल्यामुळें, डाव्या हातांत धरून बसला होता ! हा इथें कशाला बसलाय म्हणून मीं ड्रायव्हरला विचारलें. ' तो रुसून बसलाय्, ' तो म्हणाला, ' आतां मेहुणा इथें येईल आणि त्याला अंगठी, टोपी, अंगरखा असं कांहीं देऊं करील तेव्हां तो उठून आंत जाईल. '

*नंदी हिलवरला यजमान अप्पा*

कांहीं वेळानें दूर हिरव्या झाडींत एकाद्या इंग्लिश खेड्यांतल्या लाल विटांच्या घरांप्रमाणें एक टुमदार घरासारखें कांहीं दिसलें. हें काय म्हणून विचारतां, हें नंदी रेल्वे स्टेशन आहे म्हणून ड्रायव्हरनें सांगितलें. आमची वडाळा, शींवसारखीं धुळकट, मळकट स्टेशनें पाहायची संवय असल्यामुळें हें स्टेशन असेल असें मला वाटलेंच नाहीं ! एका खेड्यांतून मोटर जात असतां आजूबाजूला मोठी बाग असलेलें एक देऊळ दिसलें. भोगनंदीश्वराचें तें देऊळ होतें. शंकरापेक्षां नंदीलाच इथें अधिक भाव दिसतो !

अठ्ठेचाळीसशें फूट उंच असलेल्या नंदी हिलवरल्या रस्त्याचीं कांहीं नागमोडी वळणें इतकीं उलटीं सुलटीं आहेत कीं मोटर वर जात असतां भीतीच वाटत होती. वनस्पतीचें एकहि पान कुठें नसलेला खडबडीत खडक आजूबाजूला एकसारखा दिसत होता. टिपू सुलतानाचा एक जुनाट किल्ला इथें आहे. किल्ल्याच्या दरवाजांतून मोटर आंत गेल्यावर आम्ही खालीं उतरलों. सबंध दिवस इथें घालवून संध्याकाळीं याच मोटरीनें बंगलोरला परत जायचें होतें.

दगडानें बांधून काढलेली एक प्रशस्त पुष्करिणी समोर दिसली. तिचें नांव ' अमृत सरोवर '. अमृत सरोवराच्या जवळच ' सुलतानाची चबुतरी ' नांवाचा एक किल्ल्याचा जुना अवशेष आहे. नंदी हिलवर बरेच सरकारी बंगले आहेत. डाक बंगल्याप्रमाणेंच सव्वातीन रुपये रोज, सव्वापांच रुपये अशा दरानें खोल्या भाड्यानें मिळतात. ' गांधी निलय '

नांवाचा एक छोटासा बंगला दिसला. त्यांत म्हैसूर हायकोर्टाचे एक न्यायाधीश राहात होते. असेच आणखी एक-दोन लहान लहान बंगले दिसले. इथली सर्वांत मोठी इमारत 'कब्वन हाउस'. १८३४ ते १८६१ पर्यंत म्हैसूर संस्थानचे कमिशनर असलेले सर मार्क कब्वन इथें उन्हाळ्यांत राहायला येत असत. शंभर वर्षांपूर्वीच्या व्हिक्टोरिया राणीच्या काळाची आठवण करून देणारीं, प्रशस्त दारें खिडक्यांचीं कांहीं अवाढव्य घरें मुंबईंत अजून दिसतात. तशाच प्रकारचें हें कब्वन हाउस आहे. पिंगपाँगची खोली, ग्रंथालय वगैरे एकाहून एक प्रशस्त दालनें या घराला आहेत. भव्य खांब असलेले व्हरांडे आहेत. ग्रंथालयांत कर्नाटक गॅझेटियर, मायसोर गॅझेटियर वगैरे ग्रंथांबरोबरच म्हैसूरचे वेळोवेळीं दिवाण असलेले सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या, सर आल्बियन बानर्जी, सर मिर्झा इस्माईल यांच्या भाषणांचेहि ग्रंथ आहेत. असे चार-पांच बंगले आणि धर्मशाळेसारखीं कांहीं घरें इथें असलीं तरी या नंदी हिलला हवेचें ठिकाण म्हणतां येणार नाहीं. हवा थंड वाटली नाहींच, पण दुकानें, बाजार वगैरे असलेलें हें एक गांव आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. खालीं पायथ्याशीं असलेल्या गांवांतून इथें सर्व पदार्थ आणावे लागतात. खाणावळवाल्याला या भागांत यजमान म्हणतात. 'सँकीरूम्स' नांवाच्या धर्मशाळेसारख्या दिसणाऱ्या एका दगडी घरांत एक खाणावळ आहे. आम्ही तिथें कॉफी घ्यायला गेलों तेव्हां इथल्या बहुतेक लोकांप्रमाणें सज्जन दिसणारा 'यजमानअप्पा' हंसतमुखानें आमच्या स्वागतासाठीं पुढें आला. 'नंदी हिल' पाहायला आलेले आमच्यासारखेच आंध्रमधले दोन कॉलेज विद्यार्थी आमच्याबरोबर फिरत होते. आम्हीं कॉफी घेतली, आणि हिलवर भटकून तास दीड तासानें जेवायला येतों म्हणून सांगितलें.

*टिपूच्या किल्यावरून*

कांहीं ठिकाणीं टिपूच्या किल्ल्याची जुनी तटबंदी आहे. तिथून

भर दुपारच्या उन्हांत झळझळत असलेल्या खालीं पसरलेल्या गांवांतल्या झाडीचें, घरांचें, तलावांचें, रस्त्यांचें दृश्य मजेदार दिसत होतें. घरांचे काळसर पुंजके, मध्येंच एकादा हिरवा हिरवा तलाव, देवळांचे सोनेरी कळस, या सर्वांमधून नागमोडीनें जाणारा तांबड्या मातीचा रस्ता आणि नंदी हिलवर येणाऱ्या रस्त्याच्या बाजूचे ताड-माड उंच, सरळ सोट युकॅलिप्टस् वृक्ष, या सर्वांना दुपारच्या उन्हानें रेखीव उठाव दिला होता. हिलवरच्या खडकांवर पोटाला विलगलेल्या आपल्या चिमुकल्या पोरांसह किती तरी माकडें इकडे-तिकडे उड्या मारीत होतीं. दोनच तांबड्या लाल पाकळ्यांचीं इवलींशीं सुंदर फुलें एका झुडुपावर दिसलीं. फुलें सुंदर होतीं, पण फांद्या बाभळीच्या झाडा-सारख्या कांट्यांनीं भरलेल्या होत्या. ते आंध्र विद्यार्थी म्हणाले, या झाडाचें नांव 'ख्राइस्ट्स् थॉर्न्स.' म्हणजे ख्रिस्ताला क्रूसावर चढवण्यापूर्वी मुकुट घातला होता तो या झुडुपाच्या फांद्यांचाच कीं काय ?

*अप्पा आणि अम्मांचा बाजार*

यजमानअप्पानें वाढलेला गरम गरम भात-सांबार खाऊन कब्बन हाउसमध्यें गेलो आणि व्हरांड्यांतल्या एका प्रशस्त कोचावर थोडा वेळ ताणून दिलें. चार वाजतां कॉफी घेऊन परत बंगलोरला निघालों. मोटर-मालकाच्या बायांना जातांना परत घ्यायचें होतें, म्हणून देवन-हळ्ळीला मोटर थांबली देवनहळ्ळींत बुधवारचा बाजार असतो, तेव्हां कानांत लाल खडे घातलेल्या आणि शेंड्याचे आंबाडे बांधलेल्या, गोल धोतर गुंडाळलेल्या बऱ्याच खेडवळ अप्पांचे आणि भडक रंगांचीं लुगडीं नेसलेल्या अम्मांचें घोळके आज रस्त्यांत दिसत होतें. लग्न-घराच्या दारांत बराच वेळ थांबल्यानंतर मालकाच्या बाया बाहेर आल्या आणि मोटर चालू झाली. तेवढ्यांत ड्रायव्हरअप्पालाहि लग्न-घरांतल्या माणसांनीं आग्रहानें जेवायला लावलें होतें ! तोंड पुशीत तो परत येत होता.

*खडी फोडयाचें ' पाप ऽऽ '*

निरनिराळ्या खेड्यांत मोटर जात असतां बऱ्याचशा खेड्यांच्या वेशीवर सर्पाकृति कोरलेले दगड मला दिसले. बसवंगुडींतल्या नंदीच्या देवळासमोर असलेच दगड होते. इथें नागपूजेचें प्रस्थ दिसतें. रस्त्यावर मधून मधून दोन उभ्या दगडी फळ्यांवर एक आडवी दगडी फरशीचीच चौकोनी पेटी ठिकठिकाणीं दिसली. तहानेल्या वाटसरूसाठीं त्यांत पाणी असतें असें कळलें. एक जख्ख म्हातारा खडीफोड्या रस्त्याच्या कडेला खडीच्या ढिगाशेजारीं दम टाकीत बसला होता. आमच्या ड्रायव्हरअप्पानें मुद्दाम गाडी थांबवून ' पा प ऽ ऽ ! ' म्हणजे ' अरेरे ! ' असें कांहींतरी पुटपुटत आपल्याजवळचें पाणी त्याला प्यायला दिलें ! वाटेंत एक मोठी पावसाची सर आली. मल्लेश्वरच्या आसपास आमची मोटर असतां पेट्रोल संपून ती जागच्या जागीं थबकली. संध्याकाळचे सात वाजले होते. आमचे आंध्र मित्र म्हाणाले, या मोटरीच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं; इथून मैल दीड मैलावर टाटा इन्स्टिटयूटजवळच बस स्टेशन आहे. तिथें चालत जाऊन आपण गांवांत जाणारी बस घेऊं या. खालीं उतरून ताबडतोब बसचा रस्ता धरला. निवासाकडे न जातां आम्ही सरळ बंगलोर स्टेशनकडेच गेलों. श्री. भौरसकर नांवाच्या गृहस्थांची निवासांत आमची ओळख झाली होती. कोइमतूरच्या फॉरेस्ट कॉलेजमध्यें शिकत असलेले त्यांचे धाकटे बंधू बंगलोरला कांहीं कामाकरितां आले होतें. ते परत कोइमतूरला जायचे होते. त्यांची ओळख करून देण्याकरितां मुद्दाम श्री. भौरसकरांनीं आम्हांला स्टेशनवर बोलावलें होतें. ' तुम्ही कोइमतूरला जाणारच आहां; तिथें माझे बंधू तुमची छान व्यवस्था करतील. ' भौरसकर म्हणाले होते. प्रवासांत अशीं सज्जन माणसें मधून मधून भेटतात, त्यामुळें प्रवासांतल्या दुःखापेक्षां सुखाच्याच आठवणी शिल्लक राहतात. बंगलोरमधल्या ' डेली न्यूज ' या इंग्लिश आणि ' ताई नाडू ' या

कानडी पत्राचे संपादक श्री. रामय्या यांचा आणि भौरसकरांचा फारच चांगला स्नेह आहे. बंगलोरमधल्या या चांगल्या माणसाला तुमच्या-सारख्या पत्रव्यवसायांतल्या माणसांनीं भेटलेंच पाहिजे म्हणून भौरस-करांनीं श्री. रामय्यांसाठीं आम्हांला एक पत्र लिहून दिलें. वाटेंत जेवण करून आम्ही निवासाकडे परतलों. केळीं चांगलीं कुठें मिळतील म्हणून इकडे तिकडे पाहात असतां एका पानविडीच्या दुकानांत उत्तम केळ्यांचे घड दिसले !

● ● ●

*तारीख ११ मे १९५०*

*थोर मनाचे श्री. रामय्या*

एकाद्या बड्या कॉलेजच्या इमारतीसारखी भव्य दगडी इमारत अस-लेल्या ' संस्कृत पाठशाळे 'च्या समोर चामराज पेठेंत ' ताई नाडू ' आणि ' डेली न्यूज 'ची कचेरी आहे. तिथें भौरसकरांचें पत्र घेऊन मालक-संपादक श्री. रामय्या यांना भेटायला सकाळीं १० वाजतां गेलों. अर्ध्या तासांत श्री. रामय्या येतील, आपण बसा, म्हणून तिथल्या माण-सानें सांगितलें. दोन-तीन खोल्यांची लहानशीच कचेरी होती, आणि दोन-तीन माणसें शांतपणें आपलें लिहिण्याचें किंवा टायपिंगचें काम करीत होतीं. साडेदहा वाजतां श्री. रामय्या आले. पन्नाशीच्या आस-पास त्यांचें वय असेल. महाराष्ट्रीयांसारखेंच पांढरें सकच्छ धोतर, लांब पांढरा कोट आणि डोक्याला पांढरा रुमाल त्यांनीं बांधला होता. त्यांच्या भरदार मिशा आणि सावळा चेहरा पाहून आमच्या मालवण-वेंगुर्ल्या-कडल्या एकाद्या उच्चकुलीन, सुखवस्तू म्हाताऱ्याची मला आठवण झाली. इकडे माती जशी कोंकणच्यासारखी तांबडीलाल, तशींच इकडलीं माणसें, विशेषतः म्हातारे स्त्रीपुरुष अगदीं कोंकणच्या लोकां-सारखे दिसतात. रामय्यांच्या बोलण्या-चालण्यांत सौजन्यशील साधेपणा-

बरोबरच एक प्रकारचा शांत आत्मविश्वासहि दृग्गोचर होत होता. ते कट्टर गांधीवादी कॉंग्रेसवाले असून म्हैसूर हरिजन संघाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या पत्राचे संपादक श्री. श्रीनिवासन यांची आमच्याशीं त्यांनीं ओळख करून दिली. श्रीनिवासन्‌हि कट्टर कॉंग्रेसवाले आहेत. म्हैसूरच्या कॉंग्रेस मंत्र्यांच्या चुकीच्या ‘ अधिक धान्य पिकवा ’ मोहिमेमुळें कृष्णराजसागर कोरडा पडला आणि म्हैसुरांत विजेचा तुटवडा पडून अनेक कारखाने बंद ठेवावे लागले या परिस्थितीवर चोहींकडून टीकेचा मारा होतो आहे, या गोष्टीचा मीं उल्लेख केल्याबरोबर ) श्रीनिवासन्‌नीं कॉंग्रेसच्या टीकाकारांवर कडाडून हल्ला चढवला. श्री. रामय्या आमच्यासाठीं कॉफी आणायला सांगून आमच्याशीं बोलतां बोलतां कचेरींत इकडे तिकडे फिरून निरनिराळ्या कामांची चवकशी आणि देखरेख करीतच होते. आमच्याशीं इतक्या आपलेपणानें ते वागत होते कीं बोलतां बोलतां ते दोनदां म्हणाले, ‘ तुम्हीं माझ्याकडे उतरायला पाहिजे होतें ’; पण लगेच आठवण होऊन ते हंसून उद्‌गारले, ‘ अरे पण, हो, आपली ओळख आजच झाली, नाहीं का ! — मात्र पुढल्या खेपेला तुम्हीं माझ्याकडेच यायला पाहिजे हं. ’ पांचपंचवीस पाहुणे त्यांच्याकडे नेहमींच असतात म्हणून भीरसकरांनीं आम्हाला सांगितलेंच होतें. ‘ बंगलोर’ मधला प्रख्यात विमानांचा कारखाना ’ ‘ हिंदुस्तान एअरक्रॅफ्ट फॅक्टरी - तुम्ही अवश्य पाहा; भलताच अवाढव्य आहे तो; असें म्हणून रामय्यांनीं ताबडतोब फॅक्टरीच्या जनरल मॅनेजरना टेलिफोन केला; आणि आम्हांला एक पत्र दिलें. ‘ तुम्ही इथून म्हैसूरला जाणार, तेव्हां तिथें कांहीं अडचण आल्यास माझे मित्र तिथले म्युनिसिपल कमिशनर श्री. नरसिंहमूर्ति आणि आमचे तिथले वातमीदार आणि म्हैसूर असेंब्लीचे सभासद असलेले एक प्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते श्रीनिवासमूर्ति यांनाहि पत्रें लिहून ठेवतों, ’ असें ते म्हणाले. त्यांचा निरोप घेऊन निघालों तेव्हां आपली मोटर निवासापर्यंत पोहोंचविण्याकरितां त्यांनीं

आम्हाला दिली; आणि गांवांत यांना आणखी कुठें जावयाचें असल्यास तिथेंहि घेऊन जा म्हणून ड्रायव्हरला सांगितलें. वाटेंत लालबाग नांवाची एक खूप मोठी जंगलासारखी पण सुव्यवस्थित ठेवलेली बाग आहे, ती आम्हीं पाहून घेतली. तिथलें एक झाड आणि त्याचीं फुलें अजब वाटलीं. वांग्यासारखें लांबलचक तांबडेंलाल एक एक फूल होतें. एकाद्या समारंभांत फुलांचे गुच्छ वांटण्याऐवजीं असलें एक एक फूल वांटावें !

*हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट*

'हिंदुस्तान एअर-क्रॅफ्ट फॅक्टरी' बंगलोरपासून कित्येक मैल दूर असलेल्या जळहळ्ळी या गांवांत आहे. फॅक्टरीची स्वतःची बस-सर्व्हिस आहे. तास दीड तासाच्या अंतरानें बंगलोरमधून फॅक्टरीकडे जाणाऱ्या बसेस सुटत असतात. बसच्या वेळा आणि नक्की कुठून सुटतात तें माहीत नसल्यामुळें आमच्या कांहीं गाड्या चुकल्या आणि फॅक्टरीकडे पोंचलों तेव्हां दुपारचे चार वाजले. फॅक्टरी पाहण्याची वेळ टळून गेली होती. अस्ताव्यस्त पसरलेला हा कारखाना खरोखरच अवाढव्य आहे. वेगवेगळीं साठ खातीं आहेत. त्याशिवाय इथून दीड मैलावर रेल्वेचे डबे बांधण्याचें एक वेगळें खातें आहे. दरवाजावरचा बंदोबस्त कडेकोट लष्करी आहे; कारखान्याचे मोठमोठे युरोपियन आणि अमेरिकन अधिकारी दरवाजापर्यंत मोटारीनें येत होते; पण त्यांनाहि परवान्याचा बिल्ला दरवानाला दाखविल्याशिवाय आंत जातां येत नव्हतें. दरवाजाला लागूनच 'वॉच अॅन्ड वॉर्ड' किंवा राखणदार खात्याची कचेरी आहे. तिथल्या माणसानें आम्हाला मोठ्या सौजन्यानें वागवलें. आणि इथलीं खातीं पाहण्याची वेळ आतां टळलेली असली, तरी रेल्वे कोचेस बांधण्याचें खातें इथून दीड मैलावर आहे तें पाहण्याची पाहिजे तर व्यवस्था करतों, असें तो आम्हांला सांगूं लागला. पण आम्हांला वेळ नसल्यामुळें त्याचे आभार मानून आम्ही परत निघालों. बाहेर

कामगारासाठीं असलेल्या कँटीनमध्यें कॉफी घेऊन कारखाना बाहेरूनच पाहावयाला मिळाला तरी जलहळ्ळीची एक सहल झाली असें मनाचें समाधान करीत बंगलोरला जाणारी बस पकडली !

● ● ●

*तारीख १२ मे '१९५०*

*कानडी लोकांचा भलेपणा*

सकाळीं ७-४० च्या गाडीनें म्हैसूरला जायला निघायचें असल्या-मुळें साडेसहालाच सामानाची बांधाबांध करून 'चंद्रकला कॅफे' त फक्त नऊ आण्यांत कॉफी, गरम गरम इडली आणि तिखटमिखट कानडी सांबाराचा प्रातरुपाहार केला आणि स्टेशनवर गेलों. दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत बरीच गर्दी होती; पण इथल्या उतारूंचें वर्तन आमच्याकड-ल्यांच्या उलट दिसलें. उगाच ऐसपैस जागा अडवून नवीन येणारांना 'इथें जागा नाहीं !' म्हणून गुरकावण्याऐवजीं शांतपणें एकमेकांना जागा करून देण्याचीच प्रवृत्ति दिसली. आम्ही शिरलों त्या कंपार्टमेंटमध्यें एक कुटंबवत्सल कानडी गृहस्थ बायकोमुलांसह एका बाकावर बसला होता आणि त्याचीं मुलें डबा उघडून कांहीं खात होतीं. बाकीचीं बाकें भरलेलीं होतीं. आम्ही आंत गेल्याबरोबर 'माफ करा हं — एका मिनि-टांत हे डबे वगैरे बाजूला करून तुम्हाला जागा करून देतों' असें म्हणून त्यानें मुलांना घाई करायला सुरुवात केली. मुलांचें स्वस्थपणें होऊं द्या म्हणून आम्हींच सांगितलें. युरोपमधल्या आगगाड्यांतल्या अनु-भवाची मला आठवण झाली आणि आमच्याहि देशांत निदान या बाजूला तरी युरोपइतकेंच या बाबतींत सुधारलेले लोक आहेत हें पाहून बरें वाटलें.

*मद्राशी डोंगर*

गाडी चालू झाल्यानंतर खिडकीबाहेर पाहूं लागलों तेव्हां एक

विचित्र विचार मनांत आला. दोन्ही बाजूंनीं लहान लहान झुडुपें आणि टेंकाडें दिसत होतीं. सपाट माळ कुठें दिसतच नव्हता. मद्राशी मुलुखांतले हे डोंगरहि 'मद्राशी'च झालेले दिसतात! आजूबाजूला दिसणारीं हीं टेंकाडें गुळगुळीत गोटा केलेल्या एकाद्या मद्राशाच्या डोक्यासारखीं दिसत होतीं. त्यांना डोंगर म्हणणें चुकीचेंच होतें. टोंकाकडे निमुळते होत गेलेले हे काळे कुळकुळीत खडक कुणींतरी अधून मधून आणून ठेवल्यासारखे दिसत होते. मद्दूर जंक्शनवर मसालावडा आणि बोंड्डवडा विकायला आले. असे बोंड्डवडे तुम्हाला कुठें मिळणार नाहींत म्हणून शेजारच्या माणसानें सांगितल्यामुळें बोंड्ड खाऊन पाहिले. खरोखरच फार खुसखुशीत आणि रुचकर होते. कांहीं वेळानें मंड्या स्टेशन आलें. गांवांत पांढरा रंग दिलेलीं पुष्कळ टुमदार घरें दिसत होतीं. इथेंच म्हैसूरमधला साखरेचा मोठा कारखाना आहे, असें कळलें. वाटेंत कावेरी नदी दिसली. तिचें पात्र अर्धेंअधिक सुकून गेलेलें होतें. श्रीरंगपट्टण आलें, आणि थोड्याच वेळांत म्हैसूर स्टेशनांत गाडी शिरली. तेव्हां अकरा वाजून पंचावन्न मिनिटें झालीं होतीं. गाडी वीस मिनिटें उशिरां आली.

म्हैसूर स्टेशनमधल्या टॅक्सीगाड्या एकाद्या लक्षाधीशाच्या मोटारींसारख्या भव्य आणि कोऱ्या करकरीत दिसत होत्या. म्हैसूरमधलें 'दशप्रकाश' हॉटेल छानदार आहे म्हणून कुणीं तरी सांगितलें होतें. त्याच हॉटेलांत उतरलों. इथल्या हॉटेलांची एक पद्धत मला फार आवडली. दिवशीं चार रुपये, सहा रुपये अशा खोल्या स्वच्छ स्नानगृहासह मिळतात. हॉटेलच्याच मालकीचें हॉटेलला लागून मोठें रेस्टोरां असतें. चहा, कॉफी, जेवण तिथून मिळतें. हॉटेलचें जेवण किंवा चहा, कॉफी घ्यायलाच पाहिजे असें नाहीं. दिवसाच्या भाड्यांत स्नानाचें पाणी, नोकर-चाकर एवढेंच मिळतें. दिवसभर कुठें फिरत असलें तर जेवायला परत येण्याची दगदग नाहीं.

*म्हैसुरांत पुणेरी टांगेवाला !*

स्नान, जेवण, करून विश्रांति घेतली आणि दुपारीं चार वाजतां एक टांगा करून फिरायला बाहेर पडलों. आमचे चेहरे पाहून टांगेवाल्यानें मराठींत विचारलें, ‘ साहेब, तुम्ही पुण्याचे का ? ’ म्हैसूरमध्यें मराठी बोलणारा टांगेवाला पाहून आम्हांला आश्चर्याचा धक्काच बसला ! टांगेवाल्याचें नांव दस्तगीर. त्याच्या टांग्याचें नांव शहापसंद ! टांगेवाला म्हणाला, ‘ साहेब, मी पुण्याचा आहें; इकडे नातेवाईक आहेत म्हणून इथें राहायला आलोंय् ! ’ म्हैसूरच्या प्रख्यात प्राणिसंग्रहालयाकडे टांगा घ्यायला आम्हीं त्याला सांगितलें. मुंबईच्या राणीच्या बागेच्या मानानें हा ‘ झू ’ मला लहान वाटला; पण पुष्कळ लोकांनीं म्हैसूर झूमधली वाघ सिंह ठेवण्याची पद्धति मजेदार आहे म्हणून सांगितलें होतें. शेंपन्नास फुटांवरून वाघ किंवा सिंह तुम्ही समोर उभें राहून पाहूं शकतां; मध्यें पिंजरा, गज कांहीं नाहीं ! एकदम कुणाला भीति वाटेल, पण भीतीचें कांहीं कारण नाहीं. वाघसिंहांना राहण्याकरितां पिंजरे आहेतच; पण पिंजऱ्याभोंवतालच्या खडकाळ, झाडेंझुडपें असलेल्या प्रशस्त मोकळ्या जागेंत ते स्वैरपणें फिरूं शकतात; आणि तुम्ही त्यांना पाहूं शकतां. भ्यायचें कारण नाहीं; कारण तुमच्या आणि त्यांच्यामध्यें एक किती तरी खोल आणि किती तरी रुंद असा खंदक असतो; त्याच्यावरून उडी मारणें त्यांना शक्यच नसतें ! झूमधला ‘ गोल्डन फेजंट ’ हा कोंबड्यासारखा एक पक्षी मला कमालीचा सुंदर वाटला. त्याच्या डोक्यावरला तुरा, त्याच्या पिसांचे सोनेरी, लाल, निळे रंग, त्याच्या शेपटाचा पिवळसर तपकिरी झुपका, सर्व कांहीं अद्‌भुतरम्य आहे. इथला आणखी एक पाहण्यासारखा चमत्कार म्हणजे पदार्थ-संग्रहालयाच्या इमारतीचा द्वाररक्षक सिद्धगोंडा. हा माणूस शरीरानें अगडबंब असून सात फूट तीन इंच उंच आहे ! झूमधले इतर प्राणी पाहण्याआधीं यालाच पाहात लोक बराच वेळ उभे राहतात !

पूजेचे घोडे, – बसण्याचे घोडे

झू पाहिल्यानंतर म्हैसूरची प्रख्यात अश्वशाला पाहायला गेलों. घोडा हें माझें अतिशय आवडतें जनावर आहे. सुंदर घोडा पाहिला कीं त्याच्या अंगावरून हात फिरवण्याचा मला अनिवार मोह होतो. इथें माझ्या जन्माची हौस फिटली. या घोड्यांचें वर्णन करायला माझ्याकडे शब्द नाहींत. मखमली तपकिरी रंगाचे, आपादमस्तक दुधाळ पांढरे, शास्त्रपुराणांत सांगितलेलीं सर्व काळींपांढरीं शुभचिन्हें अंगावर असलेले, बांकदार लांब मानेचे, डौलदार उंच मानेचे – कितीतरी घोडे रांगेनें आपापल्या चौकांत इथें उभे होते. प्रत्येकाचें नांव, वर्णन वगैरे चौकांत लावलेलें होतें. त्यांचे नम्र परिचारक हवी ती माहिती आनंदानें देत होते. पंढरपूरचा पांढरा घोडा, शुभ्र संगमरवराचा एकादा घोड्याचा पुतळा चालताहालता झाल्यासारखा दिसत होता. या घोड्याला पूजेचा घोडाच म्हणतात. स्वतः महाराज त्याची विशिष्ट दिवशीं पूजा करतात. एक पांढरा घोडा परिचारकानें खूण केल्यावर पाहुण्यांना नाचून दाखवतो! एक पुढले गुढगे टेंकून डोकें खालीं करून पाहुण्यांना नम्रपणें अभिवादन करतो! एका घोड्याचें नांव ‘ फील्ड मार्शल ’! लॉर्ड वेव्हलनें म्हैसूरला भेट दिली तेव्हां रपेट करायला हा घोडा पसंत केला होता म्हणतात! अश्वशालेच्या प्रवेशद्वाराजवळच्या दालनांत या घोड्यांचे जे ‘ ट्रेनर ’ होऊन गेले त्यांचे प्लास्टरचे लहान लहान उभे पुतळे आहेत. एका भव्य दालनांत महाराजांच्या नक्षीदार सोन्याच्या, रुप्याच्या, घोड्यांनीं ओढायच्या गाड्या आहेत. हत्तीनें ओढायचीहि एक अजस्र गाडी – किंवा गाडा म्हणाना – आहे! यांत बसून फिरायचें म्हणजे अरिष्टच; पण यालाच राजे लोकांचें वैभव म्हणतात! एक चौकोनी बंद शिग्राम-गाडी नोकरानें आम्हांला दाखवली. ‘ हिच्यांत बसून महाराजांच्या मातोश्री चामुंडीदेवीच्या दर्शनाला जातात, ’ तो म्हणाला. दुसऱ्या एका

दालनांत राजेसाहेबांच्या मोटारी आहेत. एकाहून एक भव्य अशा हिरव्या, पिवळ्या, तांबड्या रुपेरी चकचकीत रोल्स रॉइस, डेम्लर वगैरे किती तरी मोटरगाड्या इथें होत्या. मिरवणुकीकरितां रथासारखी दिसणारी एक उघडी मोटरगाडीहि होती !

*म्हैसुरांत निजाम !*

परततांना 'दरबार हॉटेल' नांवाच्या एका मुसलमानी हॉटेलांत जेवायला गेलों. या हॉटेलांतल्या भिंतीवरलीं चित्रें पाहून दोन महायुद्धें झालीं, भारत स्वतंत्र झाला, संस्थानें विलीन झालीं तरी सर्वसामान्य हिंदी मुसलमानांचीं मनें अजून कोणत्या काळांत वावरत आहेत याची चांगलीच कल्पना आली. अफगाणिस्तानचे अमानुल्ला, तुर्कस्तानचे सुलतान, हैदराबादचा निजाम यांचीं भव्य रंगीत चित्रें १९५० च्या मे महिन्यांत या हॉटेलाच्या भिंतीवर लटकत होतीं !

*कानडी महाराष्ट्रीय !*

रामय्यांचे म्हैसूरमधले वातमीदार श्री. श्रीनिवासमूर्ति यांना दुपारींच आम्हीं टेलिफोन केला होता. संध्याकाळीं ७–३० वाजतां ते आमच्या हॉटेलांत आम्हांला भेटायला आले. माणूस मोठा उमदा, बोलका आणि अष्टपैलू आहे. म्हैसूर शहरांतल्या 'हरिजन सेवा संघा'चे अध्यक्ष, म्हैसूर विद्यापीठाचे सिनेटर, म्हैसूर असेंब्लीचे सभासद, 'शकुंतला' नांवाच्या कला आणि संस्कृतीला वाहिलेल्या कानडी मासिकाचे संपादक अशीं त्यांचीं किती तरी बिरुदें आहेत. शांता आपटेपासून तों आपल्या म्हाताऱ्या आजीपर्यंतच्या अनेक गोष्टी त्यांनीं आम्हांला सांगितल्या. शेवटीं मूळचे ते महाराष्ट्रीय निघाले ! आपण मूळचे महाराष्ट्रीय देशस्थ ब्राह्मण असून आपली आजी मराठी उत्तम बोलते, ते म्हणाले. त्यांना मात्र मराठी येत नाहीं. आणि त्यांचे इंग्रजी उच्चारहि इथल्या कानडी माणसांसारखेच आहेत. 'तुमचे मुख्य मंत्री खेर इथें आले होते, तेव्हां आमचे दिवाण मिर्झा इस्माईल त्यांना इथलें एक नमुनेदार खेडें दाखवायला घेऊन गेले,' मूर्ति

म्हणाले, 'खेडुतांशीं खेर कानडींत बोलूं लागले तेव्हां सर मिर्झा चकित झाले!' संध्याकाळीं मेघांचा गडगडाट होऊन, विजा चमकून चांगलाच पाऊस पडला, त्यामुळें हवा थंड झाली आहे.

● ● ●

*तारीख १३ मे १९५०*

*इंद्रधनुष्यांचीं झाडें ?*

सकाळीं कॉफी झाल्यानंतर उगाच इकडे तिकडे रस्त्यावरून भटकत होतों. माणसांची धांवाधांव, गर्दी नसलेले म्हैसूर शहरांतले स्वच्छ, प्रशस्त रस्ते, टुमदार घरांच्या ओळी, मोठमोठे चौक, रेखीव व्यवस्थित ऐसपैस बागा, रस्त्यावरल्या दिव्यांच्या नक्षीदार, रुपेरी भव्य खांबांच्या रांगा हे सर्व पाहात या शहरांतून फिरणें म्हणजे एकाद्या विशाल, व्यवस्थित बागेंत फिरल्यासारखेंच वाटतें.

१०-३० ची बस घेऊन इथून दहा-बारा मैलांवर असलेला प्रसिद्ध कृष्णराजसागर आणि वृन्दावन बाग पाहायला गेलों. ११-१५ला पोहोंचलों. प्रचंड धरण असलेला हा 'सागर' खरोखरच समुद्रासारखा दिसतो. याच्या बाजूची विस्तीर्ण 'वृन्दावन' बाग तर जगांतल्या कोनाकोपऱ्यांतून प्रवासी पाहायला येतात अशी कीर्ति ऐकली होती. बागेंत एक अद्ययावत् युरोपियन पद्धतीचें मोठें थोरलें हॉटेल आहे. या उत्तुंग राजेशाही हॉटेलमध्यें राहून रात्रीच्या वेळीं ही वृन्दावन बाग पाहणें हा आयुष्यांतला एक अपूर्व अनुभव आहे असें लोक म्हणत. रात्रीं रंगीबेरंगी हजारों विजेचे दिवे पाण्यांत लागत, आणि त्यांच्यावर कारंज्यांच्या पाण्याचे फवारे उडत, तेव्हां इंद्रधनुष्यांच्या झाडांवर तारकांचीं फुलें फुललेल्या एकाद्या मयसभेंत आपण बसलों आहोंत असें वाटे, अशा कथा आम्हीं ऐकल्या होत्या; आणि दिवे लागलेल्या, फवारे उडत असलेल्या वृंदावन बागेचीं रंगीत छायाचित्रेंहि पाहिलीं होतीं. पण

म्हैसूरच्या लोकप्रिय मंत्रिमंडळानें कागदावर 'अधिक धान्य पिकवून' कृष्णराजसागराऐवजीं सुकलेल्या चिखलाचा कित्येक मैलांचा अफाट विस्तार – आणि वृंदावन बागेंत इंद्रधनुष्यांच्या वृक्षवेलींऐवजीं उथळ पाण्यावर उघड्या पडलेल्या, उन्हांत गंजून गेलेल्या कारंज्याच्या लोखंडी नळकांड्या आमच्या डोळ्यांसाठीं वाढून ठेवल्या होत्या! धरण बांधून सागर तयार झाला तेव्हां त्या टापूंतलीं कांहीं लहान लहान देवळें पाण्याखालीं बुडालीं होतीं. पाणी कितीहि कमी झालें तरी चाळीस वर्षांत तीं कुणाला दिसलीं नव्हतीं; पण म्हैसुरी लोकराज्याच्या अध्वर्यूंनीं कृष्णराजसागरांतल्या पाण्याचा थेंबन् थेंब आटवून जनतेला त्या देवळांतल्या देवांच्या दर्शनाला जाण्याची उत्कृष्ट सोय करून दिली, – असें तिथला एक माणूस, दूर तें काय दिसतें म्हणून आम्हीं विचारलें, तेव्हां म्हणाला!

*कावेरीमातेची भव्य मूर्ति*

धरणाला लागून उंच दगडी कमानींत उभी असलेली काळ्या दगडाची श्रीकावेरी मातेची भव्य मूर्ति किती तरी वेळ पाहात राहण्यासारखी आहे. चार हातांची रुबाबदार, रेखीव मूर्ति आहे. पुढल्या दोन हातांत एक घट आहे. घटांतून पाण्याची धार सतत पडत असते. मूर्तीच्या पायांशीं पादुका कोरल्या आहेत. त्यांवर लोक भक्तिभावानें गंधफुलें वाहतात. वृंदावन बागेच्या दाराशीं असलेली शुभ्र संगमरवराची राधाकृष्णांची मूर्तीहि गोंडस आहे.

तासाभरांत हें सर्व पाहून घेतलें आणि सव्वाबाराच्या बसनें परत निघालों. आजूबाजूला दिसणारीं आंबे, फणस यांचीं झाडें, काजूचीं बनें आणि तांबडीलाल माती पाहून हें कोंकणच वाटलें. एक वाजतां मार्केटजवळ उतरलों. इथले लोक कलात्मक खरे. बाजारांत भाज्या मांडतांनाहि त्यांनीं रंगसंगति साधली होती! हिरव्यागार टचटचींत भेंड्यांच्या राशीशेजारींच लालबुंद रसरशीत टोमॅटोंचा व्यवस्थित डोंगर

केला होता ! सव्वा रुपया डझन पायरीचे उत्तम आंबे, तर पिवळेधम्मक साफ केलेले फणसाचे गरे आण्याला तीन विकीत होते. आंबे-गरे विकत घेतले, हॉटेलांत येऊन जेवण केलें आणि थोडा वेळ झोंप घेऊन दुपारीं अडीचलाच बाहेर पडलों.

*टिपूसुलतानाचा दर्या-इ-दौलत*

कूर्गची राजधानी मर्कारा शहर इथून फक्त ऐंशी मैल आहे. म्हैसूर ते मर्कारा बस जाते असें कळलें होतें. कूर्गचीं जंगलें, कूर्गी मध, कूर्गचे लढवय्ये आणि कूर्गच्या सुंदर स्त्रिया यांच्यासंबंधीं खूपच ऐकलें होतें. तेव्हां एका दिवसाकरितां तरी मर्काऱ्याला जाऊन यायचा निश्चय केला होता. उद्यांचीं मर्काऱ्याचीं बसचीं तिकिटें घेऊन ठेवलीं, आणि श्रीरंगपट्टणला जाण्याकरितां स्टेशनवर गेलों. ३–४० ची गाडी मिळाली आणि ४–१६ ला श्रीरंगपट्टण स्टेशन आलें. म्हैसूरपासून आठ-नऊ मैलांवरच श्रीरंगपट्टण आहे. कावेरीच्या एका प्रवाहावरला पूल ओलांडून गाडी श्रीरंगपट्टण स्टेशनांत येते आणि कांहीं वेळानें दुसऱ्या प्रवाहावरला पूल ओलांडून गाडी पुढें जाते. म्हणजे नदी दुभंगून दोन प्रवाह झाले आहेत. मध्यें श्रीरंगपट्टण हें बेट आहे. पुढें पुन्हां दोन प्रवाह एक होऊन नदी वाहात गेली आहे. स्टेशनाला जुन्या देवळांच्या खांबासारखें कोरीव काम केलेले जुनाट लांकडी खांब आहेत. श्रीरंगपट्टण स्टेशनांत पाऊल टाकतांच तो टिपू सुलतान, तो वेलस्ली, तो माधवराव पेशव्यांनीं श्रीरंगपट्टणला घातलेला वेढा वगैरे वगैरे थरारून टाकणाऱ्या इतिहासाचीं पानें मनश्चक्षूंसमोर भरभरूं लागलीं. आतां श्रीरंगपट्टण हें एक लहानसें ओसाड गांव वाटतें. गांवाच्या दुसऱ्या टोंकाला असलेला ‘ दर्या–इ–दौलत ’ हा टिपूचा राजवाडा, हैदर, त्याची बायको आणि टिपू यांचीं थडगीं असलेला ‘ गुमझ ’ वगैरे दोन-तीन पाहण्यासारखीं ठिकाणें दाखवून परत स्टेशनवर आणून सोडण्याचें एका टांगेवाल्यानें कबूल केलें.

दर्या–इ–दौलत हा टिपूचा राजमहाल मोंगलांचें आग्रा-दिल्लीचें अचाट संगमरवरी महाल पाहिलेल्याला अगदींच लहान वाटतो. संगमरवर किंवा कसलाच दगड नाहीं. वीट-चुन्याच्याच भिंती असाव्यात, पण आंतल्या भव्य भिंतींचा गिलावा, त्यावर काढलेल्या लाल; हिरव्या, पिवळ्या फुलांच्या निरनिराळ्या आकृति, छतावरलें नाजूक रंगीत काम, जाळीदार खिडक्यांच्या कमानी वगैरे पाहिल्यानंतर हा आटोपशीर राजवाडा नजरेंत भरूं लागतो. कांहीं भिंतींवर लहान लहान चवकटी रंगवल्या आहेत. त्यांत राजे, राण्या, कांहीं मराठी सरदारांचींहि चित्रें आहेत. एका भिंतीवर लढाईचा भव्य देखावा आहे. त्यांत टिपूच्या सैन्यांतले फ्रेंच शिपाईहि दिसतात. भोंवतालची विस्तीर्ण बाग व्यवस्थित ठेवली आहे. पलीकडे कावेरीचें पात्र दिसतें. नदीच्या कांठाकडे जायला पायऱ्या आहेत. बागेंत एका बाजूला छोट्या छोट्या खांबांवर ठेवलेल्या लहान लहान लांकडी पेट्या दिसल्या. मधमाशा पाळून मध तयार करण्याची ही ‘ एपियरी ’ किंवा ‘ मधुवन ’ आहे. इथून कांहीं अंतरावर टिपू, हैदर वगैरेंचीं थडगीं असलेला गुमझ आहे. स्टेशनावर दिसलेल्या खालीं गोल, वर निमुळत्या लांकडी खांबासारखेच काळ्या कुळकुळीत दगडाचे खांब गुमझला पाहून स्टेशनाजवळच्या जुन्या तटबंदीकडे आलों.

*म्हैसूरचा वाघ इथें पडला*

कावेरीवरल्या या तटबंदीच्या आवर्तीभोंवर्तींच अनेक वेढे आणि अनेक लढायांचा इतिहास घडला. या तटबंदीखालीं एकाद्या कोरीव लेण्यासारखें एक चिरेबंद लांबरुंद तळघर आहे. त्याला ‘ कर्नल बेलीज डंजन ’ म्हणतात. त्यांत उतरून आम्ही फिरलों. साडेतीन वर्षें या तळघरांत कर्नल बेली आणि इतर ब्रिटिश सैन्याधिकारी यांना टिपूनें डांबून ठेवलें होतें. १७८४ सालीं त्यांची सुटका झाली म्हणे; पंधरा वर्षांनीं म्हणजे १७९९ सालीं कर्नल बेली श्रीरंगपट्टणला परत आला

आणि त्यानें टिपूचा पराभव करून बदला घेतला. तटबंदीजवळून जाणाऱ्या रस्त्यावर एके ठिकाणीं मैलाच्या दगडासारखा एक दगड आहे. त्यावर ' हिअर दी बॉडी ऑफ टिपू वॉज फाउंड् ' अशीं इंग्रजी अक्षरें कोरलेलीं आहेत. लढाईच्या धुमश्चक्रींत अनेक घावांनीं घायाळ झालेला ' म्हैसूरचा वाघ ' या जागीं मरून पडलेला आढळला.

*रंगनाथाचें देवालय*

जवळच बुरुजासारखें उंच गोपुर असलेलें रंगनाथाचें देवालय आहे. आमच्याकडल्याप्रमाणें इथल्या देवळांना निमुळतें होत गेलेलें एका कळसाचें शिखर नसतें. उभारलेल्या शिंगासारखीं दोन टोकें आणि मध्यें तीन, पांच किंवा सात कळस गोपुराला असतात. देवाल्याभोंवतीं किल्ल्याच्या तटबंदीसारखी भिंत आहे. ऐसपैस प्राकार ओलांडून गेलें कीं नजर ठरत नाहीं इतक्या दूरपर्यंत दगडी खांबांच्या रांगा आणि त्यानंतर गाभारा येतो. आमच्या देवाल्यांवरून आणि आमच्या देवतां-मूर्तींवरून या देवाल्यांची किंवा मूर्तींची कल्पनाच येणार नाहीं. गाभाऱ्यांतल्या काळोखांत आंतली मूर्ति प्रचंड असूनहि काळ्या दग-डाची असल्यामुळें चटकन दिसलीच नाहीं. काळ्या कुळकुळीत दग-डाचें दहा-पंधरा फूट लांब शेषाचें वेटोळें आहे आणि त्यावर त्याच रंगाचा भगवान् रंगनाथ आडवा झाला आहे. पायाशीं बसलेल्या लक्ष्मीची मूर्ति मात्र प्रचंड शेषाच्या आणि तितक्याच प्रचंड रंग-नाथाच्या मानानें अगदींच एवढीशी वाटली. पण बाजूला रंगनायकीचें वेगळें देऊळ आहे. प्राकाराच्या दाराशींच उभ्या असलेल्या द्वारपाला-कडून दोन आण्याला नारळ आणि केळीं देवापुढें ठेवायला मिळतात तीं घेतलीं होतीं. पुजाऱ्याच्या हातांत तीं दिलीं आणि देवाला नमस्कार केला. देव असो वा नसो हें सर्व करण्यांत मजा असते ! पुजाऱ्याशीं हिंदींत, इंग्रजींत बोलण्याचा प्रयत्न केला पण त्याला कांहीं समजेना. ' किन्नामधेयमत्रभवतः ? ' असें संस्कृतमध्यें विचारल्याबरोबर एकदम खूश





'नागराजा '(






उंची ८'-३"







टोडांचे देऊळ, ऊटी



टोडा लोक
ऊटी

होऊन आपलें नांव रामस्वामी भट्ट, मी इथला मुख्याचार्य आहें म्हणून त्यानें सांगितलें ! देवळाच्या एका काळोख्या कोंपऱ्यांतून एक काळाकभिन्न, उंच, हाडकुळ्या तोंडाचा किडकिडीत मद्रासी ब्राह्मण आमच्याकडे संशयी नजरेनें पाहतो आहे असें आम्हाला वाटलें. शर्टपँटमुळें आम्ही कुणी अहिंदू आहोंत असें समजून हा कोपलेला ब्राह्मण आम्हांला हांकलून देऊं पाहतो आहे कीं काय असा विचार आमच्या मनांत येतो न येतो तोंच तो पुढें येऊन, ' मला दोन आणे द्या — मी तुम्हांला देवळाचे सर्व भाग दाखवतों ' असें मोडक्या तोडक्या हिंदींत सांगूं लागला ! आपलें नांव कृष्ण अय्यंगार असें सांगून त्यानें रंगनायकीचें देऊळ वगैरे देवाल्याचे कांहीं भाग दाखवले. त्याला थोडा वेळ उभा करून दलालांनीं त्याचें ' स्केच ' केलें. मुख्याचार्य रामस्वामी भट्ट ' स्केच '-साठीं उभे राहिनात !

साडेसहाला श्रीरंगपट्टण स्टेशनांत आलों; आणि सात वाजून सात मिनिटांची गाडी पकडून म्हैसूरला परत आलों.

● ● ●

*तारीख १४ मे १९५०*

*परमेश्वराची ' पिन् कुशन् '*

म्हैसूरममधली चामुंडी टेंकडी आणि या ' चामुंडी हिल 'वरलें राजघराण्याची कुलदेवता चामुंडीदेवी हिचें देऊळ सुप्रसिद्ध आहे. पायथ्यापासून थेट वर देवळापर्यंत मोटारीचा डांबरी रस्ता आहे. रस्त्याच्या दुतर्फा विजेच्या दिव्यांचे खांब आहेत. टेंकडीवर इतरत्रहि ठिकठिकाणीं विजेचे दिवे आहेत. रात्रीं हे दिवे लखलखूं लागले कीं ही टेंकडी म्हणजे सोन्याच्या पिना खोंचून ठेवण्याची परमेश्वराची एकादी अजस्र ' पिन कुशन् ' आहे कीं काय, असें वाटतें !

*देवीपुढें तपश्चार्या !*

सकाळीं लवकर उठून आज चामुंडीदेवीचें देऊळ पाहावयाचें ठरविलें होतें. जाण्या-येण्याकरितां एक टॅक्सी ठरवून आठ वाजतां निघालों. टेंकडीच्या माथ्यावर गेल्यावर देवळाकडे रस्ता वळतो त्या कोंपऱ्यावरच तांबडीलाल जीभ, पिवळा देह, काळ्याभोर मिशा असलेला दहा-बारा फूट उंचीचा, एका हातांत एक लांबलचक साप आणि एकांत भलें मोठें नागवें खड्ग घेतलेला महिषासुराचा प्रचंड पुतळा दिसला. हा पुतळा इथें कशाला उभा केला आहे कोण जाणे ! देवळांत गेलों तों गाभाऱ्याच्या दारावर रेशमी पडदा सोडलेला दिसला. दर्शनाला आलेलें एक म्हैसुरी जोडपें हातांत नारळ, केळीं, कुंकूं, उदबत्ती, कापूर वगैरेनीं भरलेलीं परडी घेऊन दाराशीं उभें होतें. दाराशीं मिळणारी तसलीच एक परडी आम्हींहि घेतलीच होती. देवीचा अभिषेक आणि अलंकार चालला आहे, म्हणून पडदा सोडला आहे, असें पहिल्यांदा पुजाऱ्यानें सांगितलें. नंतर कांहीं वेळानें तो म्हणूं लागला, आतां अभिषेक अलंकार संपला आहे पण आज महाराणीसाहेब दर्शनाला येणार आहेत, तेव्हां त्या आल्यावर पडदा वर केला जाईल, आणि त्यांनीं दर्शन घेतल्यावर तुम्हांला दर्शन घेतां येईल ! गाभाऱ्याच्या एका बाजूच्या दारापासून तों पलीकडच्या एका सोप्यापर्यंत राणीसाहेबांच्या वाटेवर दोन्ही बाजूंनीं पडदे वगैरे लावण्याची तयारी चाललेली होती; आणि आतां लवकरच महाराणीसाहेब येणार असें भटजी म्हणत होते.

*देवळांत लोकशाही नाहीं !*

राणी येणार म्हणून इतरांना आधीं दर्शन घ्यायची काय म्हणून बंदी, असें कांहींतरी बायकांमुलांसह पूजेसाठीं थांबलेल्या त्या म्हैसुरी गृहस्थाला आम्हीं म्हटल्याबरोबर तोहि उसळला आणि म्हणाला, ‘ आतां लोकशाही आली तरी राजेराण्यांच्या आधीं

'आम्हांला दर्शन घेऊं देत नाहींत म्हणजे काय जुलूम आहे हा!' आम्हां लोकशाहीवाल्यांना जवळ उभ्या असलेल्या एका माणसानें सांगितलें कीं संस्थानांत लोकप्रतिनिधींचें मंत्रिमंडळ आलेलें असलें तरी या देवालयाची व्यवस्था राजघराण्याकडेच आहे. पुजाऱ्याला जोरांत पडदा वर करायला सांगितलें तेव्हां तो म्हणाला, 'पलीकडे देवालयाच्या कचेरींत मॅनेजरसाहेब बसलेत यांची परवानगी घेऊन या म्हणजे मी पडदा वर करतों.' झुळझुळीत रेशमी वस्त्र अंगावर घेतलेल्या, तुळतुळीत हजामत केलेल्या, कपाळावर लाल पांढऱ्या गंधाचा उभा त्रिपुण्ड्र लावलेल्या तुकतुकीत गोऱ्या वयोवृद्ध मॅनेजरसाहेबांना आम्हीं परवानगी विचारली, तेव्हां उत्तम इंग्रजींत तसें करतां येत नाहीं म्हणून त्यांनीं शांतपणें सांगितलें! देवळाची माहिती आम्हांला देत असलेला तिथला एक लटपट्या माणूस, कांहीं वेळानें मॅनेजरला भेटून आला तेव्हां त्यानें परवानगी दिली आणि ताबडतोब राणीसाहेबांची वाट न पाहतां पुजाऱ्यानें पडदा बाजूला सारला! चामुंडीमातेची सुवर्णखचित मूर्ति सुबक आहे. पुजाऱ्यानें आरती प्रसादहि करून टाकला. राणीसाहेबांचे काय झालें कुणाला ठाऊक!

*गांववाला भेटला*

हॉटेलांत येऊन घाईनें जेवून घेतलें आणि मर्काऱ्याला जाणाऱ्या बसच्या कचेरींत साडेदहालाच आलों. बस अकराला सुटणार म्हणून घाई केली. पण सव्वा वाजेपर्यंत बसचा पत्ता नव्हता. मर्काऱ्याहून साडेदहाला बस येते आणि तीच सुटते असें बस सर्व्हिसचा तिथें बसलेला मालक सांगत होता. आपण मूळचा मंगळुरी कोंकणी पण म्हैसुरांत येऊन आपल्या घराण्याला शंभर वर्षें झालीं, तो सांगूं लागला. दलाल त्याच्याशीं कोंकणींत बोलूं लागले तेव्हां त्याच्या गप्पांना ऊत आला! 'कशाला त्या दश-प्रकाश हॉटेलाला दिवशीं चार रुपये भरतां,— आमच्या बस सर्व्हिसच्या कचेरीला लागून उतारूंसाठीं खोल्या आहेत

तिथें आठ दिवस आम्ही फुकट राह्यला देतों,' तो सांगत होता. म्हैसूरहून घाटमाथ्यापर्यंत मर्कारा ऐंशी मैल, आणि मर्काऱ्याहून किनाऱ्याकडे मंगळूर पुढें आणखी ऐंशी मैल, त्यानें माहिती दिली. दीड वाजतां बस सुटली.

*सागाच्या पायाशीं कॉफी*

कांहीं वेळानें हुन्सूर गांवांत बस थांबली. घरें – दुकानांवरून हुन्सूर मोठें शहर दिसतें. म्हैसूर सरकारचीं 'कॉफी एस्टेट वर्क्स' इथें आहेत. कुठें कॉफी मिळेल का म्हणून चवकशी केली, तेव्हां गांवांत कॉलऱ्याची साथ चालू असल्यामुळें आरोग्य खात्यानें सर्व कॉफीचीं दुकानें बंद करण्याचा हुकूम सोडल्याचें कळलें. सात-आठ मैल पुढें गेल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सागाचे धिप्पाड वृक्ष आणि वेळूचीं दाट बेटें दिसूं लागलीं. इतक्यांत कूर्गच्या हद्दीवरलें पोलिस-नाकें आलें, आणि पोलिस तपासणीसाठीं बस थांबली. बसची आणि उतारूंच्या सामानाची पोलिसांनीं करून तपासणी केल्यानंतर बस पुढें चालू झाली. आतां गर्द जंगलांतून नागमोडी रस्त्यानें आम्ही वरवर जात होतों. दोन्ही बाजूंना कॉफीच्या झाडांचे मळेच मळे दिसत होते. कॉफीचीं झाडें फारशीं उंच नसतात. बहुतेक मळ्यांत मधून मधून उंच उंच साग आणि त्यावर पानवेली चढवलेल्या दिसत होत्या. एखाद्या उंच माणसाभोंवतीं त्याच्या गुडघ्याइतक्या उंच पोरांचा घोळका जमून उभा राहावा तशी या सागांशेजारीं कॉफीचीं झाडें दिसत होतीं. रस्त्यावरच्या बाजूला मधून मधून दिसणारी जंगली मुंग्यांचीं वारुळें पुरुष-पुरुष उंच होतीं. बराचसा घाट चढून गेल्यानंतर सिद्धपूर हें गांव आलें. आजूबाजूचे डोंगर आणि दाट जंगलें पाहून हें गांव डोंगराच्या कुशींत जंगलाचें पांघरूण घेऊन झोंपल्यासारखें दिसतें! इथून मर्कारा फक्त सोळा मैल आहे. माड, पोफळी, केळीचीं बनें, आणि मुळापासून वरपर्यंत, दोन हातांत मावणार नाहींत एवढीं फळें लागलेलीं मोठमोठीं

फणसाचीं झाडेंहि मधून मधून दिसत, आणि कोंकणची आठवण करून देत. कांहीं वेळां तर इतक्या दाट जंगलांतून आम्ही जात होतों कीं सूर्य मावळून गेला असावा अशी आमची कल्पना झाली, आणि पुन्हा उजेड दिसला तेव्हां, 'अरे, सूर्य आहे कीं अजून !' असें आम्ही उद्गारलों !

*उंटा इल्ला !*

शेवटच्या सात-आठ मैलांची चढण चढत असतां सिमला, मसूरी-सारख्या हिमालयांतल्या हवेच्या ठिकाणीं दिसणाऱ्या देखाव्याची आठवण झाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना, उंच उंच यूकॅलिप्टस्, पाइन वगैरे वृक्ष होते. बसनें एकादें वळण घेतलें कीं काळसर हिरव्या दाट जंगलानें भरलेली दूरवर पसरलेली खोल दरी दिसे. या जंगलांत भरपूर हत्ती आणि वाघ आहेत, म्हणतात. मर्काऱ्याच्या बाजारांत बस येऊन थांबली तेव्हां संध्याकाळचे सव्वासात वाजले होते.

'उंटा इल्ला' म्हणजे काय कुणाला ठाऊक, पण 'उंटा इल्ला, उंटा-इल्ला' करीत हमालांनीं आमच्याभोंवतीं गिल्ला केला. जंगल-दऱ्यांत काळोखाच्या वेळीं डाकबंगला कुठें शोधीत बसायचें असा विचार करून हमालांना 'हॉटेल – हॉटेल' असें म्हणालों, आणि ते नेतील त्या हॉटेलकडे निघालों. बाजाराचा अरुंद रस्ता, गटारें, दुकानांतल्या दिव्यांच्या झगझगाटांत कर्कश गाणीं दळींत असलेले ग्रामोफोन, मोपल्यासारख्या दिसणाऱ्या मंगळुरी मुसलमानांची वर्दळ वगैरे पाहून कल्याण-ठाण्याकडल्या बाजारगल्ल्यांची आठवण झाली. एका एकमजली चाळींत तळमजल्यावर चहा, चिवडा, भात सांबाराची प्लेट वगैरेचें हॉटेल होतें आणि वरच्या मजल्यावर तीन-चार खोल्या होत्या. हें 'न्यू कॅफे' उत्तम असल्याचें हमालांनीं खुणेनें सांगून आमच्या बॅगा वर न्यायला सुरुवातहि केली. आम्हींहि फारसा विचार न करतां एक खोली घेतली आणि सामान आंत टाकलें. खालच्या हॉटेलांत भात-सांबार खाऊन झोंपण्यापूर्वीं थोडा वेळ भटकायला बाहेर पडलों. आतां नऊ साडेनऊ

वाजले होते. बाजार सोडून पुढें गेल्यावर दोन्ही बाजूंना कोकणांतल्या-सारखीं छोटीं छोटीं घरें दिसूं लागलीं. इथें इतकी शांतता होती कीं माणसेंच काय, पण घरेंहि झोंपल्यासारखीं दिसत होतीं! माथेरान, महाबळेश्वरसारखें हें डोंगरी गांव असल्यामुळें रस्ता सारखा वर वरच चढत जात होता. दूरच्या कांहीं घरांवर धूर गोळा झाल्यासारखा दिसत होता. पुढें गेल्यावर लक्षांत आलें कीं ते ढग होते! पुढें पुढें तर धुक्यामुळें पुढचें कांहीं दिसेना. परत फिरलों तों अर्ध्या वाटेवर एक पावसाची सर येऊन गेली; पण एकाद्या भटक्या ढगानें आमची गंमत केली असें वाटतें; कारण थोडें पुढें गेल्यावर रस्ता कोरडा होता!

● ● ●

*तारीख १५ मे १९५●*

*नेहरु लंच होम*

पहांटे साडेपांचला जागा झालों. बाहेर येऊन आकाशाकडे पाहिलें तों इतर तारका मलूल झाल्या होत्या आणि शुक्राचा तारा ठळकपणें झळझळत होता. नुकत्याच जाग्या झालेल्या पक्ष्यांची किलबिल ऐकत निळ्या आकाशांत शुभ्र तेज उधळणाऱ्या त्या एकमेव ताऱ्याकडे पाहात राहण्यांत मजा वाटली. कांहीं वेळानें तोंड धुऊन चहा-कॉफी कुठें मिळते का पाहायला बाहेर पडलों. रस्यावरलीं दुकानें उघडलीं नव्हतीं. भटकतां भटकतां एका ‘ नेहरू लंच होम ’चा दरवाजा उघडलेला दिसला. आंत कुणी दिसत नव्हतें. टेबल थडथडावलें तेव्हां डोळे चोळीत एक माणूस आला आणि कॉफी करून देतों म्हणाला. कॉफी घेऊन ‘ ट्रॅव्हेलर्स बंगला ’ शोधून काढला आणि ‘ न्यू कॅफे ’चे पैसे चुकते करून बंगल्यांत सामान आणून टाकलें. दुपारींच म्हैसूरला परत जायला निघायचें होतें, पण आरामांत प्रातरुपाहार, दुपारचें जेवण वगैरे करावें असा विचार करून, – तें ठिकठिकाणीं उकरलेल्या

जमिनीचें आणि कोळिष्टकें लोंबणाऱ्या छपराचें गांवठी हॉटेल सोडलें. इथले लोक या बंगल्याला ' टी. बी. ' म्हणतात ! हिरव्यागार झाडींत असलेल्या या ' टी. बी. 'ची जागा फारच मोक्याची आहे. व्हरांड्यांत खुर्ची टाकून बसलें कीं समोर उंच हिरव्या वृक्षांनीं भरलेल्या दऱ्या आणि निळसर डोंगरांच्या रांगामागें रांगा दिसतात.

*करिअप्पा आणि थिमय्या*

खानसाम्यानें तयार केलेला उत्तम चहा आणि पावलोणी खाऊन कूर्गची ही राजधानी पाहावयाला बाहेर पडलों. हवा फारशी थंड नसली, तरी अडतीसशें फूट उंचीवर असलेलें मर्कारा शहर सिमला, मसूरीसारख्या एखाद्या हवेच्या ठिकाणासारखेंच आहे. डोंगराळ जमिनीवर एक रस्ता खालीं तर दुसरा वर असल्यामुळें कांहीं घरांचा तळमजला एका रस्त्यावर तर तिसरा मजला दुसऱ्या रस्त्यावर आहे ! गडद हिरव्या झाडीनें भरलेल्या डोंगरांचें कडें सभोंवार आणि मध्यें मर्कारा शहर वसलें आहे, असें वाटतें. वरल्या रस्त्यावरून जातांना शहरांतल्या एका भागांतल्या घरांच्या नुसत्या छपरांची दाटी दिसते. वरल्या रस्त्यावरून दिसणाऱ्या घरांच्या दाटीकडे सहज नजर टाकली तर चार-पांच मशिदींचे घुमट आणि मनोरे कुठें कुठें दिसले; दोनचार चर्चांचीं टोंकदार शिखरेंहि दिसलीं, पण हिंदू देवळांचा कळस कुठें दृष्टीस पडला नाहीं. देवळें असतीलहि; ठळकपणें दिसलीं नाहींत इतकेंच. एका टोंकाला मर्काऱ्याचा जुना किल्ला आहे. सभोंवार तटबंदी आहे आणि मधल्या एका घरांत सरकारचें मलेरिया प्रतिबंधक खातें आहे ! मुख्य रस्ता सोडून बाजूला वळलें कीं सभोंवार सुंदर बागा असलेले छोटे छोटे बंगले, मिशनऱ्यांचें कॉन्व्हेंट स्कूल, वगैरे दिसतात. सहा पाकळ्यांचीं पिवळीं गवती फुलें आणि लाल लिलीचीं फुलेंहि पुष्कळ ठिकाणीं दिसलीं. आपले सरसेनापति जनरल करिअप्पा, काश्मीरमधले आपले सेनानी जनरल थिमय्या हीं नांवें

आतां भारतांत सर्वांच्या परिचयाचीं झालीं आहेत. हे वीर पुरुष कूर्गनेंच भारताला दिले. इथें दोन-चार दुकानांवर आणि लांकडें कापण्याच्या कारखान्यांवर करिअप्पा, थिमय्या हीं नांवें मीं वाचलीं! पुष्कळचा तिमय्या ' आणि 'करिअप्पा ' इथें आहेत! एका घराकडे बोट दाखवून कुणीसा म्हणाला, ' आपल्या जनरल करिअप्पाचें हें घर. सेवानिवृत्त तहसीलदार असलेले त्यांचे वृद्ध वडील इथेंच राहतात. '

*जिप्सीसारख्या दिसणाऱ्या सुंदर कूर्गी स्त्रिया*

रस्त्यांत दिसणाऱ्या कूर्गी स्त्रीपुरुषांचा वेष एकदम डोळ्यांत भरतो. पुरुष लुंगीसारखें गोल धोतर गुंडाळतात, वर कोट घालतात आणि हिरव्या किंवा तांबड्या रेघांचें पांढरें फडकें अरबांसारखें डोक्याला बांधतात. बायकांना पाहिलें कीं जिप्सी किंवा बलुची स्त्रियांची आठवण होतें. आपल्या पातळाचा पदर खांद्यांवरून न घेतां संन्याशाच्या छाटी-सारखा दोन्ही बगलांतून मागें घेऊन गांठ मारून किंवा पिननें कूर्गी स्त्रिया अडकवतात, मनगटापर्यंत लांब हाताचें पोलकें घालतात, आणि डोक्याला पुरुषांच्यासारखेंच मागें शेमला सोडलेलें फडकें बांधतात! या कपड्यामुळें आणि बहुतेक स्त्रीपुरुष उजळ रंगाचे असल्यामुळें कानडी किंवा मद्रासी स्त्रीपुरुषांशीं त्यांचें कांहींच साम्य दिसत नाहीं. बायका तर चांगल्याच गौरवर्ण आणि विशाल काळ्याभोर डोळ्यांच्या दिसल्या. लहान मुली जिप्सी बायांप्रमाणेंच लाल किंवा हिरवा-पिवळा लेहेंगा, वर लांब हाताचा सदरा आणि डोक्याला फडकें बांधतात. बहुतेक म्हाताऱ्या कूर्गी बायका पांढरें पातळ आणि डोक्याला पांढरेंच फडकें बांधलेल्या दिसल्या. तरुण स्त्रिया आपल्या स्त्रियांच्या सारखींच रंगीबेरंगीं पातळें पण कूर्गी पद्धतीनें नेसलेल्या आणि डोक्याला रंगीबेरंगीं फडकें बांधलेल्या होत्या. सोनेरी जरतारीचें भरत-काम केलेलें रंगीत रेशमी फडकें डोक्याला बांधलेल्या, भरजरी उंची रंगीत पातळांतल्या कांहीं गोऱ्यापान श्रीमंत कूर्गी तरुणीहि अधूनमधून

आढळल्या. सुधारलेल्या किंवा सुशिक्षित कुर्गी बायका पातळ कूर्गी पद्धतीनेंच पेहेरतात, पण डोक्याला फडेंक बांधीत नाहींत असें दिसतें. दुपारीं दीडच्या बसनें परत निघालों तेव्हां एका जोडप्याला घेण्या-करितां एका घराच्या दारांत बसवाल्यानें बस उभी केली होती. श्रीमंत कूर्गी कुटुंबाचा बंगला दिसत होता. नुकतेंच लग्न झालेलें हें जोडपें म्हैसूरला जात असावें. जरतारी रंगीत रुमाल डोक्याला बांधलेल्या आणि जरीचें उंची पातळ परिधान केलेल्या त्या केवड्याच्या पाना-सारख्या गोऱ्या कूर्गी नववधूच्या डाव्या हातांत सर्व लाल बांगड्या होत्या, आणि उजव्यांत सर्व हिरव्या होत्या. रुंद कपाळावर कुंकवाचा ठळक टिळा होता, त्यामुळेंच मी तिला नववधू म्हणतों. खरें खोटें परमेश्वर जाणे! दाराशीं आलेल्या वडील स्त्री-पुरुषांना तिनें लवून दोन्ही हात जोडून नमस्कार केला, आणि नवऱ्यासह ती बसमध्यें येऊन बसली.

येतांना सिद्धपूरच्या रस्त्यानें न जातां फ्रेजरपेठ गांवावरून बस गेली. म्हैसूरला संध्याकाळीं ७ ला पोहोंचलों.

● ● ●

*तारीख १६ मे १९५५*

*सहाशें रुपयांची चंदनी पेटी*

प्रख्यात ' चामराजेंद्र टेक्निकल इन्स्टिटयूट ' पाहावयाला आज सकाळीं ९ वाजतां गेलों, पण वार्षिक ' स्टॉक टेकिंग ' चालू अस-ल्यामुळें इन्स्टिटयूट आठ दिवस बंद असल्याचें कळलें! तिथला माणूस म्हणाला, ' शोरूम्स बंद आहेत, तुम्ही कारखाना पाहूं शकतां. ' कारखान्यांतील निरनिराळीं खातीं पाहिलीं. एका खात्यांत पितळेच्या आणि ब्रॉन्झच्या लहान-मोठ्या मूर्ति बनवीत होते. इथलें चंदनाचें काम जगांत प्रसिद्ध आहे. त्या खात्यांत चंदनावर चाललेलें नाजुक कोरीव

काम पाहण्यासारखें होतें. एका चंदनाच्या पेटीवर जंगलांतल्या झाडीं-तून एक चित्ता हत्तीवर झडप घालतो आहे असें चित्र एक माणूस कोरीत होता. त्यांतलीं झाडें, तो चित्ता आणि भोंवतालचें नाजूक नक्षी उठावदार करण्याचें कौशल्य प्रेक्षणीय होतें. चित्रकलेच्या पहिल्या, दुसऱ्या आणि पांचव्या वर्षाचे वर्ग सुट्टीनंतर आजच सुरू झाले होते. शोरूम्स बाहेरून बंद असल्या तरी दरवाज्याच्या कांचांतून आंतला सुंदर माल दिसूं शकत होता. चंदनाच्या लहान-मोठ्या मूर्ति, हस्ति-दंताच्या पेट्या, वेताच्या खुर्च्या वगैरे माल फारच सुंदर वाटला. झडप घालणारा चित्ता कोरलेली दहा बारा इंच लांब आणि सात-आठ इंच रुंद चंदनाची पेटी सहाशें रुपये किंमतीची होती !

*जगन्मोहन राजवाडा*

इन्स्टिटयूट पाहिल्यानंतर 'जगन्मोहन राजवाडा' पाहायला गेलों. या जुन्या राजवाड्याची 'चित्रशाळा' किंवा एक कायमचें चित्रकला प्रदर्शन केलें आहे. प्रवेश फी फक्त दोन आणे आहे. एका प्रशस्त दालनाचें नांव रविवर्मा हॉल आहे. त्यांत रविवर्म्याचीं प्रख्यात चित्रें लावलीं आहेत. मत्स्यगंधा, जटायुवध, देवकीकृष्ण भेट वगैरे चित्रांच्या मूळ प्रती इथें आहेत. एका चित्रांत भारतांतल्या निरनिराळ्या धर्मांच्या आणि निरनिराळ्या प्रांतांतल्या स्त्रिया त्यांच्या विशिष्ट वेषांत रविवर्म्यांनीं रंगविल्या आहेत. पार्शी, ख्रिश्चन बायांच्या खांद्याला खांदा लावून मल्याळी, कानडी वगैरे स्त्रिया उभ्या आहेत.

दुसऱ्या एका दालनाचें नांव 'रोअरिख हॉल'. हिमालयाच्या प्रेमांत पडून प्रख्यात रशियन चित्रकार निकोलाय रोअरिख कित्येक वर्षें हिमालयांतच वास्तव्य करीत होता. भडक निळसर, काळसर हिरव्या, लाल भडक रंगांत त्यानें रंगविलेलीं हिमालयाचीं चित्रें विख्यात आहेत. त्यांतलीं कांहीं या हॉलमध्यें पाहावयास मिळतात.

गगनेंद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, यांच्याबरोबर कनू देसाई, हळ-

दणकर हीहि नांवें दिसलीं. हदळणकरांचें आरति हातांत घेतलेल्या स्त्रीचें सुप्रसिद्ध चित्र इथें आहे.

*टिप्पूची दर्यादौलत आठवली*

राजवाड्याच्या तळमजल्यावर म्हैसूरच्या महाराजांचीं मोठमोठीं तैलचित्रें आणि अर्धपुतळे आहेत. मरून पडलेल्या टिप्पू सुलतानाचा देह कर्नल बेलीच्या नजरेला पडला तो ऐतिहासिक देखावा एका भव्य चित्रांत रंगविला आहे. हा जुना राजवाडा पाहतांना श्रीरंगपट्टण येथें पाहिलेल्या टिप्पूच्या 'दर्या-इ-दौलत 'ची आठवण झाली. अगदीं वरच्या मजल्यावरल्या रंगमहालाचे निळ्या, पिवळ्या, लाल रंगाचे कमानदार दरवाजे, खिडक्या, पहिले कृष्णराज वोडियार यांच्या दसरा मिरवणुकीच्या चित्रांनीं रंगविलेल्या भिंती, कांहीं भिंतींवरल्या सचित्र रंगीत चवकटी वगैरे टिप्पूच्या राजवाड्यांतल्यासारख्याच आहेत. एका दालनांत नाना प्रकारचीं जुनीं वाद्यें, भारतीय आणि इतर वाद्यें आहेत. साडेअकराला हॉटेलांत परत आलों.

संध्याकाळीं 'मायसोर सिल्क फॅक्टरी' पाहावयाला गेलों. तयार मालाच्या 'शो-रूम्स' पांच वाजल्यामुळें बंद झाल्या होत्या, पण निरनिराळ्या वेलबुट्ट्या कोरलेले पुठ्ठे खालीं ठेवून विशिष्ट प्रकारच्या मागांवर साड्यांच्या पदरावरलें जरतारी काम कसें करतात तें पाहावयाला मिळालें.

तिथून चंदनाच्या तेलाचा कारखाना पाहावयाला जायचें ठरविलें होतें. टांगेवाल्याला तो कुठें सांपडेना, पण कांहीं वेळानें चंदनाचा सुगंध वाऱ्याच्या झुळुकीबरोबर कुठून तरी येऊं लागला. तेव्हां जवळपास हा कारखाना असला पाहिजे असा अंदाज करून थोडी चवकशी केल्यावर तो सांपडला. अपेक्षेप्रमाणें उशीर झाल्यामुळें, कारखाना बंद झाला होता. यंत्रांच्या दर्शनावर आणि चंदनाच्या वासावरच समाधान मानून घ्यावें लागलें !

● ● ●

*तारीख १७ मे १९५०*

*उदकमंडलांत मेघदूत !*

उटीला जायला सकाळीं साडेसातच्या बसनें निघालों. सिमला, मसूरीप्रमाणेंच सात-आठ हजार फूट उंचीवर असलेल्या निलगिरींतल्या या थंड हवेच्या ठिकाणाला साहेब लोक 'उटकमंड' म्हणत; आतां साहेब गेल्यानंतर 'उदक-मंडल' हें मूळ संस्कृत नांव पुन्हा प्रचारांत येतें आहे. निलगिरीच्या उंच शिखराभोंवतीं जिथें उदक देणाऱ्या ढगांचें मंडल होतें तें उदकमंडल ! अर्थात रोजच्या व्यवहाराला 'उटी' हें सुटसुटीत नांव ठीक आहे. म्हैसूरची हद्द संपून मद्रासची हद्द लागली तेव्हां काळ्या रंगाच्या गरम कापडाच्या गणवेषांतले, लाल फेटेवाले मद्रासी पोलिस दिसूं लागले. दोन्ही बाजूंना दाट सागाचीं जंगलें आणि बांबूंचीं बनें दिसत होतीं. गुडलूर गांवांत बसनें चहापाण्याकरितां मुक्काम केला. इथून चढण सुरू होते. गुडलूरपासून उटी फक्त तीस मैल आहे. मात्र वळणें घेत घेत हा तीस मैलांचा घाट चढत बस वर जाते. खालीं पसरलेल्या काळसर हिरव्या जंगलांनीं भरलेल्या भयानक दऱ्यांकडे कड्या-वरून नजर टाकली कीं पोटांत भीतीचा गोळा उठतो ! या तीस मैलांत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दिसणारा जंगलाचा देखावा अविस्मरणीय आहे. ताडमाडांपेक्षांहि उंच उंच आणि सरळ सोट पाइनचीं किंवा रबराचीं झाडें पलटणींतले शिपाई कवायतीकरितां रांगामागें रांगा करून ताठ उभे राहावेत तशीं दिसतात. वर निमुळता होत गेलेला पाइनच्या पानांचा डेरा उत्तुंग देवळांप्रमाणें दिसतो तर एखादा सहस्र-हस्त माणूस वर हात करून उभा राहावा तशीं वर फांद्या वळलेलीं रबराचीं झाडें दिसतात ! 'उदकमंडल' हें नांव सार्थ करून दाखवण्या-करितां कीं काय झळझळीत निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर रुपेरी ढग

पर्वतशिखरांच्याभोंवतीं घुटमळत असलेले दिसले. इतक्या उंचीवर कांहीं रुपेरी ढग इतके जवळ डोळ्यांसमोर दिसतात कीं असाच एखादा ढग आपल्याकडे पाहतो आहे असें कुठें तरी कालिदासाला वाटलें असावें आणि ढगाला आपल्या एका काव्यांत मुख्य भूमिका देण्याची कल्पना त्याला सुचली असावी ! इथल्या कॉफी आणि रबर कंपन्यांच्या मालकांना अशीच कांहींशी कल्पना निश्चितपणें सुचलेली दिसली. ‘ सिल्व्हर क्लाउड टी अँड कॉफी एस्टेट्स ’ अशी पाटी मीं एके ठिकाणीं वाचली ! उंच उंच रबराच्या किंवा पाइनच्या पायांना पोरां-सारख्या बिलगलेल्या चहाच्या किंवा कॉफीच्या झुडुपांचे पुष्कळ मळे मधून मधून दिसतात. एक घाट उतरून दुसरा चढायच्या आधीं मध्यें एकदा वाटेंत एक मोठें तळें दिसलें, आणि जवळच सहा हजार माणसें कामावर असलेल्या मद्रास राज्यांतल्या प्रचंड पायकारा धरणाचें काम चाललेलें दिसलें.

*स्वच्छ ऊन व थंडी*

स्वच्छ ऊन पडलें होतें, पण दुपारीं दीडलाहि चांगली थंडी वाजत होती. उटीच्या चिमुकल्या रेसकोर्सला लागून असलेल्या मॉडर्न हिंदू हॉटेलमध्यें उतरलों, आणि स्नान, जेवण वगैरे झाल्यानंतर लगेच टांगा करून भटकायला बाहेर पडलों. इंग्लंडमध्यें आकाश सदा ढगाळ असल्यामुळें कालोखें वाटतें – इथें उटींत स्वच्छ सोनेरी ऊन आहे, पण दुपारीं कुडकुडायला लावणारी थंडी, उंच उंच वृक्षांचीं झाडीं, घरां-वरचीं धुराडीं, टुमदार ख्रिस्ती प्रार्थना-मंदिरें, हिरव्या छपरांचीं इंग्लिश पद्धतीचीं तांबड्या विटांचीं घरें वगैरे पाहून केंब्रिजसारख्या एखाद्या खेडेंवजा इंग्लिश शहरांत किंवा लंडनच्या निवांत हॅम्पस्टेड विभागांत आपण फिरतों आहोंत असें वाटतें. साहेब लोकांनींच उटी गांव वसव-लेलें असल्यामुळें मोठमोठ्या रस्त्यांचीं चेअरिंग क्रॉससारखीं नांवेंहि इंग्लंडचीच आठवण करून देतात. इथें दिसलेले गाईबैलहि पांढऱ्या

काळ्या रंगाच्या केंसाळ कातडीचे, वशिंड नसलेल्या सपाट पाठींचें आणि इंग्लिश गुरांप्रमाणेंच टवकारलेल्या आंखूड शिंगांचें होतें.

नौकाविहाराची सोय असलेलें, गर्द झाडीनें वेढलेलें उटीचें तळें लांबवर पसरलें आहे. या तळ्याच्या वर उंच देवदारांच्या जंगलांत वडोद्याच्या महाराजांचा राजवाडा आहे. पलीकडे म्हैसूरच्या महाराजांचा राजवाडा आहे. या राजवाड्यांतल्या कलापूर्ण आकृति करून लावलेल्या रंगीबेरंगी फुलझाडांच्या विस्तीर्ण बागा पहिल्या कीं नंदनवन असेंच असेल काय असें वाटूं लागतें! वाघ, हत्ती वगैरेंच्या शिकारीकरितां या निलगिरींत म्हैसूरच्या महाराजांचें एक खाजगी जंगल आहे म्हणे! छोट्या इंग्लिश बंगल्यासारख्या दिसणाऱ्या उटीच्या चिमुकल्या स्टेशनांत चहा घेऊन हॉटेलांत परत आलों.

● ● ●

*तारीख १८ मे १९५०*

*वॉलेस तेल*

सकाळीं नऊ वाजतां भटकायला बाहेर पडलों. पोस्टकार्डाच्या आकाराचीं उटींतल्या निरनिराळ्या देखाव्यांचीं सुंदर चित्रें एका दुकानांत दिसलीं म्हणून आंत गेलों. एक म्हातारा मुसलमान आंत बसला होता. निरनिराळीं चित्रें दाखवतांना तो अनेक गोष्टी सांगत होता. मोठा गमत्या आणि बोलका म्हातारा होता. शंभर वर्षांपूर्वी आपले लोक कच्छमधून इथें आले, तो म्हणाला, तुम्ही लोक मुंबईंतील दिसतां म्हणजे आमचे शेजारी! उटीची पुष्कळ माहिती त्यानें दिली. इथें पाहावें तिथें युकॅलिप्टस् तेलाचीं दुकानें दिसतात. त्यांच्यावरून बोलतां बोलतां तो म्हणाला, 'माझ्या आजोबांच्या काळीं वॉलेस नांवाच्या एका साहेबानें हीं युकॅलिप्टसूचीं किंवा कापराचीं झाडें इथें पहिल्यांदा आणलीं. त्या वेळेला या तेलाला 'वॉलेस तेल' म्हणत! वर निमुळता होत

गेलेला उंच 'फर' झाडांच्या पानांच्या डेरा इथल्या देवळांतल्या प्रचंड रथाच्या आकाराचा असतो; तेव्हां तमीळ भाषेत यांना रथवृक्षच म्हणतात म्हणे ! उटीच्या आजूबाजूच्या डोंगरांत इथल्या आदिवासी लोकांच्या झोंपड्या आहेत त्या तुम्ही अवश्य पाहा ', मुसा म्हणाला.

*रंगाचा दंगा !*

तिथून गव्हर्मेंट हाउसच्या बाजूला असलेल्या ' बोटॅनिकल गार्डन्स '-कडे आम्ही गेलों. या गार्डन्सना शंभर वर्षे झालीं त्यानिमित्त चाललेल्या शतसांवत्सरिक उत्सवाचें मद्रास राज्याच्या जंगल खात्याच्या मंत्र्यांच्या हस्तें आजच उद्‌घाटन व्हावयाचें होतें. एक मोठा थोरला ' फ्लॉवर शो ' किंवा फुलांचें प्रदर्शनहि आजच खुलें व्हावयाचें होतें. मद्रासच्या शेतकी आणि जंगल खात्यानेंहि या प्रदर्शनांत आपलीं दालनें ठेवलीं आहेत. गार्डन्सच्या मुख्य दरवाजावर मोठमोठ्या सुशोभित कमानी उभ्या केल्या आहेत; आणि मधल्या कमानीला एक आडवी निळी फीत बांधली आहे. मंत्रीमहाशय फीत तोडून प्रदर्शनाचें उद्‌घाटन करणार. पलीकडे झेंडेपताका लावलेला एक शामियाना दिसत होता. त्यांत उद्‌घाटन-समारंभाचीं व्याख्यानें वगैरे होणार असें दिसतें. उद्‌घाटनाला अजून थोडा अवकाश होता तरी लोकांना आंत प्रदर्शन पाहावयाला बाजूच्या कमानींतून जाऊं देत होते. पहिल्यांदा फुलांच्या प्रदर्शनाकडे आम्ही गेलों. निरनिराळ्या दालनांत नुकत्याच पाणी घातलेल्या फुलझाडांच्या लहान-मोठ्या कुंड्या हारीनें एकावर एक लावून ठेवल्या होत्या. या फुलझाडांवरल्या नाना आकारांच्या नाना रंगांच्या लहान-मोठ्या फुलांना पाहातांना फुलवेड्या रसिकाला आनंदाश्रू आवरणें कठीण. रंगवैचित्र्यामुळें पांखरांच्या मागें ' फुल ' लावून फुलपांखरूं म्हणतात, पण या फुलांना काय म्हणावें ? रेशमी फुलपांखरांचींच जणूं काय फुलें होऊन या झाडांच्या पानांतून डोकावत होतीं ! इंग्रजी वाक्प्रचार वापरायचा म्हणजे रंगांचा दंगा

होता ! एक मेक्सिकन रॉक प्लॅन्ट किंवा खडकाला चिकटून उगवणारें फूल कोबीएवढें मोठें होतें. त्याच्या पाकळ्या संगमरवरी दगडाच्या चकत्या करून किंवा शुभ्र जाड कांचेच्या केल्या आहेत कीं काय असा भास होत होता. त्याला ' शिलाकमल ' असें नांव द्यावेंसें मला वाटलें ! तसेंच एखाद्या मोठ्या फुलदाणीच्या आकाराचें रसरशीत नारिंगी रंगाचें फूल हाताइतक्या जाड देठावर उमललें होतें ! या काव्यांतून आम्ही एकदम गद्याकडे म्हणजे बटाट्याच्या दालनाकडे वळलों ! पण गद्यांतहि काव्य नसतें असें थोडेंच आहे ! लाल रंगाचे बटाटे होते, जांभळ्या रंगाचे बटाटे होते, पिवळ्या सालीवर सुंदर जांभळे ठिपके असलेले बटाटे होते ! एकएका जातीचीं नांवें तरी काय —' किंग एडवर्ड ',' प्रेसिडेंट ',' व्हाइट सिटी ',' रॉयल किडनी ', वगैरे तीस जातींचे बटाटे होते !

जंगल आणि शेतकी खात्यांच्या दालनांत गुरांचे रोग वगैरे दाखविणारीं चित्रें होतीं; पण एका दालनांत हत्तीचा सहा महिन्यांचा गर्भ स्पिरिटमध्यें घालून ठेवला होता तो पाहण्यासारखा होता. बाजारांत चंदनाचे हत्ती विकायला ठेवतात तसा तळहातावर घेतां येईल असा चिमुकला हत्तीच तो गर्भ दिसत होता. हत्तीच्या गर्भाची पूर्ण वाढ वीस महिन्यांनीं होते म्हणतात.

*तोडा स्त्रीपुरुष*

इथें आसपास आदिवासी तोडांच्या बऱ्याच वसाहती आहेत. त्यांना शिक्षण देऊन, कांहीं व्यवसाय शिकवण्याचा मद्रास सरकार प्रयत्न करतें आहे. ' तोडा ' लोकांनीं केलेलें वीणकाम, सुतारकाम, भरतकाम वगैरे एका ' गिरिव्यवसाय ' नांवाची पाटी असलेल्या दालनांत होतें. तिथें बरेच ' तोडा ' स्त्रीपुरुष आलेले होते. आपल्याकडल्या वारल्यांसारखे किंवा कातकऱ्यांसारखे मळकट, धुळकट, कंगाल हे लोक दिसत नाहींत. वर्णानेंहि उजळ आहेत. लांबट तोंडांचे, बसक्या गालांचे

पण चांगल्या सरळ नाकांचे आणि ठसठशीत मोठ्या डोळ्यांचे हे लोक वाटले. हनुवट्या मोठ्या, आणि ओंठ मात्र जरा पुढें आलेले दिसतात. पुरुष आणि स्त्रिया दोघांचेहि लांब काळे केंस मानेवर लोंबत होते. स्त्रियांच्या केंसांच्या मात्र कांहीं फॅशनेबल स्त्रिया अलीकडे करतात तशा सुरळ्या केलेल्या होत्या! पुरुष आणि स्त्रिया दोघांच्याहि अंगांभोंवतीं मानेपासून पायापर्यंत लोंबणारें एकच पांढरें वस्त्र गुंडाळलेलें होते. तोडा लोकांना कलाकुसरीची आवड दिसते; कारण बहुतेक पांढऱ्या वस्त्रांच्या किनारीवर काळ्या आणि पांढऱ्या सुताचें सुंदर कशीदाकाम केलेलें होतें. स्त्रीपुरुषांचा वेश एकाच तऱ्हेचा आणि दोघांचेहि केंस लांब असले तरी पुरुषांना छोट्याशा दाढीमिशा असल्यामुळें ते सहज ओळखतां येत होते! बहुतेक पुरुषांच्या हातांत एक एक उंच काठीहि होती.

*तोडाची वैशिष्ट्यपूर्ण झोंपडी*

बोटॅनिकल गार्डन्सच्या मागल्या डोंगरांत तोडांच्या कांहीं झोंपड्या आहेत असें कळल्यामुळें आम्ही तिथें गेलों. दोन झोंपड्या दिसल्या. एक बंद होती. दुसरीच्या दाराशीं दोन म्हाताऱ्या तोडा बाया बसल्या होत्या. प्रत्येकीला एक एक आणा दिल्यावर त्या खूष झाल्या आणि 'स्वामी स्वामी!' करीत आपली झोंपडी त्यांनीं पाहूं दिली. रेड इंडियनची 'विग वॅम' असते किंवा एस्किमोची 'इग्लू' असते, तशीच तोडाची झोंपडीहि वैशिष्ट्यपूर्ण आकाराची असते. चाकें काढून जमिनीवर ठेवलेल्या बंद बैलगाडीसारखी साधारणपणें दिसते ती. लांबी-रुंदीहि जवळ जवळ तितकीच. लांकडाच्या फळ्या, गवताच्या जुड्या, चिखल आणि वेताच्या काठ्या मिळून ती केलेली असते. कलात्मक पद्धतीनें लावलेल्या गवतामुळें या झोंपड्या सुबक दिसतात. सर्व बाजूंनीं बंद असलेल्या या झोंपडीचें दार जमिनीला लागून अवघें दोन फूट रुंद आणि दोन फूट उंच असतें. दार म्हणण्यापेक्षां त्याला झांकणच

म्हटलेलें बरें ! जमिनीवर उपडें पडून झोंपडींत सरपटत जायचें. आंत वस्तू तरी काय काय असतात तें पाहण्याकरितां पोटावर उपडा पडून मी आंत सरपटत गेलों. एका कोपऱ्यांत मातीची चूल आणि पत्र्याचे चारपांच डबे होते. झोपण्याकरितां जमिनीपेक्षां वीतभर उंच मातीचा ओटा केलेला होता. मधून मधून भोंकें दिसत होतीं तीं धूर बाहेर जाण्याकरितां किंवा हवा आंत येण्याकरितां असतील ! निलगिरींतल्या या उंचीवर युरोपसारखी थंड हवा असल्यामुळें एवढेंसें दाराचें भोंक ठेवून या सर्व बाजूंनीं बंद झोंपड्या तोडा करीत असावे. अगदीं तोडा झोंपडीसारखीच एक नवी कोरी झोंपडी पण एक बाजू सबंध उघडी असलेली जवळच होती. झोंपडींत कुणी नव्हतें. झोंपडीच्या भिंतीवर साक्षरता प्रसाराच्या तामिळ भाषेंतल्या रंगीत भित्तिपत्रिका होत्या. तोडा म्हातारी तिकडे बोट दाखवून ' इस्कूल–इस्कूल ' म्हणत होती ! नंतर कळलें कीं ही झोंपडी मद्रास सरकारनें तोडा मुलांसाठीं साक्षरता केंद्र म्हणून बांधली आहे.

आजची संध्याकाळ उटीचें प्रशांत तळें पाहण्यांत आणि उंच उंच ' रेड गम ', ब्लू गम ', ' फर ', ' सेडार ', ' यूकॅलिप्टस् ' झाडांच्या हिरव्यागार दाट वनांत भटकण्यांत घालवली.

रात्रीं झोंपण्यापूर्वीं सहज बाहेर येऊन उभा राहिलों वारा पडला होता. समोर डोंगरावर स्तब्धपणें काळोखांत ताडमाडापेक्षांहि उंच आणि सरळ उभे असलेले वृक्ष निळ्या आकाशांत चमचमणाऱ्या तारकांशीं कांहीं ' गुफ्तगू ' करीत आहेत कीं काय असा भास झाला !

● ● ●

*तारीख ११ मे १९५०*

*फ्युनिक्युलर रेल्वे*

उटीजवळच कुन्नूर हें दुसरें हवेचें ठिकाण आहे. तिथें जाण्यास

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थापना
अनुक्रम २७८७८ वि. ३.४

क्रमांक ......२९.६ नों: दि: ७-११-७६

सकाळीं ८-४७ ची गाडी उटी स्टेशनांत घेतली. जशी लोणावळा सोडल्यानंतर खंडाळ्यापासून घाटाची उतरण सुरू होते तशीच उटी सोडल्यानंतर कुन्नूरपासून गाडी घाट उतरूं लागते. अर्थात् तीन हजार फूट उंचीच्या बोरघाटाची सात साडेसात हजार फूट उंचीच्या या निलगिरींतल्या घाटाशीं तुलनाच होऊं शकत नाहीं. उटी सात हजार दोनशें पंचाहत्तर फूट उंचीवर आहे, तर कुन्नूर पांच हजार सहाशें सोळा फूट उंचीवर आहे. मध्यें वेगवेगळ्या उंचीवर तीन-चार ठिकाणें आहेतच. निलगिरीच्या या प्रचंड दऱ्या साधी आगगाडी उतरून जाणेंच शक्य नाहीं. इथें फ्युनिक्यूलर रेल्वे आहे. दोन रुळांच्यामध्यें एक दांते असलेला तिसरा रूळ असतो. इंजिनच्या दोन बाजूंच्या चाकांच्या मधोमध त्या रुळाच्या दांत्यांत दांत अडकविलेलें आणखी एक चाक असतें. चढतांना किंवा उतरतांना गाडी घसरूं लागली तर इतर चाकांना साधा ब्रेक लावतां येईलच पण हें मधलें चाक त्या मधल्या रुळांत कोणत्याहि क्षणाला घट्ट करतां येईल. कुन्नूरला भारतांतली प्रख्यात 'न्यूट्रिशन रीसर्च इन्स्टिटयूट' आहे. तिचे डायरेक्टर सध्यां मुंबईचे डॉ. पटवर्धन आहेत. म्हणूनच कुन्नूरला एक दिवस मुक्काम करून पुढें कोइमतूरला जायचें आम्हीं ठरविलें होतें. उटीहून डॉ. पटवर्धनांना आम्हीं टेलिफोन केला होता.

*निळे डोंगर*

इंग्लंडसारखी थंड हवा, इंग्लंडसारखी वनश्री, इंग्लिश फुलेंफळें असलेल्या कुन्नूर या निलगिरीच्या परिसरांत इंग्लिश राज्यकर्त्यांनीं निरनिराळीं गांवें वसविलीं यांत आश्चर्य नाहीं. या गांवांचीं नांवें, इथल्या घरांचें रंगरूप, युरोपियन मुलांच्या शाळा, वसतीगृहें, चर्चें-सर्व कांहीं इंग्लीश वाटतें. तें साहजिकच आहे. इंग्लिश राज्यकर्ते भारतांतून गेले, तरी कितीतरी सेवानिवृत्त झालेले इंग्लिश लोक आपल्या कुटुंबांसह आतां इथेंच स्थायिक झाले आहेत. त्यांचें हेंच

इंग्लंड, आणि इंग्लंडसारख्या बऱ्याच गोष्टी इथें आहेतच. उटी सोडल्या-नंतर ‘ फर्नहिल् ’ स्टेशन आलें. नंतर ‘ लव्हडेल्, ’नंतर ‘ केट्टी ’ आणि या इंग्लिश नांवांनंतर एकदम ‘ अरवान्कडु ’ या तामिळ नांवाचें एक स्टेशन आलें ! स्टेशनाच्या पलीकडे मोठमोठीं धुराडीं आणि प्रचंड बॉयलर्स असलेला कसला तरी कारखाना दिसत होता. खडकींतल्या-सारखा दारूगोळ्याचा तो सरकारी कारखाना होता. नंतर ‘ वेलिंग्टन ’ आलें. हें खडकीसारखेंच लष्करी ठाणें आहे. गाडी खालीं येत असतां मधून मधून दऱ्या आणि दूर अंतरावर डोंगरांच्या रांगा दिसत. दूर अंतरावरले डोंगर निळे दिसतात, असें कुठें तरी रस्किननें म्हटल्याचें आठवतें. या सर्व रांगा निळ्या दिसत होत्या, कारण निलगिरीच्या रांगा एकमेकांपासून खूपच दूर पसरलेल्या असून मध्यें अफाट दऱ्या आहेत. कुठल्याहि डोंगरावरून इतर रांगा निळ्याच दिसत असल्या पाहिजेत. ज्यांनीं यांना ‘ निलगिरी ’ नांव दिलें त्यांना तें किती सहज सुचलें असावें ! इतक्यांत कुन्नूर आलें.

*नाना देशांतलीं फुलें*

स्टेशनसमोरच्याच ‘ मायसोर लॉज ’मध्यें सामान टाकलें, आणि डॉ. पटवर्धनांकडे जायला बाहेर पडलों. दुपारीं त्यांच्याकडेच जेवायचें होतें. खालचें कुन्नूर आणि वरचें कुन्नूर असे कुन्नूरचे दोन भाग आहेत. खालचें गांवठी कुन्नूर आणि वरचें साहेबांचें कुन्नुर असें म्हणायला हरकत नाहीं. खालीं बाजार व इतर घरांची गर्दी आहे. वरती बागा, बंगले, इन्स्टिटयूट वगैरे आहेत. वर इन्स्टिटयूटकडे जायला कुठली बस पकडून कुठें यायचें तें डॉ. पटवर्धनांनीं टेलिफोन-वरून बरोबर सांगितलें होतें. त्याप्रमाणें कोट्टागिरीची बस साडेअक-राला घेतली; पण जिथें उतरायला पाहिजे होतें, त्याच्या खूपच पुढें चुकून उतरलों. त्यामुळें एक फायदाच झाला. थंडगार हवेंत पायी मागें येतांना आजूबाजूच्या दऱ्याखोऱ्यांचें सहज दर्शन झालें. साडे-

बाराला इन्स्टिटयूटमध्यें पटवर्धनांना भेटायचें होतें. अजून अर्धा तास होता तेव्हां 'सिम्स पार्क'मध्यें भटकायचें ठरवलें. ही पार्क म्हणजे एक व्यवस्थित ठेवलेलें जंगलच आहे म्हटलें तरी चालेल. उटीच्या 'फ्लॉवर शो'मध्यें पाहिलेल्या नानारंगी फुलझाडांसारखीं अनेक फुलझाडें या पार्कमध्यें आहेत. मुली कानांत डूल घालतात तशा आकाराचीं तांबडीं फुलें, हिऱ्यांच्या कुड्यांसारखीं सफेत नाजुक फुलें, कमळांसारखीं अजस्र फुलें, नाना प्रकारचीं फुलें इथें दिसलीं. ऑस्ट्रेलिया, चीन, कॅलिफोर्निया वगैरे नाना प्रदेशांतून आणलेलें वृक्ष इथें लावले आहेत. पार्कमध्यें लहान लहान तळीं आहेत. त्यांवरून छोटे छोटे लांकडी पूल आहेत.

*अन्नावरचे उद्बोधक प्रयोग*

साडेबाराला इन्स्टिटयूटमध्यें गेलों. डॉ. पटवर्धन आपल्या मोटारींतून आम्हांला आपल्या बंगल्यावर घेऊन गेले. तिथें पुण्याच्या फर्ग्यूसन कॉलेजचे प्रो. आपटे यांची गांठ पडली. जेवण झाल्यानंतर डॉक्टरसाहेब इन्स्टिटयूटमध्यें आम्हांला घेऊन आले. इन्स्टिटयूटचे निरनिराळे विभाग आम्हांला त्यांनीं दाखवले 'डालडा' तूप खाल्ल्यानें अंधत्व येतें अशी ओरड झाली होती तेव्हां त्या तुपाचे उंदरांवर इथेंच प्रयोग करण्यांत आले होते. एका विभागांत 'बी वन' व्हिटॅमिनचे कबुतरांवर प्रयोग चालले होते. ज्यांत 'बी वन' नाहीं अशा आहारावर, म्हणजे सडून तुकतुकीत केलेल्या तांदळावर कांहीं दिवस कबुतर ठेवल्यास त्याचे पाय वांकडे होऊं लागतात, आणि धनुर्वात झाल्यासारखी मान खालीं पडते. त्याला उडतां येत नाहीं. याच कबुतराला 'बी वन'चीं इंजेक्शनें दिलीं कीं अर्ध्या तासांत ठीक होऊन तें उडूं लागतें! सूर्यप्रकाश आणि मुलांच्या हातापायांच्या काड्या करणारा 'रिकेट्स'चा रोग यांचा संबंध शोधून काढण्याकरितां एका काळोख्या खोलींत कित्येक दिवस पांढरे उंदीर ठेवण्यांत आले होते. खायला-

प्यायला पोटभर असून त्यांच्या पायांच्या काड्या होऊं लागल्या. इंग्लंडमध्यें सूर्यप्रकाश क्वचितच दिसतो; तेव्हां तिथल्यापेक्षां भारतांत 'रिकेट्स'चें प्रमाण तुलनेनें कमी आहे म्हणे. सूर्यप्रकाशाला पैसे पडत नाहींत हें भारतीयांचें नशीब! रातांधळेपणाचा रोग व्हिटॅमिन 'ए'च्या कमतरतेमुळें जडतो म्हणतात. 'ए'चा भरपूर पुरवठा केल्यास पंधरा दिवसांत फरक दिसूं लागतो. बरेचसे डोळ्यांचे, मज्जातंतूचे, काळजाचे विकार अयोग्य अन्नामुळें होतात असें तज्ज्ञांचें मत आहे. शेजारीच असलेल्या 'पॅस्टर इन्स्टिटयूट'मध्यें कुत्र्याच्या विषावरलें व्हॅक्सीन वगैरे तयार करतात. बोकडाच्या किंवा कुत्र्याच्या मेंदूवर प्रयोग करून हें व्हॅक्सीन कसें करतात तें तिथल्या ग्रंथपालानें समजावून सांगितलें. डॉ. पटवर्धनांच्या गाडींतून त्यांच्या घरीं परत आलों आणि चहा घेऊन संध्याकाळीं पावणेसहाच्या सुमारास पायींच डोंगरी रस्ता उतरून कुन्नूरमध्यें यायला निघालों. पटवर्धन पति-पत्नी आणि प्रो. आपटे यांच्या सहवासांत आजचा दिवस फारच आनंदांत गेला. वाटेंत दिसणाऱ्या घरांचीं नांवें 'हिदर्लें' 'मिलिन्स्टाउन' 'फेअरलॉन' अशीं साहेबी होतीं. म्हातारे युरोपियन स्त्री-पुरुषहि रस्त्यावरून जातांना बरेच दिसत होते. 'गव्हर्मेंट पेमॉलॉजिकल इन्स्टिटयूट' किंवा फलसंशोधन संस्था इथें आहे. पेअर, ॲपल यांसारखीं इंग्लिश फळें पिकविण्याचा या संस्थेचा प्रयत्न चालू आहे. डोंगराच्या कडेला खांचा पाडून कांहीं झुडपांच्या रांगा लावलेल्या दिसल्या.

● ● ●

*तारीख २० मे १९५०*

*सीन बदलला*

कोइमतूरला जाण्याकरितां सकाळीं १०–१० च्या गाडीनें कुन्नूर सोडलें. निलगिरी उतरून मेट्टापलयम्‌पर्यंत 'फ्यूनिक्युलर'नें जायचें.

तिथून पुढें कोइमतूरसाठीं नेहमींची गाडी मिळते. पांच हजार फुटांवर ‘ कटेरी रोड ’ साडेतीन हजार फुटांवर ‘ हिलग्रोव्ह ’, अडीच हजार फुटांवर ‘ ॲडलें ’, साडेबाराशें फुटांवर ‘ कल्लार ’ अशीं छोटीं छोटीं स्टेशनें घाटांत आहेत. कल्लार ते मेट्टापल्लयम् सपाट प्रदेशांतून गाडी जाते. नाटकांत ‘ ट्रॅन्स्फर ’ सीन व्हावा तसा देखावा आतां बदलला होता तीं उंच उंच कापराचीं झाडें, ते फर, ते देवदार आतां स्वप्न-सृष्टींतल्यासारखे वाटत होते. मैलच्या मैल पोफळीचीं बनें दोन्ही बाजूंना दिसत होतीं. नारळ-पोफळींच्या संगतीतली गरम हवाहि चांगलीच अंगाला घाम फोडीत होती. तीन तासांपूर्वी आपण थंडगार इंग्लिश हवेंत होतों, हें खरेंच वाटेना. मेट्टापल्लयम्ला गाडी आली तेव्हां दुपारचा एक वाजला होता, आणि दक्षिण भारतीय उन्हाळ्याची भट्टी चांगलीच पेटली होती ! घामाच्या धारा फुटून जीव गुदमरूं लागला.

*तांबडी माती लागली*

कोइमतूरला जाणारी गाडी दीडला निघाली. निळे डोंगर मागें राहिले होते, पण तांबड्या मातीचा सपाट प्रदेश सभोंवार पसरला होता. मधून मधून बाजरी-जोंधळ्याच्या शेतांसारखीं शेतें आणि केळी-नारळी-पोफळीचीं बनें दिसत होतीं. मधल्या स्टेशनांचीं तामिळ नांवें आगगाडीसारखींच लांबलचक होतीं—‘ पेरियनायकनपालयम् ’ ‘ उरु—माण्डामपालयम् ’ ! डोक्याला पांढरें फडकें बांधलेले आणि कमरेला गोल धोतर गुंडाळलेले काळे पुरुष, आणि गळ्यांत लाल मणि आणि पोवळ्यांच्या माळा घातलेल्या, केंसांचा बुचडा उलटा आंत मुडपलेल्या, स्तन उघडें टाकून फिरणाऱ्या काळ्या स्त्रिया स्टेशनांत किंवा शेतांत दिसूं लागल्या. काळ्या गरम कापडाची कोटपाटलोण आणि जरीकांठी तयार हिरवा फेटा डोक्यावर ठेवलेले इकडचे रेल्वे अधिकारी आमच्या-कडल्यापेक्षां अधिक तरतरीत दिसतात. पावणेतीनला कोइमतूर स्टेशन

आलें. स्टेशनजवळच्याच 'श्री मुरुगन कॅफे' नांवाच्या हॉटेलांत सामान ठेवून पावणेचारच्या सुमारास बंगलोरला भेटलेल्या श्री भोरस-करांचे बंधू इथल्या फॉरेस्ट कॉलेजमध्यें असतात त्यांना भेटायला बाहेर पडलों.

*दक्षिण भारताचें मँचेस्टर*

कोइमतुरी साड्यांबद्दल प्रसिद्ध असलेल्या या शहराला दक्षिण भारताचें मँचेस्टर म्हणतात. 'सोमसुंदरम् टेक्स्टाइल मिल्स', 'कामधेनु यार्न' वगैरे नांवें मधून मधून दिसत होतीं. बडाबाजार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोठ्या बाजारपेठेंत पाहावें तिथें कुणातरी चेट्टीची पेढी – वीर-स्वामी, रंगास्वामी, पोन्नुस्वामी, दुराईस्वामी, चेट्टीची पेढी दिसत होती! हें नमुनेदार मद्रासी शहर दिसतें. तामिळ शब्द कानांवर आदळत होते, व कमरेला गुंडाळलेलें – तेंहि गुडघ्यावर उलटें वळवून कमरेला खोंचलेलें – धोतर, अंगांत शर्ट, त्यावर उपरणें अशा थाटांत उघड्या डोक्यानें अनवाणी चाललेले काळे पुरुष रस्त्यांत जिथें तिथें दिसत होते! यांतला हमाल कोण, कारकून कोण आणि पेढीचा मालक चेट्टी कोण हें आमच्यासारख्या नवख्या माणसांना समजणें कठीण! कॅफे, लंच-होम आणि टी क्लबच्या इतक्या पाट्या रस्त्यावर ठिकठिकाणीं दिसत होत्या कीं इथें खाणारे लोक तरी किती आहेत, – सगळें गांव बाहेर दुकानांतच चहापाणी, जेवणखाण करतें कीं काय, अशी कुणाला शंका येईल! बंगलोरप्रमाणेंच इथेंहि अनेक पानबिडीच्या दुकानांत केळ्यांचे घड, सोडालेमनच्या बाटल्या आणि चकल्यांच्या माळा विका-यला ठेवलेल्या दिसल्या. सिगारेटची किंमत विचारली तेव्हां दुकानदार कांहींतरी 'रंड' म्हणाला, तेव्हां दचकलों; पण 'रंड' म्हणजे दोन असें कळलें तेव्हां बरें वाटलें! एका दोघांना इंग्रजींत रस्ता विचारला. त्यांनीं उत्तरांची सुरुवात इंग्रजींत केली पण शेवट भरभरभरभर तामिळ-मध्यें केला! कांहीं बोर्डिंग ॲण्ड लॉजिंगच्या दरवाजावर 'डिशीस

हिअर नॉट प्रिपेअर्ड इन प्युअर घी ' या पाट्या पाहून आश्चर्य वाटलें. स्वतः खाणावळीच्या मालकांनीं आम्ही शुद्ध तूप वापरीत नाहीं असें ठळक अक्षरांत पाटी लावून जाहीर करायचें म्हणजे काय ? मला वाटतें शुद्ध तूप न वापरणारांनीं – नकली, वनस्पति तूप वापरणारांनीं तसें स्पष्ट जाहीर करायला हवें, असा मद्रास सरकारचा कायदा असावा.

*रस्ते प्रशस्त पण वर्दळ नाहीं !*

फॉरेस्ट कॉलेज 'आर. एस. पुरम' या कोइमतूरच्या नवीनच वसवलेल्या ऐसपैस उपनगराजवळ आहे. बसनें तिथें गेलों. दुपारीं साडेचारची वेळ असूनहि इथल्या प्रशस्त रस्त्यावर मुंबईंत कर्फ्यू ऑर्डरच्या काळांत दिसतो तसा शुकशुकाट दिसत होता ! कॉलेजांत कळलें कीं भोरसकर स्टेशनांतच कांहीं कामाकरितां गेले आहेत, तेव्हां स्टेशनकडे परत आलों. कॉलेजचें कांहीं सामान आलें होतें तें उतरवून घेण्याकरितां भोरसकर व त्यांच्याबरोबरचे कांहीं विद्यार्थी स्टेशनांत आले होते, तिथें त्यांची गांठ पडली. भोरसकरांच्याबरोबर बाजारांत फिरून कांहीं कोइमतुरी साड्या घेतल्या; आणि जेवायला 'मुरुगन कॅफे 'त परत आलों.

*हमाल कोण ?—मालक कोण ?*

इथें रस्त्यांत दिसणारा पुरुष हमाल आहे कीं मालक आहे हें नव्या माणसाला समजणें कठीण याचा अनुभव रात्रींच आला. हॉटेलांत दुपारीं सामान ठेवलें तेव्हां खाटा बाहेर उघड्यावर टाकायला दलालांनीं हॉटेलच्या नोकरांनां सांगितलें होतें. रात्रीं हॉटेलांत परत आलों तेव्हां सामान जिथच्या तिथें पडलें होतें. नोकरांनी कांहींच केलें नव्हतें. दलाल संतापले होते. गुडघ्यावर धोतर खोंचून तिथून जाणाऱ्या एका तुकतुकीत काळ्या माणसाला जवळ बोलावून त्याच्या अंगावर ओरडायला त्यांनीं सुरवात केली. इंग्रजींत कांहीं तरी 'हो हो' असें म्हणून तो माणूस तिथून निसटला आणि त्यानें हॉटेलच्या मॅनेजरला

आमच्याकडे पाठवून दिलें. मॅनेजरनें हवी ती व्यवस्था आम्हाला करून दिली. हॉटेलच्या हॉलमध्यें आम्ही जेवायला बसलों तों आमच्याशेजारीं दलाल ज्याच्या अंगावर हॉटेलचा नोकर समजून ओरडले होते तो माणूस ! तो आमच्यासारखाच हॉटेलांत उतरलेला एक उतारू होता ! इकडचीं माणसें फार सौजन्यशील म्हणून आम्हाला उलटी तंबी न देतां तो बिचारा तिथून निसटून हॉटेलच्या मॅनेजरकडे गेला, आणि आमची तक्रार काय आहे ती पाहण्याकरितां त्याला त्यानें पाठवून दिलें ! जेवतांना त्याची आमची दोस्ती जमून आम्ही गोष्टी करूं लागलों. कापडधंद्यांतला चांगल्या मोठ्या पगाराचा तो एक अधिकारी होता. तो तामिळ नव्हता; तेलुगुभाषी होता. कांहीं कामाकरितां तो कोइमतूरला आला होता. आमच्या गप्पा अर्थांत इंग्रजींत चालल्या होत्या. वृत्तपत्रसृष्टींत सुप्रसिद्ध असलेले 'सिंध ऑब्झर्व्हर'चे श्री. पुन्नय्या, 'नॅशनल हेरल्ड'चे श्री. के. रामराव हे लोक आमच्याच गांवचे, तो म्हणाला. महाराष्ट्रीय सिनेतारकांचा तो मोठा चाहता दिसला. शांता आपटे, लीला चिटणीस, दुर्गाबाई खोटे यांच्यासंबंधीं पुन्हा पुन्हा तो विचारीत होता. शेवटीं नथुराम गोडसेसंबंधींहि त्यानें चवकशी केली !

● ● ●

*तारीख ११ मे १९५०*

*हिंदी तिरिमा ?*

कोइमतूरमधलें पेरू देवस्थान फार प्रख्यात आहे. तें दाखवायला नेण्याकरितां भोरसकर सकाळीं साडेआठ वाजतांच आमच्या हॉटेलांत आले. शहरापासून पेरू बरेंच दूर आहे; पण देवालयाच्या दारापर्यंत बस जाते. शहराच्या बाहेर बस गेल्यानंतर धान्याचीं हिरवीं शेतें, केळीचीं वनें आणि नारळ-पोफळीच्या बागा दिसूं लागल्या. ग्रामीण भागांतून आम्ही जात होतों. पेरूच्या देवालयाभोंवतीं दक्षिणेंतल्या

पद्धतीप्रमाणें तटबंदीसारखी भिंत आहे. हें देवालय खूपच प्राचीन दिसतें. दरवाजांवर देव-देवतांच्या अजस्र रंगीत आकृति दिसल्या. चौकोनी दगडी खांबाच्या रांगा असलेला एक भला मोठा मंडप ओलांडून गेल्यानंतर नंदीचें स्वतंत्र देऊळ दिसलें. नंतर आणखी एक भला मोठा दगडी खांबाचा मंडप आणि मग देवाचा गाभारा. नारळ, केळीं देवापुढें ठेवून तामिळ बाया नमस्कार करीत होत्या. खरे कीं खोटे कुणाला ठाऊक, पण इथल्या बहुतेक सर्व उच्च वर्णीय बायका नाकाकानांत हिरे वापरतात. त्यांच्या काळ्या कातडीवर हिरे चमकतातहि छान! प्रसाद ठेवणाऱ्या बायांना पुजारी आरति पुढें करून कुंकू देत होता. आम्हींहि त्या वृद्ध पुजाऱ्याला चार आणे देऊन नारळ केळीं देवाला दिलीं. 'इल्ले' 'इंडू' करून तो आमच्याशीं तामिळमध्यें बोलूं लागला तेव्हां 'तामिळ इल्ले!' (तामिळ येत नाहीं!) – 'हिंदी तिरिमा?' (हिंदी येते काय?) असें उलट त्यालाच विचारलें! एका दिवसांत इतकें तामिळ आम्ही शिकलों होतों! इथल्या पुजाऱ्याची आशीर्वाद देण्याची वेगळीच पद्धत आहे. आम्हीं दक्षिणा दिली तेव्हां आमच्या हातावर तीर्थ देऊन पादुका कोरलेला एक तांब्याचा टोप त्यानें आमच्या डोक्याला लावला! नंतर चंदनाच्या गंधाची एक एक गोळी दिली!

*कार्तिकयाला दोन बायका होत्या!!*

मुख्य देवळाच्या दोन्ही बाजूंना लांब सोपे आहेत; आणि त्यांत शिव, पार्वती, गणेश, ब्रह्मा, षडानन वगैरे देवदेवतांचे लहान लहान कोनाडे किंवा छोटीं छोटीं देवळें रांगेनें आहेत. या मूर्तींना रंगीबेरंगी परकर, झवलीं नेसवलेलीं, आणि प्रत्येकाच्या डोक्यावर त्याच्या नांवाची तामिळ अक्षरांतली छोटी पाटी लावलेली पाहून कसेंसेंच वाटलें! नवग्रहांच्या दगडी मूर्तींचें एक देऊळ आहे. एक पाय वर उचलून नृत्य करीत असलेल्या नटराजाची रेशमी वस्त्र परिधान केलेली रुप्याची

मूर्तीहि सुंदर आहे. आपल्याकडे शंकराचा मोठा मुलगा षडानन कार्तिकेय हा नुसता अविवाहितच नव्हे तर बायकांचें तोंडहि न पाहणारा आहे. कार्तिकेयाच्या देवळांत आपल्या बायका जात नाहींत. पण इथले लोक म्हणतात कीं तो मलबारमध्यें आला आणि त्यानें दोन बायका केल्या ! म्हणूनच कीं काय इथें आल्यावर त्यानें नांव बदललेलें दिसतें ! त्याला इथें षण्मुख किंवा कुमार म्हणतात, पण इथलें त्याचें सर्वपरिचित नांव म्हणजे सुब्रह्मण्यम्. सुब्रह्मण्यम्च्या देवळांत समोर त्याचें वाहन मोर असतें. प्रत्येक देवळांत भक्तजन उंबरठ्यावर कापूर पेटवून ठेवतात आणि नमस्कार करतात. भरजरी रेशमी वस्त्रांनीं मढविलेली एक लहानशी खोली हें शिव-पार्वतीचें शयनमंदिर म्हणून पुजाऱ्यानें दाखविली ! देवालयाच्या आवारांत एके-ठिकाणीं एका उंच झोंपडींत गोपुरासारखा दिसणारा, भरगच्च कोरीव काम केलेला देवाचा प्रचंड लांकडी रथ दिसला.

*जनोपकार बक*

परत येतांना बसमध्यें आमच्याशेजारीं बसलेला एक तामिळ म्हातारा आम्हांला मराठींत बोलतांना पाहून मराठींत म्हणाला, ' तुमच्या काशी-इतकें आमचें हें पेरूचें देऊळ या बाजूला पवित्र समजतात ! ' पुण्या-मुंबईकडे राहिलेला हा म्हातारा असावा. इथल्या लोकांचें सौजन्य त्यांच्या दोन वाक्यांत तीन वेळां तरी ' सर ' आल्यामुळें क्षणोक्षणीं प्रतीत होत असतें. फार काय ' साउथ इंडिया रेल्वे 'चीं आद्याक्षरेंहि ' एस. आय. आर. ' म्हणजे ' सर ' म्हणतच डब्याडब्यावरून तुमच्याकडे टवकारून पाहात असतात ! रस्त्यावरल्या आणि बसवरल्या कांहीं पाट्या मला चमत्कारिक वाटल्या. सी. एस. हीं इंग्लिश अक्षरें, आणि पुढें स्टोअर्स तामिळ अक्षरांत. तसेंच बसवर ' आर. एस. पुरम ' ही पाटी—' आर. एस. ' इंग्रजी आणि ' पुरम ' तामिळ लिपींत ! अर्थात भोरसकरांनीं सांगितल्यामुळें तें तामिळ लिपींतलें ' पुरम ' किंवा

'स्टोअर्स' आम्हांला समजलें. कांहीं नांवेंहि मजेदार वाटलीं— 'जनोपकार बँक', 'त्रिपुरसुंदरीविलास कॉफी हाउस', 'कुमार-विलास लंच होम'! मात्र या कोइमतुरांत 'शिवाजी फार्मसी' आणि 'लोकमान्य रोड' पाहून आनंद वाटला.

दुपारीं फॉरेस्ट कॉलेजमध्येंच भौरसकरांचे पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांच्या 'मेस'मध्यें आम्हांला जेवायचें होतें. फॉरेस्ट कॉलेजमध्यें सर्व प्रकारचे विद्यार्थी असल्यामुळें शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पद्धतीची व्यवस्था आहे. भौरसकरांनीं लहानसें भाषण करून मेस-मधल्या विद्यार्थ्यांना आमचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनीं मोठ्या आपुलकीनें आम्हांला बसवून घेतलें. 'दोन घरचा पाहुणा उपाशी' ही म्हण महाराष्ट्रांत खरी असेल, पण आतिथ्यशील दक्षिण भारतांत उलट प्रकार दिसतो; कारण मांसाहारी आणि शाकाहारी दोन्ही पद्ध-तींचें जेवण आम्हांला मिळालें!

*निळ्या फुलांनीं शोभणारा निलगिरी*

जेवणानंतर भौरसकरांच्या खोलींत जोशी, कानुगो वगैरे विद्यार्थी मित्रांबरोबर बोलत असतां इथल्या जंगलांची बरीच माहिती मिळाली. त्यांनीं सांगितलें कीं निलगिरी केवळ दुरून निळा दिसतो, इतकेंच नव्हे, तर विशिष्ट ऋतूंत 'स्ट्रॉब्यूलांथीस' नांवाच्या जर्द निळ्या फुलांनीं तो भरून जातो. त्यामुळें जवळूनहि निळा दिसतो. हॉस्टेलच्या आसपासचीं कांहीं चंदनाचीं झाडें त्यांनीं दाखविलीं. त्याना कसलाही गंध नव्हता. एखाद्या सामान्य शुष्क झाडासारखीं तीं दिसत होतीं. सुगंधी मलयमारुत, चंदनविटपा जहरी सर्पाचा लपेटा वगैरे सर्व कवि-कल्पना आणि पुराणांतलीं वांगीं आहेत, असें जंगलांतल्या दीर्घ अनु-भवावरून आपणाला आढळून आल्याचें विद्यार्थ्यांनीं सांगितलें वरची साल काढल्यानंतर चंदनाचा आंतला गाभा सुगंधी असतो.

*कलावंताची कैफियत*

चंदन हें एक ' पॅरासाइट ' किंवा परभृत झाड आहे हें त्या विद्यार्थ्यांकडून आम्हांला कळलें. ' होस्ट ट्री ' किंवा ' यजमान वृक्षा '-कडून तें आपलें अन्न शोषून घेतें. ते म्हणाले, केव्हां केव्हां चंदनाचीं मुळें आपला अन्नदाता यजमान शोधीत जमिनींत एक एक मैल दूरवर गेलेलीं असतात! हें सर्व ऐकून एक मजेदार कल्पना मला सुचली. सुंदर गाणारी कोकिला हीहि परभृत आहे – कावळ्याकडून कावळ्याच्याच घरट्यांत आपलीं अंडीं ती उबवून घेते. सुंदर गंध देणारा चंदन दुसऱ्या वृक्षाकडून आपला जीवनरस शोषून घेतो. एक पक्षीजगतांतील कलावंत तर दुसरा वनस्पतिसृष्टींतला कलावंत! म्हणूनच माणसांच्या जगांतलेहि कलावंत आळशी, कामचुकार, बेजबाब-दार असतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं! समाजानें तरी त्यांना कां नांवें ठेवावीं? सुंदर कलाकृति निर्माण करून समाजाला ते अलौ-किक आनंद देतात. त्यांना पोसणें समाजाचें कर्तव्य आहे. सौंदर्य-निर्मिती हें समाजकार्य नाहीं काय? त्याची इतकीहि परतफेड समा-जानें करूं नये? कलावंतानें सौंदर्यहि निर्माण करावें, आणि इतरां-प्रमाणें पोट भरण्याकरितां कारकुनी, वकिली, वैद्यकी, किंवा हमाली करावी, अशी अपेक्षा समाज करतो याचा अर्थ काय?

इथें ' महाराष्ट समाज ' आहे. भोरसकरांनीं बातमी दिल्यामुळें समा-जाचे श्री. हर्डीकर आणि श्री. बेंदूर संध्याकाळीं चहा आणि गप्पासाठीं आम्हांला समाजांत बोलावण्याकरितां मुद्दाम भोरसकरांच्या हॉस्टेलमध्यें दुपारीं आले होते. ' बँक ऑफ बरोडा 'च्या इथल्या शाखेचे एजंट श्री. देशपांडे यांच्या घरीं समाजाची बैठक होती. इतक्या दिवसांनीं इतक्या मराठी बोलणारांत बसून तिखट शिरा खातांना मजा आली. थोडींशीं भाषणेंहि झालीं. मुंबईचे पाठक फोटोग्राफर इथें आले होते. त्यांनीं कांहीं फोटोहि घेतले.

● ● ●

*तारीख २१ मे १९५०*

*कोचीन एक्सप्रेस*

पहांटे ४–३५ ची कोचीन एक्सप्रेस पकडायची होती. त्यामुळें रात्रीं चांगलीशी झोंप येणें शक्यच नव्हतें. पावणेचारला उठलों, स्टेशनांतून हमाल आणले आणि स्टेशनांत जाऊन बसलों. चार-पांच रिकामे डबे असलेली एक गाडी एका प्लॅटफॉर्मवर उभी होती. ही मद्रासहून कोचीनला जाणारी कोचीन एक्सप्रेस असणें शक्यच नाहीं, असें समजून आम्हीं तिच्याकडे पाहिलेंहि नाहीं! स्टेशनांतल्या एका रेल्वेच्या माणसाला विचारलें म्हणून बरें झालें. गाडी हालायला एक मिनिट होतें. तो म्हणाला, हीच कोचीन एक्सप्रेस! म्हणजे तें असें झालें. मद्रासहून येणारी कोचीन एक्सप्रेस कोइमतूरवरून जातच नाहीं. कोइमतूरच्या पुढें पोदन्नूर जंक्शन आहे तिथें ती येते आणि कोइमतूरहून सुटलेलें हे कोइमतूरच्या उतारूंचे डबे तिथें तिला जोडले जातात. गाडी हालतां हालतांच आंत बॅगा टाकून आम्ही चढलों. फॉरेस्ट कॉलेजचे भोंसकर आणि जोशी पहांटे चारच्या या आडवेळींहि आम्हांला पोहोंचवण्याकरितां तक्या लांबून स्टेशनवर आले होते. त्यांचा कृतज्ञतापूर्वक निरोप घेत आम्हीं कोइमतूर सोडलें. पोदन्नूर जंक्शन सव्वापांचला आलें. कोचीन एक्सप्रेस पस्तीस मिनिटें उशिरां येऊन ५–५५ ला सुटली.

*चिनी छपरांचीं घरें*

आतां सात साडेसातच्या स्वच्छ सूर्यप्रकाशांत दोन्ही बाजूंचा देखावा चांगला दिसत होता. माणसें, घरें, निसर्गदृश्यें सगळेंच वेगळें होतें. आम्ही तामिळ प्रदेशांतून मल्याळी प्रदेशांत आलों होतों. हीं मलबारी घरें, या केरळ कन्यका! शेतांत काम करणाऱ्या स्त्रिया-मुली नव्हे — तरुण आणि म्हाताऱ्या स्त्रियासुद्धां खालीं पांढरा परकर, वर तसाच

पांढरा पोलका किंवा कांहींच नाहीं ! — आणि कानांत वरच्या बाजूला सोन्याच्या जाड बाळ्या घातलेल्या दिसत होत्या. घरांचीं छपरेंहि वेगळ्या घाटाचीं, — चिनी घरांचीं किंवा मंदिरांचीं छपरें असतात त्या प्रकारचीं होतीं. एका कौलारू छपरावर दुसरें छोटें कौलारू छप्पर; आणि या छोट्या छपराच्या दोन्ही कडा मिशांचे आंकडे वर वळवतात तशा वर वळलेल्या ! बहुतेक घरांच्या आवाराच्या छोट्या दरवाजावरसुद्धां लहानसें कौलारू छप्पर. कोचीन या नांवांतच नुसतें चीन नाहीं, तर या प्रदेशावर सयाम, इंडोचीन वगैरे देशांप्रमाणेंच चीनची दाट छाया पडलेली दिसते. या चिनी छपरांच्या कांहीं घरांचे कोपरे लाल, निळ्या, पिवळ्या रंगाच्या चौकोनांनीं सुशोभित केलेले दिसले. शेतांतल्या कांहीं स्त्रीपुरुषांच्या हातांत लांब दांड्याच्या विणलेल्या वेताच्या छत्र्याहि सयाम, इंडोचीनच्या चित्रांत दिसणाऱ्या छत्र्यांचीच आठवण करून देत होत्या.

*भरवस्तींतून आगगाडी*

दोन्ही बाजूंना मधून मधून काजू, केळीं, वेळू, पोफळी, नारळीचीं लांबच लांब बनें दिसत. पण सर्वांत गमतीची गोष्ट म्हणजे केव्हां केव्हां गांवांतल्या भर वस्तींतून आगगाडी जाई. दोन बाजूंना घरें दिसताहेत, ओट्यांवर माणसें बसलीं आहेत, बायका विहिरींतून पाणी काढताहेत, मुलें केळीं पोफळींच्या दाटींत खेळताहेत, पलीकडे बाजाराची गल्ली दिसते आहे, आणि आगगाडी मधून चालली आहे, याची मोठी गंमत वाटे. खुल्या माळांतून या असल्या वस्तींत गाडी शिरूं लागली कीं गाडी जोरानें शिट्टी देई !

९ वाजतां त्रिचूर स्टेशन आलें. नंतर कांहीं वेळानें देखावा बदलला. हिरवीं शेतें आणि नारळी-पोफळींच्या बनांऐवजीं आतां खाडीकांठची धुरकट राखी जमीन, पाण्याचे कालवे आणि चटईचीं छपरें असलेल्या होड्या दिसूं लागल्या. १०-३० वाजतां आलवाये स्टेशन आलें.





उठी!
नमस्कार













-Fishing a
Alleppy







स्टेशनाच्या पलीकडे उंचावर एक मुलींची शाळा दिसत होती, आणि डोक्याला पांढरीं फडकीं बांधलेल्या मुली आवारांत फिरत होत्या. कडक ऊन असल्यामुळें कीं काय, इथले बरेच स्त्रीपुरुष डोक्याला पांढरीं फडकीं बांधलेले दिसतात. एका बाजूला एक मोठें थोरलें चर्च दिसत होतें. स्टेशनांत रंगीबेरंगी वेताच्या सुंदर टोपल्या विकायला आल्या होत्या. आलवाये सोडल्यानंतर जुहूच्या किनाऱ्यासारखा माडांच्या झाडांनीं भरलेला किनारा दिसूं लागला. कांहीं वेळानें खाडीच्या कांठच्या कोळ्यांच्या झोंपड्या आणि किनाऱ्याला रांगेनें लावलेलीं कोळ्यांचीं चमत्कारिक जाळीं दिसूं लागलीं. बोटें पसरलेल्या हाताच्या पंजासारखा लांकडाचा पंजा करून त्याला तागडीच्या पारड्यासारखें जाळें लावायचें, आणि पोफळीच्या एका लांब सोटाच्या टोकाला हा लांकडी पंजा अडकवून आडव्या लांकडावर बसवलेला तो सोट खालीं-वर करायचा. भरती आली कीं सोट वर करून जाळें पाण्यांत सोडायचें आणि माशांसह वर ओढायचें. ओहोटी असतांना सोट खालीं दावून जाळें वर करून उन्हांत सुकत ठेवायचें. याला इकडले कोळी ' व्हाला ' म्हणतात, असें कळलें. कोचीनसाठीं ' एर्नाकुलम नॉर्थ ' स्टेशनांत आम्हांला उतरायचें होतें. कोचीन संस्थानाच्या राजधानीचें हें स्टेशन भव्य मोठें थोरलें असेल, अशी आमची कल्पना होती; पण गोरेगांव किंवा कांदिवलीसारख्या एका स्टेशनांत गाडी ११-१० ला शिरली ! ' एर्नाकुलम नॉर्थ ' अशी पाटी आम्हीं पाहिली, तेव्हां अजून एर्नाकुलमला वेळ आहे म्हणून स्वस्थ बसलेल्या आम्हांला धक्काच बसला, आणि घाईघाईनें आम्हीं सामान खालीं काढलें.

*भांडखोर रिक्षावाले व बावळट पट्टेवाला*

स्टेशनाच्या बाहेर आल्याबरोबर डोक्याला आणि कमरेला पांढरीं फडकीं गुंडाळलेले पंचवीस-तीस काळेकभिन्न मल्याळी रिक्षावाले गिधाडांसारखे आमच्या सामानावर तुटून पडले. कुणीं पाण्याचा खुजा घेऊन

आपल्या रिक्षांत ठेवला, तर कुणी एक बॅग आपल्या रिक्षांत कोंबली! त्यांची भाषा आम्हांला समजत नव्हती. कचकच करून त्यांनीं आमचें डोकें उठवलें. आम्हांला कोचीनची कांहींच माहिती नव्हती. चांगल्याशा हॉटेलाची स्टेशनांत चवकशी करून आम्हांला तिथें जायचें होतें. त्यांना जोरांत दम भरून आम्हांला कुठें जायचें नाहीं, सामान पुन्हा होतें तिथें स्टेशनांत आणून ठेवा म्हणून आम्हीं सांगितलें. तेव्हां एकमेकांशीं भांडत त्यांनीं तें सामान होतें तिथें आणून ठेवलें. कुणाला तरी एकाला आम्ही बोलावूं म्हणून सर्वजण आपापली रिक्षा धरून आमच्याकडे पाहात होते. आम्ही शांतपणें स्टेशनांतल्या दुकानांत गेलों आणि चहा पीत उभे राहिलों. एका रिक्षांत दोन माणसें बसतात. तिथल्या एका रिक्षावाल्याला आम्हीं बोलावला, आणि इथें चांगलें हॉटेल कुठलें आहे म्हणून विचारलें. त्याला थोडें इंग्रजी समजत होतें. ‘ मद्रास कॅफे ’ फार छान नवें हॉटेल आहे, म्हणून त्यानें सांगितलें. त्याच्या रिक्षांत बॅगा ठेवून आम्ही स्टेशनबाहेर पडलों. रिक्षावाल्याचें नांव ‘ जोसेफ ’ ऐकून आश्चर्य वाटलें. हजार-पंधराशें वर्षांपासून ख्रिस्ती मिशनरी कोचीन-त्रावणकोरच्या बाजूला आलेले असल्यामुळें इथें गोव्याप्रमाणेंच ख्रिस्तीहि खूप आहेत आणि मोठमोठीं चर्चेंहि पुष्कळ आहेत. भाषा, कपडे आणि रंगरूप सर्वांचें सारखेंच असल्यामुळें कोण हिंदु आणि कोण ख्रिस्ती तें ओळखणें कठीण. जोसेफ म्हणाला, ‘ समोरच्या कस्टमच्या चौकींत बॅगा दाखवून तुम्हांला पुढें जातां येईल. ’ चल, म्हणतांच त्यानें रिक्षा तिथें नेली. डोक्यावर कांहीं नसलेला एक कस्टमचा शिपाई तिथें दारावर बसला होता. बॅगा दाखवायला पाहिजेत काय, असें इंग्रजींत विचारतांच तो एकदम आंत पळाला, आणि डोक्यावर फेटा ठेवून बाहेर येत ‘ नो सर ’ म्हणून अदबीनें उभा राहिला! जोसेफनें रिक्षा वाटेला लावली. ‘ हें रे काय ? तो आंत गेला, फेटा घालून आला आणि बॅगा न पाहतां उभा राहिला म्हणजे काय ? ’

*आम्हीं जोसेफला विचारलें. जोसेफ हसून म्हणाला, ' साहेब, त्याला वाटलं असेल तुम्ही कुणी तरी कस्टमचेच अधिकारी उघडा बोडका* बसल्याबद्दल त्याला दम भरायला आलांत कीं काय ! '

छोटा मुरलीधर

स्टेशनांतून बाहेर पडल्यावर लाल मातीचे रस्ते, नारळीच्या बागांतलीं लहान लहान घरें वगैरे पाहून रत्नागिरी, वेंगुर्ल्यासारखें एर्नाकुलम, एकादें कोंकणी गांव आहे कीं काय असें वाटलें. मोठमोठ्या इमारती, मिशनरी कॉलेजें, हॉटेलें वगैरे समुद्राच्या बाजूला आणि मुख्य रस्त्यावर आहेत, जोसेफ म्हणाला. समुद्राकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरच ' मद्रास कॅफे ' होतें. कांहीं रिक्शांखेरीज रस्त्यावर फारशीं माणसें किंवा गाड्यांची रहदारी दिसत नव्हती. कॅफेच्या मॅनेजरशीं खोली ठरवीत असतां धोतर गुंडाळलेला एक काळा पोरगा आणि त्याच्याहून लहान दुसरा एक चड्डींतला पोरगा, आमच्या बॅगा घेऊन हॉटेलचा जिना चढूं लागले ! स्टेशनावरल्या रिक्शावाल्यांसारखेच हे विनाकारण लुडबूड करणारे रस्त्यावरचें हमाल समजून आम्हीं त्यांच्या अंगांवर ओरडूं लागलों. मॅनेजर म्हणाला, ' आमच्या हॉटेलचेच पोरगे आहेत ते. त्या काळ्या पोराला आम्ही सांगत असलेलें कांहीं कळेना. मल्याळींत तो कांहीं म्हणत होता तें आम्हांला समजेना. किंचित् उजळ वर्णाचा तो चड्डी नेसलेला चौदा-पंधरा वर्षांचा पोरगा तरतरीत होता. त्यानें, मी यांचें सर्व कांहीं पाहतों म्हणून त्या दुसऱ्याला घालवलें, आणि आमच्या बॅगा खोलींत व्यवस्थित ठेवून दाढीला, आंघोळीला पाणी वगैरे पाहिजे का म्हणून मोडक्या तोडक्या इंग्रजींत आम्हांला विचारलें. ' तुझें नांव काय ? ' म्हणून आम्हीं विचारलें; तेव्हां तो म्हणाला, ' मुरलीधर प्रभू ! ' त्याचें नांव ऐकून आम्ही आश्चर्यचकित झालों. नांव अगदीं ओळखीचें महाराष्ट्रीय वाटलें. आपण गोव्याचा सारस्वत असल्याचें त्यानें सांगितलें. त्याला मराठी येत नव्हतें; पण दलालांशीं

आपल्या रिक्षांत ठेवला, तर कुणीं एक बॅग आपल्या रिक्षांत कोंबली! त्यांची भाषा आम्हांला समजत नव्हती. कचकच करून त्यांनीं आमचें डोकें उठवलें आम्हांला कोचीनची कांहींच माहिती नव्हती चांगल्याशा हॉटेलाची स्टेशनांत चवकशी करून आम्हांला तिथें जायचें होतें. त्यांना जोरांत दम भरून आम्हांला कुठें जायचें नाहीं, सामान पुन्हा होतें तिथें स्टेशनांत आणून ठेवा म्हणून आम्हीं सांगितलें. तेव्हां एकमेकांशीं भांडत त्यांनीं तें सामान होतें तिथें आणून ठेवलें. कुणाला तरी एकाला आम्ही बोलावूं म्हणून सर्वजण आपापली रिक्षा धरून आमच्याकडे पाहात होते. आम्ही शांतपणें स्टेशनांतल्या दुकानांत गेलों आणि चहा पीत उभे राहिलों. एका रिक्षांत दोन माणसें बसतात. तिथल्या एका रिक्षावाल्याला आम्हीं बोलावला, आणि इथें चांगलें हॉटेल कुठलें आहे म्हणून विचरलें. त्याला थोडें इंग्रजी समजत होतें. 'मद्रास कॅफे' फार छान नवें हॉटेल आहे, म्हणून त्यानें सांगितलें. त्याच्या रिक्षांत बॅगा टेवून आम्ही स्टेशनबाहेर पडलों. रिक्षावाल्याचें नांव 'जोसेफ' ऐकून आश्चर्य वाटलें. हजार-पंधराशें वर्षांपासून खिस्ती मिशनरी कोचीन-त्रावणकोरच्या बाजूला आलेले असल्यामुळें इथें गोव्याप्रमाणेंच खिस्तीहि खूप आहेत आणि मोठमोठीं चर्चेंहि पुष्कळ आहेत. भाषा, कपडे आणि रंगरूप सर्वांचें सारखेंच असल्यामुळें कोण हिंदु आणि कोण खिस्ती तें ओळखणें कठीण. जोसेफ म्हणाला, 'समोरच्या कस्टमच्या चौकींत बॅगा दाखवून तुम्हांला पुढें जातां येईल.' चल, म्हणतांच त्यानें रिक्षा तिथें नेली. डोक्यावर कांहीं नसलेला एक कस्टमचा शिपाई तिथें दारावर बसला होता. बॅगा दाखवायला पाहिजेत काय, असें इंग्रजींत विचारतांच तो एकदम आंत पळाला, आणि डोक्यावर फेटा ठेवून बाहेर येत 'नो सर' म्हणून अदबीनें उभा राहिला! जोसेफनें रिक्षा वाटेला लावली. 'हें रे काय? तो आंत गेला, फेटा घालून आला आणि बॅगा न पाहतां उभा राहिला म्हणजे काय?'

आम्हीं जोसेफला विचारलें. जोसेफ हसून म्हणाला, ‘ साहेब, त्याला वाटलं असेल तुम्ही कुणी तरी कस्टमचेच अधिकारी उघडा बोडका बसल्याबद्दल त्याला दम भरायला आलांत कीं काय ! ’

छोटा मुरलीधर

स्टेशनांतून बाहेर पडल्यावर लाल मातीचे रस्ते, नारळीच्या बागांतलीं लहान लहान घरें वगैरे पाहून रत्नागिरी, वेंगुर्ल्यासारखें एर्नाकुलम, एकादें कोंकणी गांव आहे कीं काय असें वाटलें. मोठमोठ्या इमारती, मिशनरी कॉलेजें, हॉटेलें वगैरे समुद्राच्या बाजूला आणि मुख्य रस्त्यावर आहेत, जोसेफ म्हणाला. समुद्राकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरच ‘ मद्रास कॅफे ’ होतें. कांहीं रिक्शांखेरीज रस्त्यावर फारशीं माणसें किंवा गाड्यांची रहदारी दिसत नव्हती. कॅफेच्या मॅनेजरशीं खोली ठरवीत असतां धोतर गुंडाळलेला एक काळा पोरगा आणि त्याच्याहून लहान दुसरा एक चड्डींतला पोरगा, आमच्या बॅगा घेऊन हॉटेलचा जिना चढूं लागले ! स्टेशनावरल्या रिक्शावाल्यांसारखेच हे विनाकारण लुडबूड करणारे रस्त्यावरचें हमाल समजून आम्हीं त्यांच्या अंगांवर ओरडूं लागलों. मॅनेजर म्हणाला, ‘ आमच्या हॉटेलचेच पोरगे आहेत ते. त्या काळ्या पोराला आम्ही सांगत असलेलें कांहीं कळेना. मल्याळींत तो कांहीं म्हणत होता तें आम्हांला समजेना. किंचित् उजळ वर्णाचा तो चड्डी नेसलेला चौदा-पंधरा वर्षांचा पोरगा तरतरीत होता. त्यानें, मी यांचें सर्व कांहीं पाहतों म्हणून त्या दुसऱ्याला घालवलें, आणि आमच्या बॅगा खोलींत व्यवस्थित ठेवून दाढीला, आंघोळीला पाणी वगैरे पाहिजे का म्हणून मोडक्या तोडक्या इंग्रजींत आम्हांला विचारलें. ‘ तुझें नांव काय ? ’ म्हणून आम्हीं विचारलें; तेव्हां तो म्हणाला, ‘ मुरलीधर प्रभू ! ’ त्याचें नांव ऐकून आम्ही आश्चर्यचकित झालों. नांव अगदीं ओळखीचें महाराष्ट्रीय वाटलें. आपण गोव्याचा सारस्वत असल्याचें त्यानें सांगितलें. त्याला मराठी येत नव्हतें; पण दलालांशीं

कोंकणींत तो चांगला बोलूं लागला. आपले वडील इथें नोकरीला आहेत. आपण इंग्रजी दुसरी इयत्ता यंदाच पास झालों, वगैरे स्वतःची बरीच माहिती त्यानें सांगितली. हॉटेलांत नोकरी करून शाळेंत कसा जातोस म्हणून विचारलें; तेव्हां सुट्टीचे हे दोन महिनेच नोकरी करणार – तेवढेच फीला आणि पुस्तकांना पैसे होतील, तो म्हणाला. ‘ हॉटेलवाला चांगलें चोपून काम करून घेतो ’, तो सांगत होता, ‘ कांहीं दिवसांपूर्वी सरदार पटेल इथें कोचीनला आले होते तेव्हां त्यांना पाहयला जाण्यासाठींसुद्धां सुट्टी दिली नाहीं मालकानं ! ’ ‘ आमचे मळके कपडे इथें कुणी धुऊन देईल काय ? ’ आम्हीं विचारलें. ‘ मी धुतों ’ तो उत्साहानें म्हणाला, ‘ साबू द्या माझ्याकडे ? ’ ‘ ठीक आहे. आम्ही तुला पैसे देऊं कपडे धुण्याचे ’ आम्ही म्हणालों. ‘ नो मनी, सर ’ तो उद्‌गारला, ‘ धुण्याचे कसले पैसे ! ’ ‘ छे; छे; तुला घेतलेच पाहिजेत ! ’ आम्ही म्हणालों. पोरगा मोठा हंसतमुख आणि उमदा होता. बहुतेक वेळ आमच्या दाराशीं बसून असायचा. कपडे वाळले तेव्हां मॅनेजरच्या खोलींतली नवी कोरी चटई आमच्या खोलींत आणून तिच्यावर कपड्याच्या घड्या करीत बसला ! आम्ही शब्द काढायचा अवकाश कीं, चहा, कॉफी, जेवणाचीं ताटें आमच्या खोलींत आणून द्यायचा.

*चिनी होड्या – चिनी टोप्या !*

कोचीनला जायचें म्हणजे एर्नाकुलमच्या धक्क्यावरून अर्ध्या अर्ध्या तासानें सुटणाऱ्या लाँचनें जावें लागतें. कोचीन ते एर्नाकुलम समुद्रावरल्या पुलावरून बसहि जाते. दुपारीं ४-३० ला भटकण्यासाठीं बाहेर पडलों. कोचीनला लाँचनें जावें आणि संध्याकाळीं हॉटेलांत परत यावें असें ठरवलें होतें. समुद्राकडे गेल्यावर एर्नाकुलम म्हणजे अगदींच रत्नागिरी-वेंगुर्लें वाटलें नाहीं. सेंट थेरेसा कॉलेज, सी-व्ह्यू हॉटेल, आल्बर्ट कॉलेज वगैरे मोठमोठ्या इमारती दिसल्या, आणि स्वच्छ

डांबरी रस्त्याला लागून मुंबईच्या मरीन ड्राइव्हसारखी फिरायचीहि सोय छान होती. तासभर भटकून ५–४५ ची कोचीनला जाणारी लाँच पकडली. ऑफिसांत किंवा टाटांच्या ' टॉमको ' साबूच्या कारखान्यांत एर्नाकुलमला कामाला आलेले बरेच पांढरपेशे व इतर लोक या लाँचवरून कोचीनला परत जात होते. कांहीं वेळानें विलिंग्डन बेटाच्या धक्क्याला लाँच लागली. तिथें कांहीं लोक उतरले. कोचीनला आलेले बडे पाहुणे जिथें उतरतात तें भव्य ' मलबार हॉटेल ' याच बेटावर आहे. दूर त्याची इमारत दिसत होती. पलीकडे दिसणाऱ्या एका बेटावर मोठमोठ्या सुंदर इमारती दिसत होत्या. इमारतींत ब्रिटिश अमदानींत कोचीन-त्रावणकोर संस्थानांचा रेसिडेंट राहात असे, असें कळलें. कांहीं दिवसांपूर्वी सरदार पटेल इथें येऊन गेले तेव्हां ते याच बंगल्यांत उतरले होते म्हणे. कोचीनच्या समुद्रांतल्या होड्या आणि त्यांतल्या कांहीं होडीवाल्यांच्या टोप्या पाहून पुन्हा एकदां मला चीनची आठवण झाली. चिनी होडक्यांना ' संपन ' म्हणतात. या संपनचीं शिडें चौकोनी असतात. या कोचीनमधल्या होड्यांचीं शिडें अशींच चौकोनी गोणपाटाचीं होतीं. आपल्याकडलीं आपण पाहतों तीं शिडें लांबट त्रिकोणी असतात. त्याचप्रमाणें चिनी शेतकरी वापरतात तशाच रुंद कांठाच्या चटईच्या टोप्या उघड्या अंगाच्या होडीवाल्यांच्या डोक्यांवर दिसल्या. साडेसहाच्या सुमाराला कोचीनच्या धक्क्याला लाँच लागली. हा धक्का लाँच, पडाव वगैरे लागण्याचा. मोठमोठ्या बोटी, युद्धनौका वगैरे जिथें असतात तें मोठमोठ्या गोद्या असलेलें कोचीन बंदर पलीकडे आहे. या धक्क्याला लागून पिवळ्या रंगाच्या वखारींच्या इमारती रांगेनें होत्या.

*आम – ऊम – अरदर इल्ला !*

धक्क्यावर उतरून गांवांत गेलों तेव्हां तांबड्या मातीचे रस्ते, नारळीच्या बागांतलीं घरें वगैरे पाहून पणजी, कारवारसारख्या कोंक-

णांतल्याच एखाद्या मोठ्या शहरांत फिरतों आहोंत, असें वाटलें. गोव्यांत दिसतात तसे जुन्या पोर्तुगीज पद्धतीचे मोठमोठ्या कमानीच्या खिडक्या असलेले, वेलबुट्टी काढलेल्या पांढऱ्या भिंतींचे, कांहीं वाडेहि मधून मधून दिसले. आपल्याकडले मजूर काम करतांना कांहींतरी ताल-बद्ध तोंडानें म्हणत असतात तसेंच इथल्या रस्त्यांतून खोबरेल तेलाचीं प्रचंड पिंपें ढकलीत नेत असलेले मजूर ' आम – ऊम – अरदर इल्ला ! ' असें कांहींतरी तालावर म्हणत होते ! इथली बाजारपेठ आहे त्या भागाचें नांव मटनचेरी. दलालांच्या मुंबईतल्या ओळखीच्या एका गृह-स्थांचा इथें फोटो स्टुडिओ आहे. ते गृहस्थ आहेत का पाहावें म्हणून पत्ता काढीत त्यांच्या घराकडे रिक्षा नेली. ते गृहस्थ मुंबईला गेल्याचें कळलें; पण त्यांच्या घरच्या एका माणसानें इथें एक ' महाराष्ट्र समाज ' आहे आणि आसपास कांहीं महाराष्ट्रीयांचीं घरें आहेत असें सांगून रिक्षावाल्याला मल्याळींत बरोबर पत्ता सांगितला. तिथल्या एका घराकडे रिक्षावाल्यानें आम्हांला नेलें. एक गोरागोमटा, गोल धोतर लावलेला मुलगा दाराशीं उभा होता. आपलें नांव कांहीं तरी ' कर ' म्हणाला तो, पण एक-दोन वाक्यांत त्याचें मराठी संपुष्टांत आलें ! रिक्षावाल्याला अस्खलित मल्याळींत कांहींतरी सांगून तुम्हांला ' महाराष्ट्र समाजांत ' नेतों असें म्हणून शेजारच्या घराच्या वरच्या मजल्यावर आम्हांला तो घेऊन गेला. मुंबईचे अत्तराचे व्यापारी श्री. ढमढेरे यांची ती कचेरी होती. त्यांचे मॅनेजर श्री. देव तिथें असतात. ' महाराष्ट्र समाजा 'चे ते चालक असावे. देव तिथें नव्हते, पण सुब्रह्मण्यम् नांवाच्या त्यांच्या कारकुनानें आम्हांला बसवून घेतलें, आणि आमच्याशीं बऱ्याच गप्पा केल्या. ' मलबारचीं ' खारीं सरोवरें ' किंवा बॅक वॉटर्स फार प्रसिद्ध आहेत. कोचीनहून खालीं त्रिवेंद्रमपर्यंत लॉंचनें या सरोवरांतून जातां येतें. तुम्ही अलेप्पीपर्यंत तरी असेंच लॉंचनें जा. गांवागांवांतून या पाणरस्त्या-

वरून लॉँच जाते तेव्हां एक वेगळीच मौज वाटते,' वगैरे वगैरे खूप उपयुक्त माहिती त्यानें आम्हांला दिली.

खूप काळोख झाला होता. येतांना लॉँच न घेतां मटनचेरीच्या बस-स्टँडवर एर्नाकुलमला जाणारी बस घेतली. समुद्रावरले दोन-तीन मोठे थोरले पूल ओलांडून एर्नाकुलम बाजारपेठेंतून बरेंच वळसे घेऊन बस आमच्या हॉटेलच्या रस्त्याला आली. हॉटेलमध्यें पोहोंचेपर्यंत रात्रीचे पावणेनऊ वाजले होते.

● ● ●

*तारीख २३ मे १९५०*

*वास्को-द-गामाचें घर*

मुंबईसारखीच घामानें अंग चिकट करणारी इकडची हवा दमट, ऊष्ण आहे; तरी पण कोंकणांतल्या समुद्रकांठच्या गांवांत ज्याप्रमाणें हवा मुंबईसारखीच असली तरी नारळी-पोफळींच्या बागा, छोटीं छोटीं घरें आणि गर्दीचा अभाव असल्यामुळें मोकळें वाटतें तसेंच इथेंहि वाटतें. आज सकाळीं सात वाजतांच रिक्शा घेऊन गांवांत भटकायला बाहेर पडलों. आधीं धक्क्यावर जाऊन दुपारीं अलेप्पीला जाणाऱ्या लॉँचचीं तिकिटें घेऊन टाकलीं, आणि मग गांव पाहायला निघालों. कोंकणी गावांत फिरतों आहोंत असेंच वाटत होतें; पण मध्येंच कोचीनच्या आर्चबिशपचा मुंबईंतल्या टाउनहॉलसारखा जुनाट पद्धतीचा पण भव्य बंगला पाहून किंवा एकाद्या चहाच्या दुकानांत 'कूंऽऽउं उं उं ऊंऽऽकूंऽऽ उं उं उं उं ऽऽ' अशा मल्याळी गाण्याच्या ताना आरवणारी ग्रामोफोन रेकॉर्ड ऐकून, आपण कोंकणांतल्या गांवांत नसून केरळांतल्या एका मुख्य शहरांत आहोंत याची आठवण होत होती! एका जुनाट मोठ्या थोरल्या घराकडे बोट दाखवून कुणीसा म्हणाला, वास्को-द-गामा या घरांत राहात होता. कालिकतच्या झामोरिनच्या थोबाडींत

मारणारा–हिंदुस्थानांत येणारा पहिला साहेब इथें राहात होता तर ! त्या वाड्याच्या जीर्ण भिंतींकडे टक लावून पाहात पांचशें वर्षांपूर्वीचा तो इतिहास आठवूं लागलों. मन दुःखी कष्टी झालें.

*हें तुमचं घर !*

पोर्तुगीजांच्या मागून या देशांत डच आले. तेहि इथें कोचीनमध्यें येऊन गेलेले दिसतात. एके ठिकाणीं बरीचशीं जुनाट थडगीं दिसलीं, तिथें ‘ डच सिमेटरी ’ अशी पाटी होती. हजारों वर्षांपूर्वी कांहीं यहुदीहि इथें येऊन स्थाईक झालेले आहेत. खालीं धोतर गुंडाळलेलाच पण डोक्याला एक टक्कल–टोपी घातलेला एक लांब नाकाचा किंचित् उजळ म्हातारा रस्त्यावरून जात होता. रिक्षावाल्याला विचारलें, ‘ हा कोण रे ? ’ तो म्हणाला, ‘ दूरण ! ’ इथें यहुद्यांना ‘ दूरण ’ म्हणतात असें कळलें. यहुद्यांची एक सिनेगॉग किंवा प्रार्थना-मंदिरहि एके ठिकाणीं दिसलें. आपला भारत म्हणजे ‘ आव जाव, घर तुम्हारा ! ’ मुसलमान या, ख्रिस्ती या, यहुदी या, आमच्या थोबाडींत मारा; — अल्पसंख्यांक म्हणून आम्ही तुम्हांला रक्षणच देऊं !

*मल्याळी स्त्रिया*

समुद्राचे फांटे आंत घुसून साऱ्या मलबारभर खारीं सरोवरें किंवा ‘ बॅक वॉटर्स ’ झालीं आहेत. तसला एक कालवा एर्नाकुलममध्येंहि दिसला. चटईच्या छपराच्या बऱ्याच होड्या या कालव्यांत दिसत होत्या. रस्त्या-वर दिसणाऱ्या मल्याळी स्त्रियांचा वेश पाहून पुन्हा पुन्हा मला पॅसिफिक महासागरांतल्या हवाई किंवा सॅमोआसारख्या बेटांवरल्या, ‘ सेरॉंग ’ नांवाचें रंगीबेरंगी चित्रविचित्र फडकें कमरेला गुंडाळलेल्या, डोक्यांत फुलें खोंचलेल्या आणि वक्षस्थल उघडं टाकून फिरणाऱ्या चित्रपटांत पाहिलेल्या स्त्रियांची आठवण होत होती. अनावृत वक्षानें फिरणाऱ्या स्त्रिया इथें फारशा नव्हत्या; पण थोड्याशा होत्याच. कमरेला गुंडाळलेलें इथल्या स्त्रियांचें फडकेंहि रंगीबेरंगी नसतें; पांढरें असतें.

मराठी ... ठा...
अनुक्रमांक २८८०८ वि. ...
क्रमांक ...२९५... नों. दि. ...


ब-याच स्त्रिया असलें पांढरें फडकें कमरेला, वर पांढरें पोलकें आणि क्वचित् त्यावर शालीसारखें एक पांढरेंच फडकें खांद्यावरून घेतलेलें, अशा वेशांत होत्या. बहुतेकांच्या कानांत वरच्या बाजूला सोन्याची जाड बाळी आणि कानाच्या पाळींत सोंगट्यासारख्या चार-पांच सोन्याच्या चौकोनी तुकड्यांचा कान फाटण्याइतक्या वजनाचा घोंस होता. हें एक विचित्र कर्णभूषण इथें दिसतें. हा वेश घालणाऱ्या, हीं कर्णभूषणें वापरणाऱ्या किंवा वक्ष उघडे टाकून फिरणाऱ्या या स्त्रिया कदाचित इथल्या खालच्या वर्गांतल्या असतील; वरच्या वर्गांतल्या यांहून अधिक भरपूर कपडे करीत असतील. पांढराच फडका पण पातळासारखा घेतलेला आणि छाती झांकून गळ्यांत दोरीनें अडकविलेला, अशाहि कांहीं स्त्रिया दिसल्या. मला वाटतें, स्तन उघडे टाकणें आतां फक्त जुन्या आणि मागासलेल्या बायकांत राहिलें असावें. पोलकें घालणें, छाती झांकणें हें अधिकाधिक नवेपणाचें चिन्ह असावें.

*कर्मठ नंबुद्री*

मात्र पांढऱ्या कापडाची सर्रास आवड केरळीय स्त्रियांनाच नव्हे तर पुरुषांनाहि असावी, असें वाटतें. म्हैसूरमधल्या कानडी किंवा कोइमतूरमधल्या तामिळ पुरुषांसारखेच इथलेहि पुरुष धोतर गोल गुंडाळतात, वर एक शर्ट घालतात आणि बहुधा अनवाणी चालतात; पण इथल्या बहुतेक पुरुषांचीं धोतरें किंवा शर्ट्स् पांढऱ्याशुभ्र परीटघडीचीं असतात. खांद्यावर चापून चोपून इस्त्री केलेलें जरीकांठी उपरणें दिसतें. असाच एक तुळतुळीत दाढीमिशी केलेला, तुकतुकीत गोरा, भस्मचर्चित भव्य कपाळ असलेला, पांढऱ्या स्वच्छ कपड्यांतला, रुपेरी केंसांचा रुबाबदार म्हातारा समोरून येणाऱ्या एका रिक्शांत दिसला. मीं सहज दलालांना म्हटलें, ' नंबुद्री ब्राह्मण कुळांतले आद्य शंकराचार्य इथले मलबारमधलेच बरं का! इथल्या काळ्या सामान्य मल्याळी माणसांत हे उजळ नंबुद्री एकदम उठून दिसतात; हा कुणी

तरी नंबुद्रीच दिसतोय्! ' माझ्या तोंडांतला 'नंबुद्री' शब्द ऐकून आमची रिक्षा ओढणाऱ्या मल्याळी हमालांनें एकदम मागें वळून पाहिलें, आणि हंसून, 'तुम्हीं बरोबर ओळखलंत!' अशा अर्थानें मान हालवली. एका रस्त्यावरल्या कोपऱ्यावर पुण्याच्या साहित्य परिषदेच्या इमारतीसारख्याच एका छोट्याशा जुन्या इमारतीवर 'समस्त केरळ साहित्य परिषद्' अशी पाटी दिसली. तांबड्या मातीच्या एका छोट्याशा शांत रस्त्यानें रिक्षा जात असतां एक पांच-सहा वर्षांची चिमुरडी मल्याळी मुलगी आपल्या दीड-दोन वर्षांच्या छोट्या बहिणीला घेऊन रस्त्याच्या कडेला पापड विकीत बसलेली दिसली. कानडी किंवा तामिळ स्त्रिया किंचित वेगळ्या पद्धतीनें पण आपल्याइथल्या बायकांसारखींच रंगीत लुगडीं वापरतात. पांढरें कापड वापरणाऱ्या इथल्या स्त्रियांची वेशभूषा एकदम वेगळी असली तरी इथले जेवणेंखाणें कानडी, तामिळ पद्धतींचेंच, म्हणजे सकाळीं इडली-दोशे आणि दुपारीं सांबार-भात, पापड वगैरे असें दिसतें. वाटेंत एका दुकानांत कॉफी घेतली आणि एर्नाकुलमच्या जुन्या स्टेशनाच्या पलीकडे असलेला टाटांचा 'टॉमको' साबूचा भव्य कारखाना बाहेरूनच पाहिला.

*सेंट्जॉर्ज आणि राधा*

दुपारीं बाराला सुटणारी अलेप्पी एक्सप्रेस लॉंच पकडण्याकरितां सामान रिक्शांत घालून पायींच पावणेअकराला धक्क्याकडे निघालों. पुष्कळ लॉंचेस एकमेकांना खेटून पाण्यांत उभ्या होत्या. अलेप्पीला जाणाऱ्या आमच्या 'एम्पायर' लॉंचमध्यें मुळींच गर्दी नव्हती. टोंका-कडच्या कॅबिनमध्यें आम्ही दोघे आणि लॉंचवाल्याचीं दोन पोरें एवढेच उतारू होते! सगळेच मल्याळी दिसत असले तरी इथल्या लोकांत बरेच ख्रिस्ती आहेत, हें इथल्या या बाफोरांच्या नांवावरूनहि समजतें. एका लॉंचचें नांव 'राधा' तर दुसरीचे 'सेंट जॉर्ज'! लाट उसळली कीं 'राधे'ला 'सेंट जॉर्ज' धक्के देत होता! बरोबर बाराच्या

ठोक्याला आमच्या 'एम्पायर'नें धक्का सोडला. विलिंग्डन बेटा-वरून आम्ही काल गेलों होतों त्या मटनचेरीच्या धक्क्याला १२-२५ ला लॉंच लागली. इथें कोचीनमधले बरेच उतारू चढले. मटनचेरी सोडल्यानंतर मलबारचीं खारीं सरोवरें सुरू झालीं. 'झुगुझुगु, झुगुझुगु' करीत लॉंच शांत पाण्यावरून पुढें जात होती. दोन्ही बाजूंना हजारों नव्हे लाखों नारळीचीं झाडें कित्येक मैल दाटीनें दिसत होतीं. मधून मधून एखाद्या खेड्याचा किनारा दिसायचा. किनाऱ्यावर हारीनें मल्याळी कोळ्यांनीं लांकडी पंजांना लटकवलेलीं 'व्हाला' जाळीं दृष्टीला पडायचीं. चटईची रुंद टोपी डोक्यावर ठेवलेला एकादा उघडा-बंब कोळी लहानशा होडक्यांत बसून पाण्यांत टाकलेल्या गळाला मासा लागतो का म्हणून शांतपणें वाट पाहात बसलेला दिसे.

*'आवेल', 'आवेल'*

हिरव्यागार झाडींतून मधून मधून डोकावणाऱ्या झावळ्यांच्या झोंपड्या असलेल्या 'पुचाक' गांवाच्या धक्क्याला २–१५ ला लॉंच लागली. कांहीं झोंपड्यांच्या दारांसमोरच्या उघड्या जागेंत पांढरा परकर पोलकेंवाल्या मल्याळी बाया आणि उघड्या अंगाचे पुरुष काथ्या वळवीत असलेले किंवा काथ्याचें दोर वळीत असलेले दिसले. २–४५ ला 'वायकोम' गांव आलें. एक माणूस केळीच्या सुक्या पानांच्या कसल्या-तरी पुड्या दोन दोन आण्यांला एक लॉंचमध्यें येऊन विकत होता, आणि तोंडानें 'आवेल' 'आवेल' म्हणून ओरडत होता. लॉंचमधल्या सुशिक्षित दिसणाऱ्या एका माणसाला या पुडींत काय आहे म्हणून इंग्रजींत विचारलें. 'आवेल' म्हणजे साखर लावलेले पोहे, तो म्हणाला. पांचच्या सुमारास दोन्ही बाजूंना माडांची गर्द झाडी असलेल्या एका रुंद कालव्यांत लॉंच शिरली. इतर गांवांत डांबरी रस्ते असतात त्याप्रमाणें श्रीनगरमध्यें किंवा व्हेनिसमध्यें लहान-मोठे कालवे किंवा पाणरस्ते आहेत, आणि लोक 'शिकाऱ्यां'तून किंवा

' गोंडोलां 'तून इकडून तिकडे जातात, भाजीपाला विकतात, सामान नेतात. त्याप्रमाणेंच इथल्या बऱ्याचशा गांवांत होड्यांतून व्यवहार चालतो. मोठ्या कालव्याला लागून लहान लहान कालवे अलेप्पी शहरांत गेलेले दिसत होते. मोठ्या कालव्यांतून आमची लॉंच दुसऱ्या एका कालव्यांत वळली, आणि चटईच्या छपरांनीं आच्छादलेल्या शेंकडों होड्या पाण्यांत डुलत असलेल्या दिसूं लागल्या. कांहीं वेळानें घाटाच्या-सारख्या पायऱ्या असलेल्या अलेप्पीच्या मुख्य धक्क्याला लॉंच लागली. धक्का चढून वर गेल्यावर रस्त्याच्या पलीकडे समोरच दिसणाऱ्या ' श्रीकृष्ण भवन ' हॉटेलांत एक काळोखी खोली मिळाली, ती फारसा विचार न करतां आम्हीं घेऊन टाकली. दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्रिवेंद्रमच्या वाटेवर असलेल्या ' कायलॉन 'ची बस आम्हांला पकडायची होती; आणि बसचा स्टॅंड धक्क्याच्या आसपास हॉटेलजवळच होता.

*व्हेनिसहून रमणीय अलेप्पी*

कॉफी घेऊन अलेप्पी गांव आणि अलेप्पीचें बंदर पाहायला बाहेर पडलों. कोंकणांत घरांसाठीं भोंकें भोंकें असलेला लाल जांभा दगड फार वापरतात. तसलेच चिरे इकडच्याहि बऱ्याच घरांना दिसले. छपरें अर्थात चिनी छपरांची आठवण करून देणारीं, वर वळलेल्या कडांचीं होतीं. इथलीं हिंदू देवळेंहि वेगळींच वाटलीं. देवळांचें रूप बरेंचसें राहण्याच्या घरांसारखें होतें. रस्त्यापासून देवळाच्या दारापर्यंत दोन्ही बाजूंना लांकडी खांब असलेला कौलारू छपराचा रस्ता, देवळावरहि घरासारखींच कौलें आणि खेड्यांतल्या घरांना ओट्याभोंवतीं लांकडी पट्ट्यांच्या चवकटींची भिंत घालतात तशा लाल निळ्या रंगवलेल्या चवकटी गाभाऱ्याच्या सभोंवार! व्हेनिसपेक्षांहि अलेप्पींतले कालवे लांबरुंद आहेत. छपरी होड्यांनीं भरलेल्या उभ्या आडव्या कालव्यांच्या या शहरांत व्हेनिसपेक्षांहि स्वच्छ सूर्यप्रकाश असल्यामुळें मला तर अलेप्पी व्हेनिसपेक्षांहि रमणीय वाटलें. व्हेनिसमध्यें तांबडी माती आणि हिरवे

माड कुठें आहेत ? हे कालवे, या होड्या, घरांचीं हीं दुहेरी छपरें आणि वेताच्या टोपल्या डोक्यावर घेऊन, फाटलेल्या कानांतले सोन्याच्या सोंगट्यांचे घोस हालवीत रस्त्यांतून चाललेल्या या पांढऱ्या परकर-पोल-क्यांतल्या मल्याळी बाया पाहात रिक्शांतून फिरतांना, आपण एकाद्या चित्रांत पाहिलेल्या सयामी शहरांतून चाललों आहोंत असें वाटतें ! एका मोठ्या कालव्याच्या कांठीं 'व्होलकार्ट ब्रदर्स,' वगैरे युरोपियन कंप-न्यांच्या नांवांच्या पाट्या असलेल्या, वखारींच्या जुनाट पिवळ्या इमारती दिसल्या. फिरत फिरत आम्ही अलेप्पीच्या निळसर पांढऱ्या वाळूच्या लांबच लांब समुद्र-किनाऱ्याकडे आलों होतों. हजारों माडांच्या हिरव्या झांवळ्यांचीं छत्रचामरें त्या निळसर पांढऱ्या वाळूच्या अफाट विस्तारावर ढळत होतीं, आणि घसाघस आदळणाऱ्या हिरवट लाटा पांढऱ्याशुभ्र फेंसाचे हार किनाऱ्यावर फेंकीत होत्या. मावळत्या सूर्याच्या तांबूस सोनेरी प्रकाशांत आकाशांत मध्येंच कुठून तरी आलेल्या जांभळ्या ढगांच्या छाया समुद्राच्या पाण्यावर तरळत होत्या.

*ओळखीचीं नांवें*

अलेप्पी बंदराचा पांढऱ्या रंगाचा प्रचंड दीपस्तंभ किनाऱ्यावरच आहे. जवळ पांढऱ्याच रंगाचा प्रवासी बंगला आणि एक 'मरीन' बंगला आहे. माल चढवण्या-उतरण्याकरितां मोठमोठ्या याऱ्या असलेला अलेप्पीचा धक्का दूरवर समुद्रांत गेला आहे. धक्क्याच्या कठड्याकडे उभ राहून खालीं फेंसाळून उसळणाऱ्या लाटा पाहायला मजा वाटते.

हॉटेलांत परत येतांना एक मोठें थोरलें उंच मनोऱ्यांचें चर्च आणि कॉन्व्हेंटची पांढरी इमारत दिसली. या बाजूला गोवें, मंगळूरकडले बरेच लोक व्यापारासाठीं आलेले दिसतात; कारण बऱ्याच दुकानांच्या पाट्यांवर प्रभु, पै, दामोदर शेणाय वगैरे नांवें दिसत होतीं. कालव्यांतल्या छपरी होड्यांवरल्या नांवांवरून बहुतेकांचे मालक मुसलमान किंवा खिस्ती असावे, असें वाटलें. हिंदु या धंद्यांत नसावेत. अर्थात सर्व

होडीवाले दिसत होते सारखेख—लुंगी लावलेले काळे मल्याळी! 'श्रीकृष्णभवन' हॉटेल कुणातरी कारवार-मंगळूरकडल्या माणसाच्याच मालकीचें असावें; कारण आपल्याकडल्या ब्राह्मणासारखाच पंचा लावलेला उजळ वर्णाचा वाढपी आम्हांला विशेष आस्थेनें वाढीत होता, आणि मोडक्या तोडक्या हिंदी इंग्रजींत आमच्याशीं बोलत होता.

● ● ●

*तारीख २४ मे १९५०*

*हत्ती भेटला!*

'क्कायलॉन'ला जाण्यासाठीं सकाळीं ७—३० ला सुटणारी एक्स्प्रेस बस पकडली. बस वेळेवर निघाली. गांवांतून बस बाहेर पडत असतां कांहीं मोठ्या कालव्यांच्या घाटांवरचें सकाळच्या वेळचें दृश्य पाहण्यासारखें होतें. लाल टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या भरून आलेल्या किती तरी होड्या घाटाला लागल्या होत्या. घाटावर भाज्या, कांदे, बटाटे, टोमॅटोचे ढीग पुढयांत ठेवून विकणारे बसले होते. सकाळच्या वेळीं कालव्याच्या घाटावर भाजीबाजार भरतो असें दिसतें. गांवाबाहेर पडतांना बस एका पोलिस चौकीपाशीं थांबली. पलीकडल्या शेतांत एक पाण्याचें डबकें होतें. तिथें जवळच असलेल्या कुठल्या तरी तुरुंगांतले दहा-वीस कैदी कडक पोलिस पहाऱ्यांत सकाळची न्याहारी केल्यानंतर आपल्या थाळ्या-वाट्या धुण्याकारितां आले होते. त्या घाणेरड्या डबक्यांत ते थाळे-वाट्या धूत होते, आणि तिथलेंच पाणी वाट्यांत घेऊन बिचारे घटाघट पीत होते. कसेंसेंच वाटलें. कांहीं वेळानें खारीं सरोवरें आणि कालव्यांच्या प्रदेशांतून बस जाऊं लागली. त्रावणकोरांत हत्ती फार आहेत, आणि तिथलें हस्तिदंती कामहि फार उत्कृष्ट असतें, असें ऐकलें होतें; पण अजूनपर्यंत हत्ती दिसले नव्हते. झाडें पाडण्याकारितां किंवा ओंडके ओढण्याकरितां ब्रह्मदेशाप्रमाणेंच इथेंहि हत्ती

कामाला लावतात असें दिसतें; कारण एका बाजूनें बस जात असतां दोन कालव्यांच्या मधल्या अरुंद वाटेवरून एक भला मोठा हत्ती डुलत डुलत चालला होता. त्याच्या गळ्यांत साखळदंड लोंबत होता आणि त्याच्या पाठीवर त्याचा उघडाबोडका मल्याळी माहूत आरामांत बसला होता.

*खालीं धोतर वर टाय !*

हरिपाद गांवांत बस उभी राहिली तेव्हां जवळच्या एका घरावर, त्रावणकोरचे एके काळीं गाजलेले दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांच्या स्मरणार्थ उघडलेल्या दवाखान्याची 'सी. पी. आर. अय्यर डिस्पेन्सरी' नांवाची पाटी दिसली. कायमकुडी गांवाच्या बस-स्टँडवर गाडी थांबली तेव्हां सकाळचे ९ वाजले होते. तिथल्या दुकानांत कॉफी घेतली, आणि रस्त्यावर इकडे तिकडे फिरून पाय मोकळे केले. स्वच्छ पांढरा शर्ट, स्वच्छ परीटघडीचें गोल धोतर आणि एक रेशमी काळी आणि एक सोनेरी जरीची रेघ असलेल्या किनारीच्या स्वच्छ पांढऱ्या उपरण्याची खांद्यावर घडी, अशा वेशांतले बरेच पुरुष रस्त्यावर दिसत होते. कपडे उंची आणि स्वच्छ, पण पायांत मात्र कांहीं नाहीं ! गोल धोतरावरच्या पांढऱ्या शर्टाला कांहींनीं टाय लावलेलाहि दिसला. पण हे टायवालेहि अनवाणीच होते ! खेड्याखेड्यांतून बस जात असतां अनेक दृश्यें दिसत होतीं. एके ठिकाणीं थोडा वेळ गाडी थांबली. रस्त्याच्या पलीकडे चौकीसारख्या दिसणाऱ्या कौलारू देवळाच्या दारांत शंकराचार्यांसारखा दिसणारा भस्मचर्चित पुजारी बसला होता. पांढरा परकर, पांढरी चोळी ल्यालेली, कपाळावर लाल गंधाचे आणि भस्माचे पट्टे ओढलेली एक मल्याळी बाई देवळाकडे येत होती. देवळासमोरच्या पुष्करिणींतील लाल कमळें वाऱ्यावर डुलत होतीं. एकाद्या चित्रकारानें रंगवण्यासारखा तो देखावा होता. दुसऱ्या एका खेड्यांतल्या झोंपडीच्या दारांत एका उखळासारख्या लहानशा घाण्यांत एक मल्याळी म्हातारी

खोबऱ्याचें तेल काढीत असलेली दिसली. रस्त्यावर एका बाजूला एक पुरें न झालेलें नवें घर दिसलें. त्याच्या दारावर एक लांकडी माकड लोंबत होतें. बसमधल्या बाजूच्या माणसाला, 'हें काय?' म्हणून विचारलें. तो म्हणाला, 'घराला दृष्ट लागूं नये म्हणून हें माकड बांधलें आहे. आमच्या लोकांत दृष्टीचें फार स्तोम आहे!' त्यानंतर करुनागपल्ली गांव आलें. रस्त्यांतल्या बऱ्याच घरांच्या आवाराच्या भिंती मातीच्या होत्या आणि माती पावसांत वाहून जाऊं नये म्हणून कीं काय वरच्या बाजूला माडाचीं चुडतें छपरांसारखीं लावलेलीं होतीं.

*टॅपिओकाचीं झाडें*

'क्वायलॉन'च्या बाजारांत बस आली तेव्हां सव्वादहा वाजले होते. त्रिवेंद्रमला जाणारी गाडी पावणेअकरालाच होती, तेव्हां तावडतोब सामान एका रिक्शांत भरलें आणि जवळच असलेल्या 'क्वायलॉन' स्टेशनाकडे जायला पायींच निघालों. 'क्वायलॉन' हें त्रिवेंद्रमच्या खालोखाल महत्त्वाचें त्रावणकोरमधलें शहर आहे म्हणतात. 'क्वायलॉन' स्टेशन आणि जवळच असलेला प्रवासी बंगला या दोन्ही इमारती वैशिष्ट्यपूर्ण वाटल्या. लहान लहान गोल कौलारू छपरांचे तांबड्या रंगाचे पुंजके या इमारतींवर दिसत होते. तिबेटी किंवा नेपाळी देवाल्यांची अशी छोटीं छोटीं छपरें चित्रांत पाहिल्याचें आठवतें. त्रिवेंद्रमची गाडी अकराला सुटली. दोन्ही बाजूंना माड, पोफळी, फणसाच्या बागा, त्यांत बांकदार चिनी छपरांचीं छोटीं छोटीं घरें, मध्येंच एखाद्या बागेंत उच लांकडी बांकासारख्या चरख्यावर काथ्याचा दोर वळीत असलेली पांढऱ्या चोळी-परकरांतली एखादी मल्याळी स्त्री, अशीं दृश्यें मधून मधून दिसत होतीं. लांब पानांच्या छोट्या झाडांचे मळेच्या मळे मध्येंच दिसत. हीं 'टॅपिओका'चीं झाडें असल्याचें कळलें. त्यांच्यापासून 'स्टार्च' होतो आणि 'स्टार्च'ला खूप मागणी असल्यामुळें इथें इतर पिकांची उपेक्षा करूनहि 'टॅपिओका'ची लागवड फारच मोठ्या

प्रमाणावर लोक करूं लागलेत म्हणे. कांहीं वेळानें परवूर स्टेशन आलें. स्टेशनाच्या प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या पांढऱ्या कपड्यांतल्या कांहीं मल्याळी बायकांच्या कपाळावर आडवे गंधाचे पट्टे आणि मध्यें कुंकू होतें.

*'ग्रँड' कोंकणी !*

त्यानंतर इडवाय स्टेशन आलें. इडवाय सोडल्यावर देखावा बदलला. घरें आणि नारळ पोफळीच्या बागांऐवजीं कुठें दूरवर पसरलेलीं खारीं सरोवरें आणि कालवे, कुठें भाताचीं शेतें, मध्येंच डोंगर तर कुठें उन्हांत धगधगणारा पांढरा रेताड प्रदेश दिसे. शेवटीं त्रिवेंद्रमपेठा स्टेशन आलें. अगदींच खेडवळ छोटेंसें स्टेशन वाटलें; पण त्रिवेंद्रमचें मोठें स्टेशन पुढें असल्याचें कळलें. नंतर 'त्रिवेंद्रम सेंट्रल'च्या मोठ्या स्टेशनांत गाडी आली. फारसें मोठें स्टेशन नाहीं पण ठाकठीक दगडी इमारत आहे. स्टेशनच्या समोरच्याच रस्त्यावर कांहीं अंतर चालून गेल्यावर माडांच्या बागेंतून गेलेला तांबड्या मातीचा एक रस्ता,– रस्ता कसला, कोंकणांतल्यासारखी एक पांदण दिसली. त्या पांदणीच्या कोपऱ्यावर एका माडीच्या घरांत 'ग्रँड उडुपी लॉज' हॉटेल होतें. 'ग्रँड' कांहीं नसलें तरी बऱ्यापैकीं खोल्या आणि आंघोळीची चांगली सोय असल्यामुळें तिथें एक खोली आम्हीं ठरवून टाकली. त्रिवेंद्रम हें राजधानीचें शहर असलें आणि मुख्य डांबरी रस्ता जवळच असला तरी हॉटेलच्या आसपासचें तांबड्या मातीचें, सळसळणाऱ्या माडाच्या झांवळ्यांचें वातावरण कोंकणांतल्या खेड्याचेंच होतें ! दुपारचा दीड वाजून गेल्यामुळें 'उडुपी लॉज'मध्यें जेवण नव्हतें; तेव्हां स्नान उरकून जवळच एका लहानशा बंगल्यांत असलेल्या 'हॉटेल ॲरिस्टो'त नायर पद्धतीचें तिखट मटन आणि पाव ऑमलेटवर ताव मारला !

*शंख-हत्तींचें राजचिन्ह*

चार वाजतां टांग्यांतून फिरायला बाहेर पडलों. मधल्या मुख्य डांबरी

रस्त्यानें टांगा जाऊं लागला तेव्हां मुंबईच्या कोटांतल्या इमारतींसारख्या भव्य इमारती आणि मोठीं दुकानें दिसूं लागलीं, आणि त्रिवेंद्रम हें मोठें शहर आहे — अगदींच कोंकण नाही, याची खात्री पटली. छोट्या छोट्या गोल, तांबड्या छपरांचा पुंजका असलेली, तांबड्या रंगाची अकाउंटंट जनरलच्या कचेरीची भव्य त्रावणकोरी इमारत आणि आशीर्वाद देत असलेल्या ख्रिस्ताची भव्य प्रतिमा शिखरावर असलेलें उंच मनोऱ्यासारखें चर्च, दोन्ही वैशिष्ट्यपूर्ण वाटलीं. सेक्रेटरिएटच्या लांबरुंद शुभ्र इमारतीच्या प्रवेशद्वारावर हत्ती आणि शंखाचें चिन्ह होतें. त्रावणकोरांत हत्ती खूप आहेत आणि कन्याकुमारीपाशीं हरतऱ्हेचे शंख मिळतात, तेव्हां इथें शंख-हत्तीचें राजचिन्ह ठीकच आहे. इथल्या बसवरसुद्धां हत्तीचेंच चिन्ह असतें. सार्वजनिक वाचनालयाच्या भव्य इमारतीच्या प्रवेशद्वारावर कुणींतरी कम्यूनिस्टानें हातोडा-कोयता काढून ठेवला होता ! सेक्रेटरिएटच्यासमोर सर टी. माधवरावांचा भव्य पुतळा आहे. फिरत फिरत त्रिवेंद्रमचें ' झू ' किंवा प्राणीसंग्रहालय पाहायला गेलों. किंचित् डोंगराळ जागेंत हें आहे. बाजूलाच असलेल्या म्यूझिअमची इमारत छोटीच, पण त्रावणकोरी कलाकुसरीचें वैशिष्ट्य असलेली वाटली. कोरीवकाम केलेल्या रंगीत लांकडी छताखालच्या तिरप्या ग्वांबांवर चिनी ड्रॅगनसारख्या सर्पाकृति कोरल्या आहेत. बारीक नक्षीकाम केलेल्या चांदी-सोन्याच्या आणि हस्तिदंताच्या वस्तू आणि नटराजाच्या किती तरी लहान-मोठ्या मूर्ति इथें आहेत. दशावतारांचें भरगच्च कोरीवकाम केलेला एक अजस्र रथ एका बाजूला होता.

परत येतांना टांगा सोडून बसनें आलों. रस्त्यावरल्या पाट्यांवर ' रंगविलास ', ' रणजित ', ' लक्ष्मी ' हीं नांवें इंग्रजींत ' रेंगाविलास ', ' रेंजित ', ' लेक्ष्मी ' अशीं लिहिलेलीं दिसलीं ! इंग्रजी ' ए 'ऐवजीं ' ई ' अक्षर हे लोक कां वापरतात, समजत नाहीं. का इथले उच्चारच ' रेंगा ', ' रेंजी ', ' लेक्ष्मी ' असे आहेत ? स्टेशनच्यासमोर एक सार्व-

जनिक बाग आहे; तिथें रेडिओचे कार्यक्रम ध्वनिक्षेपित होतात. संध्याकाळीं बरेच लोक हे कार्यक्रम तिथें ऐकत बसलेले दिसले.

• • •

*तारीख २५ मे १९५०*

*आयुर्वेद आणि ज्योतिष*

सकाळीं चहा घेऊन खोलींत गप्पा करीत बसलों होतों. इतक्यांत हस्तिदंताच्या वस्तू विकणारा एक माणूस हॉटेलांत आला. त्याच्याकडून कांहीं वस्तू घेतल्या. तो जातो न जातो तोंच एक हस्तसामुद्रिक आला! इथें 'आयुर्वेद' आणि 'हस्तसामुद्रिक' बरेच लोकप्रिय दिसतात. दिवसांतून दोन-तीन तरी ज्योतिषी हॉटेलांत फेऱ्या मारून जातात. रस्त्यांत 'आयुर्वेद औषधालयम्'च्या पाट्याहि बऱ्याच दिसतात. स्नान झाल्यानंतर ११ वाजतां बाहेर पडलों. 'रंगविलास' नांवाच्या जुन्या राजवाड्यांत उत्तम चित्रांचा संग्रह आहे, असें कुणीं तरी सांगितलें होतें म्हणून त्या राजवाड्याकडे गेलों. ऐसपैस वखारीसारखा दिसणारा हा जुनाट राजवाडा बंद होता. एक-दोघांकडे चौकशी केली. एक म्हणाला, 'होतें खरें इथें चित्रांचें प्रदर्शन.' दुसरा म्हणाला, 'छे छे, कधींच नव्हतें,–हा राजवाडा नेहेमींच बंद असतो!' चित्रांचा नाद सोडून देऊन त्रावणकोर राजघराण्याचें कुलदैवत 'श्री पद्मनाभ' जिथें आहे तें प्रचंड देवालय पाहावयाला गेलों. किल्ल्याच्या बुरुजांसारखे दोन उंच मनोरे मुख्य द्वारापाशीं आहेत. आंतल्या प्रशस्त प्राकाराभोंवतीं तटबंदीसारख्या भव्य भिंती आहेत. आंत किती तरी रस्ते, इमारती, दुकानें आहेत. दोन पुष्करिणी दोन बाजूला आहेत. इथलीं देवालयें म्हणजे एक लहानसा गांवच असतो. केळीं, 'महांबळ' म्हणजे आंबे, फुलांचे हार वगैरेंचीं दुकानें हारीनें होतीं. इथल्या फुलांच्या हारांचें एक वैशिष्ट्य म्हणजे अंतरा अंतरावर हारांत शोभेकरितां

लिंबें गुंफलेलीं असतात ! श्रीपद्मनाभ मंदिराचें उंच गोपुर डोंगरासारखें भव्य आहे. बारा वाजून गेल्यामुळें देवळाचे दरवाजे बंद होते; तेव्हां संध्याकाळीं शेषशायी पद्मनाभाची मूर्ति पाहण्यासाठीं पुन्हा येण्याचा बेत करून म्यूझियमच्या जवळच असलेलें 'श्रीचित्रालयम्' पाहावयाचें राहिलें होतें तें पाहावयाला टांगा करून गेलों.

*श्रीचित्रालयम्*

चित्रालयाची सफेत रंगाची इमारत एकाद्या श्रीमंताच्या टुमदार बंगल्यासारखी आहे. आजूबाजूचा बाग, इमारतीच्या पायऱ्या, जिने सर्व कांहीं स्वच्छ आणि टापटिपीचें आहे. इथले शिपाईहि स्वच्छ पांढरा कोटपाटलोण आणि परीटघडीची गांधी टोपी घातलेले होते. दालनांवर आंकड्यांऐवजीं 'ए' 'बी' 'सी' किंवा 'ओ' 'पी' 'आर' 'एस' अशीं इंग्रजींत अक्षरें आहेत. एका दालनांत देवीप्रसाद रॉय चौधरी, अवनींद्रनाथ टागोर वगैरे थोर आधुनिक चित्रकारांचीं चित्रें होतीं. एका दालनांत मराठा वीर बाजी प्रभू आणि तंजावरच्या मराठी राजाचें चित्रहि दिसलें ! चिनी विभागांत माशांचीं सुंदर चित्रें होतीं. जावा विभागांत वालीचा वध करीत असलेल्या सुग्रीवाचें चित्र मजेदार वाटलें. माधव मेनन नांवाच्या मल्याळी चित्रकाराचीं गाईबैलांचीं चित्रें वैशिष्टयपूर्ण होतीं. रविवर्म्याच्या चित्राचें एक खास मोठें दालन इथें आहे. चित्रकारांत रविवर्म्याचें स्थान काय असेल तें असो, पण त्याची निर्मिती प्रचंड प्रमाणावर होती यांत शंका नाहीं. साहेब लोकांच्या हत्तीच्या शिकारीचीं चित्रें रविवर्म्यानें काढलीं आहेत; त्रावणकोरच्या राजघराण्यांचीं मोठमोठीं चित्रें आहेतच; दिवाण सर टी. माधवराव यांचें चित्र आहे; माधवरावांचें जांवई रामराव यांचें चित्र आहे; पौराणिक चित्रें आहेत, ऐतिहासिक चित्रें आहेत; तैलरंगाचीं चित्रें आहेत, जल रंगाचीं चित्रें आहेत; निसर्गदृश्यें आहेत; आणि रेखाचित्रेंहि आहेत ! त्यांनीं काढलेल्या कांहीं छोट्या रेखाचित्रांखालीं 'हें आठ मिनिटें दोन

सेकंदांत काढलें, हें दोन मिनिटें नऊ सेकंदांत काढलें, हें चार मिनिटांत काढलें, ' असें लिहून ठेवलें आहे.

*फारशींत लिहिलेलें महाभारत*

हस्तलिखितांचें दालन पाहाण्यासारखें आहे. फारशींत लिहिलेलें, पानांपानांवर सोनेरी वेलबुट्टी असलेलें महाभारताचें एक हस्तलिखित इथें दिसलें. सोन्याच्या लहानशा तपकिरीच्या डबीसारखें एक कुराण होतें. एका कुराणाच्या प्रतींत औरंगजेबाचें हस्ताक्षर होतें.

इथून त्रिवेंद्रमपेठा गांवांतून समुद्रकिनाऱ्याकडे टांगा घेतला. किनाऱ्याजवळचें वस्तुसंग्रहालय आणि मत्स्यालय पाहावयाचें होतें. दुपारीं दीडची वेळ असल्यामुळें मुंबईच्या चौपाटीसारख्या या विस्तृत वाळवंटांत चिटपांखरूं नव्हतें. वस्तुसंग्रहालयांत प्राण्यांचे, माशांचे पक्ष्यांचे वगैरे सांगाडे पहाण्यासारखे आहेत; पण इथल्या नायर लोकांच्या घरांची रचना कशी असते तें दाखवण्याकरितां इथें ठेवलेला नायर घराचा लांकडी नमुना आणि दागदागिने घालून उभ्या असलेल्या नायर स्त्रीची प्रतिमा प्रेक्षणीय आहेत. या स्त्रीनें केंसांचा बुचडा नारदासारखा डोक्यावर बांधला आहे. गळ्यांत मधून मधून लिंबें गुंफलेला फुलांचा हार आहे. कानाची पाळी फाटून खालीं येईल, असे सोन्याचे जड डूल कानांत आहेत, आणि कांखेंतून छातीवर संन्यासी छाटी गुंडाळतात तशा पद्धतीची साडी आहे. नायराचें घर बांधणें म्हणजे एक शास्त्रच दिसतें. घराच्या आवारांत एक अग्नीचा, एक वायूचा वगैरे चार चौक असतात. त्याशिवाय आजूबाजूला विशिष्ट कार्यासाठीं छोटीं छोटीं घरें बांधावयाचीं असतात.

वस्तुसंग्रहालयानंतर थोड्या अंतरावरचें मत्स्यालय पाहिलें. लहानमोठे रंगीबेरंगी मासे कांचेच्या वेगवेगळ्या प्रकाशित घरांत व्यवस्थितपणें ठेवले आहेत. वरच्या मजल्यावर ' मरीन बायालॉजी 'ची प्रयोगशाळा आहे. त्रिवेंद्रम विमानतळावरल्या रस्त्यानें स्टेशनकडे आलों तेव्हां

दुपारचे दोन वाजले होते. स्टेशनांतल्या रेस्टोरांमध्यें जेवण घेतलें आणि हॉटेलांत परत आलों.

*धोतर नाहीं म्हणून देवदर्शन नाहीं*

संध्याकाळीं सहाच्या सुमारास पुन्हा श्रीपद्मनाभ मंदिराकडे गेलों. या वेळीं मंदिराचें आवार भक्तांनीं गजबजून गेलें होतें. गोल धोतर लावलेले उघडेबंब भस्मचर्चित भक्त, रस्त्यावरल्या प्रवेशद्वाराकडूनच किती तरी दूर गाभाऱ्यांत असलेल्या देवाला नमस्कार करीत असलेले दिसले. हें देवालय महाराजांच्या खाजगी मालकीचें असल्यामुळें तांबड्या वेरेटोप्या घातलेले, गणवेशांतलें लष्करी शिपाई बंदुकांना चकचकीत संगिनी लावून गाभाऱ्याच्या दाराशीं पहाऱ्यावर होते. देवालयाच्या पवित्र वातावरणांत या बंदुका, या संगिनी आणि हे गणवेशधारी सैनिक कसेसेच वाटतात. आम्ही पायजमा आणि शर्ट घालून मंदिरांत गेलों होतों. दाराशीं आम्हांला सांगण्यांत आलें, कीं आंत देवाच्या दर्शनाला जायचें असेल तर अंगावर शर्ट असतां कामा नये आणि खालीं धोतर पाहिजे ! सकाळीं देऊळ बंद म्हणून परत फिरलों; आतां धोतर नाहीं म्हणून प्रवेश नाहीं ! श्रीपद्मनाभाची इच्छा ! श्रीरंगपट्टणच्या देवळांतल्यासारखीच शेषशायी विष्णूची भव्य मूर्ति आंत असेल अशी कल्पना करीत आणि पद्मनाभाचें प्रचंड गोपूर बाहेरून पाहायाला मिळालें, एवढ्यावरच समाधान मानीत परत फिरलों ! मंदिराच्या जवळच्याच रस्त्यावर धोतर, साड्या, कापडाचा ढीग करून एक माणूस उभा होता आणि लिलांव पुकारून एक एक नग विकीत होता !

● ● ●

*तारीख २६ मे १९५०*

*महाराजांची देवपूजा*

आज दुपारीं २–४५ च्या एक्स्प्रेस बसनें कन्याकुमारीला जायचें आहे. सकाळीं कांहीं विशेष करावयाचें नसल्यामुळें उगाच इकडे

तिकडे गांवांत भटकत होतों. अकराच्या सुमाराला मुख्य रस्त्यावरच्या पोस्टांतून परत येत असतां रस्त्यावरले पोलिस शिट्या फुंकून एकमेकांना सावध करीत असलेले दिसले. महाराजांची मोटार त्या रस्त्यानें येणार होती. महाराज या वेळेला पद्मनाभ मंदिरांत पूजेला जातात, एका माणसानें आम्हांला सांगितलें. इतक्यांत एक भव्य मोटार तिथून गेली. फक्त धोतर गुंडाळलेला उघड्या अंगाचा एक गौरवर्ण तरुण मोटारींत मागें बसला होता. ड्रायव्हरच्या शेजारीं तसाच उघड्या अंगाचा पण दांडगा दिसणारा माणूस बसला होता. हेच महाराज, तो माणूस म्हणाला, आणि तो ड्रायव्हरशेजारीं बसलेला त्यांचा शरीरसंरक्षक. स्वतः महाराजसुद्धां उघड्या अंगानें फक्त धोतर नेसून पद्मनाभ मंदिरांत जातात; मग इतरांना धोतराशिवाय जाऊं देत नाहींत यांत कांहींच आश्चर्य नाहीं.

*फाजील कुतूहल*

इथें अननसाचें अमाप पीक दिसतें. फळांच्या दुकानांत अननसें दिसतातच. पण अननसांनीं भरलेल्या टोपल्या डोक्यावर घेऊन जाणाऱ्या किती तरी बाया रस्त्यांत दिसतात. इथले लोक परीटघडीचे शर्ट आणि धोतरें वापरीत असले तरी म्हैसूरच्या लोकांच्या मानानें जरा मागासलेलेच वाटतात. रस्त्यावर, दुकानांत तितकें सौजन्य दिसत नाहींच, पण आमच्यासारख्या नवीन दिसणाऱ्या माणसाकडे उगाच रिकामटेकड्यासारखे पाहात राहणारे बरेच आढळतात. पायतणाचा तुटलेला आंगठा रस्त्यावरल्या चांभाराकडे मी लावून घेत होतों, पण तेवढ्यांत चार-पांच लोक तिथें आमच्या तोंडाकडे पाहात उभे राहिले! त्यांच्यांत अंगावर भस्माचे पट्टे ओढलेला एक म्हातारा ब्राह्मणहि होता! वहाण नीट झाल्यावर ती वर उचलून 'ठीक झाली आहे ना?' म्हणून खुणेनें मीं त्याला विचारलें, तेव्हां त्यानें तिथून एकदम पाय काढला! इतरहि पसार झाले!

*माशी मारली ' छे नमस्कार केला*

कन्याकुमारीला जाणारी एक्सप्रेस बस गाद्यांच्या बैठका असलेली चांगली ऐसपैस होती. बरोबर २–४५ ला स्टँडवरून बस सुटली. त्रिवेंद्रम ते कन्याकुमारी सुंदर मोटार रस्ता आहे आणि अडीच तासांत बस कन्याकुमारीला पोहोंचते, असें कळलें होतें. त्रिवेंद्रममधून बस बाहेर पडल्याबरोबर ताड, माड, केळीच्या बनांचें खेडवळ वातावरण दोन्ही बाजूला दिसूं लागलें. डाव्या बाजूला दूर निळसर डोंगरांच्या रांगा दिसत होत्या. मध्येंच डोंगराळ तांबड्या मातीच्या प्रदेशांतून बस जात होती. बाळारामपूर, नरास्सला, पद्मनाथपूर, मार्तंड वगैरे गांवें वाटेंत लागलीं. कौलारू चौकीसारखें दिसणारें कसलेंसें एक देऊळ रस्त्याच्या बाजूला एकदां दिसलें. डायव्हरनें पट्कन चाकावरचे हात वर उचलून डोक्यावर घोंघावणारी माशी मारल्यासारखा नमस्कार केला, आणि पुन्हा चाकावर हात ठेवले ! साडेचार वाजतां ' नगरकोईल ' गांवांत गाडी थांबली. हें मोठें गांव आहे. पंधरावीस मिनिटें गाडी इथें थांबली. रस्त्यावरल्या दुकानांत चहा घेण्याकरितां आम्ही उतरलों. इतक्यांत पावसाची एक जोराची सर आली. बरेच उतारू उतरले होते. बसकडे भिजत कसें जायचें म्हणून दुकानाच्या दारांत ते. कुजबुजत होते. उतारूंत साडी नेसलेली, कपाळाला कुंकू लावलेली एक युरोपियन बाई होती. ती कुणी तरी अमेरिकन थिऑसॉफिस्ट असल्याचें कळलें. पावसांत भिजण्यांत तिला मोठी मजा वाटत होती. कांहीं वेळानें बस चालू झाली. आतां कन्याकुमारीचें टोंक अगदीं आठदहा मैलांवर होतें. लहानपणापासून हिमालय आणि कन्याकुमारी पाहण्याचें जबरदस्त कुतूहल माझ्या मनांत होतें.

*भारताचें तें निमुळतें टोंक*

लहानपणीं भारताचें तें निमुळतें टोंक नकाशांत पाहिलें, कीं केव्हां एकदां तिथें जाऊन मी उभा राहीन, असें मला वाटे. काश्मीर, सिमला,

मसूरीच्या प्रवासांत नगाधिराज हिमालयाचें तीन-चारदां दर्शन होऊन मनाचें समाधान झालें होतें. आज त्या टोंकाला असलेल्या नगाधिराजाची कन्या या टोंकाला येऊन उभी राहिली आहे, तिला पाहणार! कित्येक वर्षांचें माझें स्वप्न खरें होणार. मनाला एक अबोध हुरहुर वाटत होती. आजूबाजूचे दगड, धोंडे, झाडें, आकाश एक प्रकारच्या पर्युत्सुकतेनें मी पाहात होतों. कन्याकुमारीच्या जवळ जाऊं लागलों तसे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठे खडकच दिसूं लागले. या खडकाळ प्रदेशांत मध्येंच भाताचीं शेतें दिसत. आतां कन्याकुमारी चारच मैल होती. एक चर्च वाटेंत दिसलें. खडकाळ प्रदेशांतून मोटारचा स्वच्छ रस्ता सरळ पुढें गेलेला दिसत होता. दलालांना मी म्हणालों, ' का हो, आतां आपला देश संपणार; पुढें महासागर! हा मोटारचा रस्ता सरळ असाच गेला, तर सरळ पाण्यांत जाणार!' मी थट्टेनें म्हणालों खरा, पण खरोखरच मोटरचा रस्ता सरळ समुद्रांत गेला होता! अर्थात मोटरीनें पाण्यांत उडी घेतली नाहीं; समुद्राच्या जवळ गेल्यावर उजव्या बाजूला वळून ती ' केप हॉटेल'च्या कंपाउण्डमध्यें शिरली!

*समुद्रांतला सूर्योदय व सूर्यास्त*

' केप हॉटेल ' हें अद्ययावत् युरोपियन पद्धतीचें सरकारी हॉटेल आहे. सर्व सुखसोयींनीं युक्त अशा खोल्या अगदीं माफक भाड्यानें इथें मिळतात. पण आमच्या नशिबीं तें नव्हतें! आमच्या बसमधून आलेल्या कुणाच्याच नशिबीं तें नव्हतें! सर्व खोल्या भरून गेल्याचें मॅनेजरनें सांगितलें. बाई माणूस म्हणून त्या थिऑसॉफिस्ट अमेरिकन बाईचीहि सोय करायला तो तयार होईना. जागाच नव्हती त्याला तो तरी काय करणार? ' केप हॉटेल 'कडे बस येण्यापूर्वीं वाटेंत एका लहानशा बंगल्यावर ' सी व्ह्यू हॉटेल, ' अशी पाटी आम्हीं पाहिली होती. त्या वेळीं भारतीय भूमीच्या अगदीं टोंकावर असलेल्या

'केप हॉटेल'मध्यें राहण्याच्या स्वप्नांत आम्ही असल्यामुळें त्या पार्टीचा आम्हीं फारसा विचार केला नव्हता! पण आतां 'केप'मध्यें जागा नाहीं म्हटल्याबरोबर आमच्या काळजांत धडकी भरली. कन्याकुमारीच्या आसपासचा प्रदेश रेताड, खडकाळ, ओसाड आहे. फारशीं घरेंहि दिसत नाहींत. पाण्यांत गेलेल्या खडकाजवळचें कन्याकुमारीचें देवालय पाहायचें आणि समुद्रांतल्या सूर्योदय-सूर्यास्ताची गंमत पहायची यापेक्षां इथें दुसरें कांहींच नाहीं. आमच्यासारख्या मुंबईच्या लोकांना समुद्रांतला सूर्यास्त नेहमींच दिसतो. पण समुद्रांतला सूर्योदय कधीं दिसत नाहीं. मद्रासकडल्या लोकांना पाण्यांतला सूर्योदय नेहमीं दिसतो, तर पाण्यांतला सूर्यास्त कधीं दिसत नाहीं. इथें दोन्ही पाण्यांतले पाहतां येतात ही मजा!

*'शंकरविलास' चाळ*

सामान हमालांच्या डोक्यावर देऊन 'केप हॉटेल'च्या बाहेर पडलों, तों झिम झिम पाऊस सुरू झाला. ढगाळ आकाश झाल्यामुळें सूर्यास्ताची मजा गेलीच. आतां उद्यां सकाळीं सूर्योदयाच्या वेळीं पाऊस काय करणार आहे कुणाला ठाऊक! 'सी व्हयू'मध्यें तरी जागा मिळेल या आशेनें हमालांना हांकलीत तिकडे धांवत पळत गेलों. पण तिथेंहि जागा नव्हती! राहायची सोय कुठें तरी करा; भात, भाजी, सांबाराचें जेवण इथें मिळेल'; तो हॉटेलवाला म्हणाला. काळोख पडत होता. पाऊस थोडा थोडा होताच. आमच्या तोंडचें पाणी पळालें. आतां करायचें काय? एक तरतरीत मल्याळी पोरगा आमच्या मागें मागें होता. 'माझें नांव कुमार गाइड आहे', तो इंग्रजींत म्हणाला. 'आमची आधीं राहायचीं सोय कर', मीं त्याला म्हटलें, 'मग काय तें गाइड कर!' 'देवळाच्या बाजूला मोठी 'चोल्ट्री' म्हणजे धर्मशाळा आहे', तो म्हणाला, 'तिथें हवी तितकी जागा मिळेल'. धर्मशाळा मोठी होती. पण खोल्या कोरीव लेण्यांतल्या खोल्यासारख्या काळोख्या आणि जुनाट